सोलापूर
तरुण भारत
आसमंत

# भाजपने फोडला मुस्लीम 'व्होटो'चा भ्रम!




वेध — राहुल बोरगांवकर

**ज्या राज्यात मुस्लिमांची संख्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक आहे, तेथे एकगठ्ठा मतदानामुळे आपण कायम सत्तेत राहू हा काँग्रेस, तृणमूल, सपा वगैरे कथित 'सेक्युलर' पक्षांचा भ्रम भाजपने आजवर आसाम व उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये तोडला. आता प. बंगालमधील निवडणुकीत तो प्रथमच तोडला जाईल. काँग्रेस व तृणमूल यांसारख्या पक्षांमध्ये वाढलेली बेचैनी ही या वस्तुस्थितीमुळे उत्पन्न झाली आहे.**

अखंड भारतातील मुस्लिमांना हिंदूंच्या वर्चस्वाखाली राहणे मान्य नसल्याने, त्यांनी वेगळ्या देशाची मागणी केली आणि ती मान्यही करण्यात आली. भारतातून जितके मुस्लीम पाकिस्तानात गेले, त्यापेक्षा कितीतरी अधिक मुस्लीम भारतातच राहिले. किंबहुना, त्यांना हेतुत: भारतात रोखून धरण्यात आले, ज्यामुळे काँग्रेसला स्वत:ची हक्काची एक मतपेढी उपलब्ध झाली. धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झाली असताना-ही भारतात मुस्लीम राहिले, तर भारताची एक 'सेक्युलर' देश अशी प्रतिमा उभी राहू शकते, असा दावा केला गेला. खरी गोष्ट ही होती की, काँग्रेसला स्वत:ची एक हक्काची मतपेढी हवी होती, जी मुस्लीम समाजच देऊ शकत होता. ही गोष्ट लक्षात आल्यावर काही प्रादेशिक पक्षांनी, या मुस्लीम मतपेढीला गोंजारण्यास सुरुवात केली. लवकरच समाजवादी पाट, लालूप्रसादांचा 'राजद', मायावतींचा 'बसपा', तृणमूल काँग्रेस यांसारख्या प्रादेशिक पक्षांनी, आपल्या राज्यात ही मतपेढी उभी केली. यामुळे उत्तर प्रदेश, बिहार, प. बंगाल राज्यांमध्ये भाजप कधीच सत्तेत येऊ शकणार नाही, असा भ्रम तयार करण्यात आला.

देशातील जम्मू-काश्मीर, आसाम व उत्तर प्रदेश या राज्यांमधील मुस्लीम मतदारांची एकगठ्ठा मतपेढी आपल्यालाच सत्तेवर आणत राहील, अशीही या कथित 'सेक्युलर' पक्षांनी स्वत:ची समजूत करून घेतली. मात्र, २०१६ पासून भाजपने हा भ्रम तोडण्यास प्रारंभ केला. आसामच्या लोकसंख्येत सुमारे ३३ टक्के मुस्लीम आहेत. ही आकडेवारी २०११च्या जनगणनेची आहे. तरीही, त्यावर्षी आसाममध्ये भाजपने स्वबळावर सरकार स्थापन केले. पाच वर्षांनी त्याचीच पुनरावृत्तीही करून दाखविली आणि आता यंदाही भाजप सत्तेवर येण्याची दाट शक्यता आहे. त्याच्या पुढील वर्षी, २०१७ मध्ये उत्तर प्रदेशसारख्या राज्यात मुस्लिमांची लोकसंख्या जवळपास ३० टक्के असतानाही, भाजपने तेथे स्वबळावर सरकार स्थापन केले. आसामप्रमाणेच २०२२ मध्येही उत्तर प्रदेशात भाजपने सलग दुसऱ्यांदा निवडणुका जिंकून विक्रम स्थापन केला. कारण, काँग्रेसवगळता आजवर कोणत्याच पक्षाला तेथे सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळविता आलेली नाही. मुस्लीम मतदार ज्या पक्षाला मत देतील त्याचीच सत्ता येईल; हा भ्रम भाजपने या दोन राज्यांमध्ये मोडून काढला. आता पुढील वर्षीही सत्तेची 'हॅट्ट्रिक' करण्याचा भाजपचा मनसुबा आहे.

या दोन राज्यांनंतर आता पश्चिम बंगाल या तिसऱ्या राज्यातही, भाजप मुस्लीम लोकसंख्येचा हा 'व्होटो' फेटाळून लावण्याच्या तयारीत आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची सारी मदार मुस्लीम मतदारांवरच होती. निवडणूक आयोगाच्या 'एसआयआर' या मोहिमेमुळे, बोगस मुस्लीम मतदार निवडणूक प्रक्रियेतून बाहेर फेकले जात होते. म्हणून, केवळ ममतांनीच या मोहिमेला कडाडून विरोध केला होता. या राज्यात मुस्लिमांची लोकसंख्या २७.१ टक्के इतकी आहे. अर्थात, ही आकडेवारीही २०११चीच आहे. त्यामुळे यंदा जी जनगणना होणार आहे, त्यात ही टक्केवारी नक्कीच ३० टक्क्यांवर गेलेली दिसेल. असो. पण, या राज्यात तीन जिल्हे असे आहेत, जेथे मुस्लिमांची लोकसंख्या जवळपास ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. मुर्शिदाबाद, मालदा या जिल्ह्यांतील मुस्लीम लोकसंख्येमुळेच राज्यातील ८० ते १२० मतदारसंघात कोण निवडून येणार, ते मुस्लीम मतदार ठरवितात, अशी मांडणी आजवर केली जात होती. मुर्शिदाबाद जिल्ह्यातच आता बाबरी मशीद बांधली जात आहे आणि याच जिल्ह्यात 'एसआयआर'विरोधात हिंसाचार झाला होता. मालदा जिल्ह्यात ५१ टक्क्यांपेक्षा अधिक मुस्लीम लोकसंख्या आहे. बांगलादेशातून येणारे सर्वच घुसखोर प्रथम याच जिल्ह्यात येतात. मध्यंतरी 'एसआयआर' करणार्‍या काही न्यायाधीशांनाही याच जिल्ह्यात, काही तास ओलीस धरण्यात आले होते. मात्र, निवडणूक आयोगाच्याच आकडेवारीचा आधार घेऊन एका संस्थेने केलेल्या पाहणी अहवालात असे आढळून आले की, राज्यात भाजपचा पराभव मुस्लिमांच्या एकगठ्ठा मतदानामुळे झाला नसून तो हिंदूंनी त्या पक्षाला मत दिले नाही, म्हणून झाला.

२०१९ मधील लोकसभा निवडणुकीत भाजपला तब्बल ५७ टक्के हिंदू मतदान झाले होते व त्यामुळे या पक्षाचे १८ खासदार निवडूनही आले. पण, २०२४ मधील निवडणुकीत हिंदू मतांची टक्केवारी घटून ती ५० टक्क्यांवर आल्याने, भाजपचे केवळ १२ खासदारच निवडून आले. २०२१ मधील विधानसभा निवडणुकीत भाजपने २२ अशा मतदारसंघांमध्ये विजय मिळविला होता, ज्यात बहुतांशी लोकसंख्या मुस्लिमांची नव्हती. त्याचप्रमाणे तृणमूल काँग्रेस १३ अशा जागा जिंकल्या होत्या, ज्यात मुस्लीम मतदार हे निर्णायक नव्हते. याच पाहणीत असेही दिसून आले आहे की, २०१६ मध्ये मुस्लीम मतदारांची तृणमूल काँग्रेस, काँग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट या पक्षांमध्ये विभागणी होऊनही ममता बॅनर्जी सत्तेत येऊ शकल्या होत्या. त्यावर्षी तृणमूल काँग्रेसला ४९ टक्के मते मिळून २११ जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसला १२.२५ टक्के मतदान होऊन ४४ जागा मिळाल्या होत्या. तर, मार्क्सवादी पक्षाला १९.७५ टक्के मते मिळून २६ जागा मिळाल्या होत्या. यावरून असे दिसते की, मुस्लीम मते विभाजित झाली, तर त्याचा भाजपला लाभ होईल. (पान ४ वर)

**१९ व्या शतकात उदय झालेल्या औद्योगिकरणामुळे कर्मचाऱ्यांना १५-१८ तास राबवून घेणाऱ्या असुरी भांडवशाही विरोधात जगभरातून आवाज उठवण्यात आला. त्याकाळात किमान वेतन, पगारी रजा, आठ तासांचा दिवस आदी मागण्या जगभरातील कामगारांच्यावतीने लाऊन धरण्यात आल्या होत्या. भारतात सर्वप्रथम १ मे १९२३ रोजी कामगार दिन साजरा करण्यात आला होता. 'किसान श्रमीक पार्टी'ने तेव्हाच्या चेन्नईत पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. मात्र, आज मागे वळून पाहताना औद्योगिक क्षेत्रांचा घसरता आलेख पाहता कामगारांची परिस्थिती तितकीशीही चांगली नसल्याचे चित्र दिसते. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करत असताना आंतरराष्ट्रीय कामगार दिनाबद्दल मात्र, अनास्थाच आहे.**

कामगार दिन विशेष...

# कामगारांना हवी हक्कांची जाणीव!

निमीत्त. — तेजस परब



भारतात सर्वप्रथम १ मे १९२३ रोजी कामगार दिन साजरा करण्यात आला होता. 'किसान श्रमीक पार्टी'ने तेव्हाच्या चेन्नईत पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. मात्र, आज मागे वळून पाहताना औद्योगिक क्षेत्रांचा घसरता आलेख पाहता कामगारांची परिस्थिती तितकीशीही चांगली नसल्याचे चित्र दिसते. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करत असताना आंतरराष्ट्रीय कामगार दिनाबद्दल मात्र, अनास्थाच आहे. आजवर संघटीत आणि असंघटीत कामगारांच्या परिस्थितीत पाहता ना कामगाराला संघटना वाली आहे ना सरकार... माहिति तंत्रज्ञानाद्वारे होत गेलेले बदल पाहता. एफडीआयद्वारे भारतात आलेली बीपीओ, केपीओ, मॉल संस्कृती, कॉल सेंटर्स आदींमध्ये नोकऱ्या उपलब्ध झाल्या. मात्र, स्पर्धा, आकर्षक पगार याची परतफेड कामगारांना कामाचा ताण, अटी, टार्गेट आदीद्वारे करावी लागली. सत्तर ते नव्वदीच्या दशकांपर्यंत असलेल्या कामगार संघटनांचा प्रभाव हळूहळू शिथील होऊ लागला. सरकारी नोकऱ्या हे केवळ दिवास्वप्न म्हणून शिल्लक राहीले. अनेक ठिकाणी खासगीकरण, कर्मचारी कपात आदी समस्या डोकेवर काढू लागल्या. यातून नोकरीसाठी उतरणारा तरूण थेट जगाच्या स्पर्धेत मागे पडू लागला. (पान ४ वर)

लक्ष्यवेध — तेजस परब

**'दिसतं तसं नसतं' ही म्हण सध्या अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या भोवती सुरू असलेल्या राजकारण आणि अर्थकारणाला चपखल बसते. डोनाल्ड ट्रम्प सध्या युद्धविरामाच्या घोषणा करत सुटलेले दिसतात. त्यांच्या बाजूने अमेरिकचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स हे चर्चेसाठी पाकिस्तानच्या येरझार्‍या घालत आहेत. तर, दुसरीकडे इराण आपल्या मागण्यांवर ठाम आहे. दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची मुदत बुधवारी संपली. त्यानंतरच होर्मुझच्या सामुद्रधुनीत गोळीबाराच्या बातम्या येऊ लागल्या. याचाच अर्थ, इराणला हे युद्ध लांबविण्यातच फायदा वाटू लागला आहे. पण, ही सगळी युद्धजन्य स्थिती, चर्चा, घोषणा आणि एकूणच या सर्व स्थितीचे आंतरराष्ट्रीय वार्तांकन सुरू असतानाच, काहीतरी काळंबेरं शिजत असल्याचा संशय अमेरिकेच्या माध्यमांना येऊ लागला आहे. त्याचा घेतलेला हा वेध...**

# युद्धाआड सुरू असलेले 'युद्ध'



अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वेळोवेळी केलेल्या युद्धाच्या घोषणांचा वापर 'इनसायडर ट्रेडिंग'साठी केला जात असल्याचा आरोप केला जात आहे. त्यानंतर कित्येक बड्या गुंतवणूकदारांनी, हाच डाव पुन्हा एकदा खेळला असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ट्रम्प यांच्यावरील आरोप आता अधिक निश्चित होताना दिसत आहेत. 'दिसतं तसं नसतं' ही म्हण सध्या अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या भोवती सुरू असलेल्या राजकारण आणि अर्थकारणाला चपखल बसते. डोनाल्ड ट्रम्प सध्या युद्धविरामाच्या घोषणा करत सुटलेले दिसतात. त्यांच्या बाजूने अमेरिकचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स हे चर्चेसाठी पाकिस्तानच्या येरझाऱ्या घालत आहेत. तर, दुसरीकडे इराण आपल्या मागण्यांवर ठाम आहे. दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची मुदत बुधवारी संपली. त्यानंतरच होर्मुझच्या सामुद्रधुनीत गोळीबाराच्या बातम्या येऊ लागल्या. याचाच अर्थ, इराणला हे युद्ध लांबविण्यातच फायदा वाटू लागला आहे. पण, ही सगळी युद्धजन्य स्थिती, चर्चा, घोषणा आणि एकूणच या सर्व स्थितीचे आंतरराष्ट्रीय वार्तांकन सुरू असतानाच, काहीतरी काळंबेरं शिजत असल्याचा संशय अमेरिकेच्या माध्यमांना येऊ लागला आहे.

आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेच्या दाव्यानुसार, ट्रम्प यांच्या घोषणांमुळे शेअर बाजारात प्रचंड प्रमाणात 'इनसायडर ट्रेडिंग' दिसू लागले आहे. काही संस्थांनी ट्रम्प यांच्या घोषणा आणि शेअर बाजारातील उलाढालींच्या वेळेची शहानिशाही करून पाहिली. यात एकप्रकारचा 'पॅटर्न'देखील दिसून आला. ज्यावरून 'इनसायडर ट्रेडिंग'चे प्रकरण असल्याचा दावा काही शेअर बाजारातील तज्ज्ञांनी केला आहे. ज्यात सुरुवातीपासूनच ट्रम्प यांच्या घोषणांबद्दलची गोपनीय माहिती पसरली होती, असा अरोप आहे. त्यामुळे सामान्य गुंतवणूकदारांशी प्रतारणा केल्यासारखाच हा गंभीर गुन्हा आहे. काहींच्या मते, ही काही सामान्य बाब नाही, त्यामुळे ही गोष्ट गांभीर्याने घेणेच गरजेचे आहे. काही बलाढ्य गुंतवणूकदार ट्रम्प यांची पुढची चाल आधीच ओळखून, त्यानंतर पुढील डाव खेळतात.

'नोबेल' पुरस्कार विजेते अर्थशास्त्री पॉल क्रुगमॅन यांनी गेल्याच आठवड्यात, असाच एक आरोप केला. ट्रम्प यांच्या जवळच्या व्यक्तींना पुढच्या घोषणांची आधीच माहिती असल्याने, त्यांच्याकडूनच कच्च्या तेलाचा व्यापार केला जाण्याची भीती व्यक्त केली होती. कारण, कच्च्या तेलाचा हा व्यापार कोट्यवधी डॉलर्समध्ये होतो, ही तर शक्यता नाकारता येत नाही. तेलाच्या भावाची चढ-उतार लक्षात घेता, या संघर्षाचा फायद्यासाठी वापर झाला असेल, असेही नाकारता येत नाही. हा गुन्हा देशद्रोहासारखाच असल्याचे पॉल क्रुगमॅन म्हणाले होते.

पुढील पाच उदाहरणांद्वारे नेमके कशाप्रकारे 'इनसायडर ट्रेडिंग' झाले, ते समजून घेता येईल. 'ब्लॉकचेन' या गुंतवणूक कंपनीचे विश्लेषक संकेतस्थळ 'बबलमॅप्स'ने केलेल्या दाव्यात हा खुलासा केला आहे. फेब्रुवारीत अचानक एकूण सहा खाती उघडण्यात आली. या सर्व खात्यांनी दि. २८ फेब्रुवारीपर्यंत, इराणवर हल्ल्याच्या बाजूने सट्टा लावला होता. ज्यावेळी ट्रम्प यांनी हल्ला झाल्याची घोषणा केली, तेव्हा या खात्यात एकूण १२ लाख डॉलर्स जमा झाले होते. यानंतर कुठलाही व्यवहार या खात्यांमध्ये झालेला नाही. आणखी एका खात्याने युद्धविरामाच्या घोषणेनंतर एक लाख, ४० हजार डॉलर्स कमाई केली.

'डोनाल्ड ट्रम्प ज्युनिअर' यांच्याशी संबंधित असलेल्या, 'ऑनलाईन प्रेडिक्शन मार्केट'शी निगडित एक खाते उघडण्यात आले. ज्यामध्ये दि. ३० डिसेंबर ते दि. २ जानेवारीदरम्यान, व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्या राजीनाम्याबद्दल ३२ हजार, ५०० डॉलर्सचा सट्टा लागला होता. दि. ३ जानेवारी रोजी मादुरोंची गच्छंती झाली, अन् त्या खात्यात ४.३६ लाख डॉलर्स जमा झाले. या प्रकारानंतर संबंधित खाते बंद करण्यात आले आणि 'युजर नेम' लुप्त पावले. या खात्याशी संबंधित ट्रेडरला गोपनीय माहिती पूर्वीपासूनच होती, असा संशय त्यामुळे व्यक्त केला जात आहे.

दि. २३ मार्च २०२६चा दिवस. ट्रम्प यांनी 'ट्रुथ' या त्यांच्या समाज माध्यमांवर तेहरानच्या समस्येवर तोडगा काढणार असल्याचे म्हटले होते. या घोषणेनंतर शेअर बाजारात मोठीच उसळी आली आणि कच्च्या तेलाचे भाव गडगडले. ट्रम्प यांच्या या 'ट्विट'च्या १४ मिनिटे पूर्वीच, शेअर बाजारात घसरणीच्या भावात बोली लावण्यात आली होती. यावेळी कच्च्या तेलाची 'शॉर्ट सेलिंग' झाली होती. ज्यात किमती वाढल्या तर नफा कमावला जातो आणि भाव कमी झाला, तर स्वस्तात खरेदी केली जाते. प्रतिबॅरल १५ डॉलरची घसरण झाल्यानंतर, यात एकूण दोन कोटी ६६ लाख डॉलर्सचा नफा कमावण्यात आला. १०.४८ मिनिटे ते १०.५० या दोन मिनिटांत प्रचंड संख्येने व्यवहार झाले. ११.०४ वाजता ट्रम्प यांची 'पोस्ट' आली आणि ११.०५ वाजता कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या.

दि. ९ मार्च २०२६ रोजी इराण युद्धाच्या नवव्या दिवशी, युद्ध संपुष्टात आल्याची घोषणा केली गेली. ७.१६ मिनिटांनी ती समाजमाध्यमांवर आली. यामुळे तेलाच्या किमती २५ टक्क्यांनी घसरल्या. मात्र, या घोषणेच्या ४७ मिनिटे आधीच, ६.२९ मिनिटांनी भांडवली बाजारात व्यवहार सुरू झाले होते. 'शॉर्ट सेलिंग' करून एकूण चार हजार कॉन्ट्रॅक्टर्सनी ४९ लाख डॉलर्सहून अधिकचा नफा कमावला. हा 'इनसायडर ट्रेडिंग'चा प्रकार आहे, असाही आरोप त्यावेळी झाला.

ट्रम्प यांच्या आयातशुल्क लावण्याच्या निर्णयांमुळेही संशय बळावत आहे. सुरुवातीला टॅरिफची घोषणा मोठ्या गाजावाजात झाली. मात्र, चीन वगळता सर्वांना सवलत देण्यात आली. यानंतर शेअर बाजारात गुंतवणूकदारांनी त्सुनामी आणली होती; ज्यात 'स्टॅण्डर्ड ण्ड पुअर ५००' निर्देशांक ९.५ टक्क्यांनी उसळला. दुसर्‍या महायुद्धानंतरची ही सर्वात मोठी उसळी मानली गेली, यात १७.५९ कोटी डॉलर्सचा नफा नोंदविण्यात आला.

अमेरिकेत गेल्या ९३ वर्षांपासून 'इनसायडर ट्रेडिंग'वर बंदी आहे. अशा माहितीच्या आधारे काही गुंतवणूकदार गब्बर नफा कमावतात. ज्यामुळे बाजारातील बरोबरीची स्पर्धा संपुष्टात येते. याच कारणास्तव १९३३ पासून अमेरिकेत 'इनसायडर ट्रेडिंग'वर बंदी आहे. अर्थात, वरील नमूद केलेले सर्व आरोप असून, ते न्यायालयात सिद्ध होतीलच असे नाही. जर संपूर्ण पुरावे आणि साक्षीदारांची जुळवाजुळव व सत्यता पडताळून पूर्ण झाली, तर यात शिक्षा शक्य आहे. अन्यथा, संपूर्ण खटलाच रद्दबातल होऊ शकतो. ट्रम्प यांच्या या दुसर्‍या कारकिर्दीत झालेल्या आरोपांच्या तुलनेत, हा आरोपही तितकासा ठोस नाही. मात्र, जगभरात युद्ध सुरू असतानाही आपली पोळी भाजून घेणारे हे सट्टेबाज, भांडवली बाजार व्यवस्था खिळखिळी करत राहतील, हे मात्र नक्की.

# इराण संघर्षातून भारतासाठी धडे: आधुनिक युद्ध, आणि रणनीती



**युद्ध रशिया- युक्रेनचे असो अथवा अमेरिका-इराणचे, जगाच्या पाठीवर कुठेही सुरु असलेल्या संघर्षाचे जागतिक पडसाद उमटतातच. त्याचबरोबर या संघर्षातून आधुनिक युद्धाची रणनीतीही समोर येते. भारतासमोरही सध्या पारंपरिक आणि अपारंपरिक अशा दोन्ही प्रकारच्या सुरक्षेच्या आव्हानांचा संगम आहे. त्यामुळे अमेरिका-इराण संघर्ष ही भारतासाठी केवळ एक आंतरराष्ट्रीय घटना नसून, भविष्यातील राष्ट्रीय सुरक्षा धोरण घडवण्यासाठी एक महत्त्वाचा अभ्यासाचा विषय आहे. त्याविषयी सविस्तर...**

विश्वसंचार
हेमंत महाजन

शइस्लामाबाद येथे झालेल्या अयशस्वी चर्चेनंतर अमेरिकेने कठोर पावले उचलली आहेत. इराणच्या बंदरांची नाकेबंदी होणार, असे 'यूएस सेंट्रल कमांड'ने म्हटले आहे. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेला संघर्ष हा पारंपरिक युद्धासारखा नाही, जिथे मोठ्या प्रमाणावर सैन्य हालचाली, रणांगणावर सरळ लढाया आणि निर्णायक विजय दिसतो. हा संघर्ष अत्यंत गुंतागुंतीचा, बहुआयामी स्वरूपाचा आहे, ज्यात 'प्रॉक्सी' युद्ध, आर्थिक दबाव, तंत्रज्ञानाधारित हल्ले आणि मानसशास्त्रीय युद्ध या सर्व घटकांचा समावेश आहे. 'हायब्रीड' आणि 'ग्रे-झोन' युद्धाचा उदय इराण संघर्षाने हे स्पष्ट केले आहे की, आधुनिक युद्धे आता औपचारिकरीत्या जाहीर होत नाहीत. ती 'ग्रे-झोन'मध्ये लढली जातात, म्हणजे पूर्ण युद्धाच्या उंबरठ्याखाली. इराण 'प्रॉक्सी' गटांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतो. अमेरिका आणि इस्रायल 'टार्गेटेड स्ट्राईक्स', सायबर ऑपरेशन्स आणि गुप्तचर माहितीवर आधारित कारवाया करतात.

**भारतासाठी धडा:-** भारताने पाकिस्तान आणि चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांकडून अशाच प्रकारच्या 'हायब्रीड' युद्धासाठी तयार राहणे आवश्यक आहे. 'प्रॉक्सी'विरोधी रणनीती मजबूत करणे. गरज पडली तर अशा शत्रूंना भारताच्या बाहेर आणि पाकिस्तान आणि चीनच्या आत जाऊन मारण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे. सैन्य, गुप्तचर, सायबर आणि राजनैतिक साधनांचे एकत्रीकरण करणे. उप/ गैर-पारंपरिक धोक्यांसाठी जलद प्रतिसाद यंत्रणा विकसित करणे. कारण, असे धोके केव्हाही आणि अचानक भारताच्या समोर येऊ शकतात.

**'प्रॉक्सी' युद्ध : नवे वास्तव-** इराणने गैर-राज्य घटकांचा प्रभावी वापर करून स्वतःचा प्रभाव वाढवला आहे आणि त्याच वेळी थेट युद्ध जबाबदारी टाळली आहे.

**भारतासाठी धडा:-** भारत अनेक दशकांपासून सीमापार दहशतवादाचा सामना करत आहे. दहशतवादी नेटवर्कमध्ये अधिक खोलवर गुप्तचर प्रवेश आवश्यक आहे. गुप्त कारवायांद्वारे शत्रूंवर किंमत लादणे, जशास तसा प्रतिसाद म्हणून, गरज असेल तेव्हा केलेच पाहिजे.

**आर्थिक युद्ध आणि निर्बंध-** अमेरिकेने इराणवर लादलेल्या आर्थिक निर्बंधांमुळे थेट युद्धाशिवायही त्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर कमकुवत झाली आहे.

**भारतासाठी धडा:-** आर्थिक ताकद ही आता राष्ट्रीय सुरक्षेचा मुख्य स्तंभ बनली आहे. आर्थिक आणि व्यापारातील अडथळ्यांविरुद्ध लवचीकता निर्माण करणे गरजेचे आहे.

**'ड्रोन' युद्ध आणि कमी खर्चातील प्रभावी तंत्रज्ञान-** इराणने कमी खर्चातील 'ड्रोन' आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून तांत्रिकदृष्ट्या प्रगत शत्रूंना आव्हान दिले आहे.

**भारतासाठी धडा:-** भविष्यातील युद्धांमध्ये खालील घटक निर्णायक ठरणार आहेत.

**स्वॉर्म ड्रोन:-** अचूक मार्गदशत शस्त्रे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित युद्ध:-** भारताने स्वदेशी ड्रोन कार्यक्रम वेगाने विकसित करणे, मजबूत 'न्टी-ड्रोन' प्रणाली विकसित करणे, तिन्ही सैन्यदलांमध्ये ड्रोनचे एकत्रीकरण करणे, अशा उपाययोजनांवर लगेच विचार करून त्यावरती अंमलबजावणी पण वेगाने करावी.

**ऊर्जा सुरक्षा :-** एक रणनीतिक कमकुवत दुवा या संघर्षामुळे जागतिक ऊर्जापुरवठ्याची असुरक्षितता स्पष्ट झाली आहे, विशेषतः महत्त्वाच्या समुद्री मार्गांमुळे.

**भारतासाठी धडा:-** भारत हा जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा आयातदारांपैकी एक आहे. अस्थिर प्रदेशांवरील अवलंबित्व कमी करणे, रणनीतिक पेट्रोलियम साठे वाढवणे, अणुऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा आणि पर्यायी ऊर्जास्रोतांमध्ये गुंतवणूक, ऊर्जासुरक्षा म्हणजेच, राष्ट्रीय सुरक्षा अशा उपाययोजना अत्यंत आवश्यक आहेत.

**सागरी सुरक्षा आणि सामरिक मार्गांवरील नियंत्रण-** समुद्री मार्गांवर नियंत्रण हे युद्धातील निर्णायक घटक बनले आहे.

**भारतासाठी धडा:-** हिंदी महासागर क्षेत्रात उपस्थिती मजबूत करणे, समान विचारांच्या देशांसोबत भागीदारी वाढवणे आवश्यक आहे.

**कमी खर्चाच्या युद्धाची ताकद-** इराण होर्मुझची सामुद्रधुनी रोखण्यासाठी पारंपरिक नौदलाऐवजी स्वस्त 'ड्रोन्स'चा प्रभावी वापर करेल, याचा अंदाज लावण्यात अमेरिका अपयशी ठरली. भारताला हिंदी महासागर आणि आपल्या सीमांवर अशाच प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागू शकतो.

**धडा:-** नावीन्यपूर्ण डावपेच वापरणाऱ्या छोट्या राष्ट्रासमोर मोठी नौदले किंवा वायुसेना हतबल ठरू शकतात. रशिया-युक्रेन युद्धातही हेच सिद्ध होत आहे, जिथे ड्रोन्सच्या मदतीने युक्रेन रशियन सैन्याला कडवी झुंज देत आहे. केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरेसे नाही, तर त्याचा नावीन्यपूर्ण वापर करून शत्रूच्या एक पाऊल पुढे राहणे आवश्यक आहे.

**भारतासाठी अंमलबजावणी-** भारताने 'न्टी-ड्रोन' तंत्रज्ञान आणि विकेंद्रित संरक्षण प्रणालीमधील गुंतवणूक वाढवणे गरजेचे आहे. केवळ 'विमानवाहू नौका'सारख्या मोठ्या प्रकल्पांवर अवलंबून न राहता, 'ड्रोन स्वार्म्स' आणि असममित धोक्यांपासून व्यापारी मार्ग सुरक्षित करण्याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

**माहिती आणि मानसशास्त्रीय युद्ध-** या संघर्षात माहिती नियंत्रण, प्रचार आणि धारणा व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत.

**भारतासाठी धडा:-** मजबूत माहिती युद्ध धोरण विकसित करणे. चुकीच्या माहितीचा प्रतिकार करणे. मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा सक्रिय वापर.

**अंतर्गत स्थैर्य : खरी ताकद-** इराणमधील अंतर्गत अस्थिरतेमुळे त्याच्या बाह्य धोरणांवर परिणाम झाला आहे.

**भारतासाठी धडा:-** सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थैर्य हे राष्ट्रीय सुरक्षेचे मूळ आहे. अंतर्गत एकता टिकवणे अत्यावश्यक आहे. कारण, कोणतेही राष्ट्र अंतर्गत एकात्मतेशिवाय दीर्घकालीन संघर्ष सहन करू शकत नाही

**रणनीतिक स्वायत्तता आणि बहुपक्षीय संतुलन-** इराणच्या तुलनेत भारताने संतुलित परराष्ट्र धोरण स्वीकारले आहे.

**भारतासाठी धडा:-** बहुपक्षीय धोरण सुरू ठेवणे, विविध जागतिक शक्तींशी संतुलित संबंध राखणे, कोणत्याही एका गटावर

**आणि तणाव नियंत्रण-** या संघर्षात तणाव असूनही पूर्ण युद्ध झालेले नाही, यामागे प्रतिबंध हा महत्त्वाचा घटक आहे. भारतासाठी धडा आहे की, विश्वासार्ह अणू प्रतिबंध कायम ठेवणे, तणाव नियंत्रणासाठी यंत्रणा विकसित करणे, सेकंड-स्ट्राईक क्षमता मजबूत करणे.

**दीर्घकालीन युद्धासाठी संयम-** इराण संघर्षाने दाखवून दिले आहे की, आधुनिक युद्धे दीर्घकालीन असतात आणि त्यात स्पष्ट विजय नसतो.

भारतासाठी धडा आहे की, दीर्घकालीन संघर्षासाठी तयारी करणे, आर्थिक आणि लष्करी सहनशक्ती वाढवणे, जलद विजयाऐवजी टिकाऊ धोरणावर भर देणे. (पान ६ वर)

---

# स्थलांतराच्या सावलीत वाढणारं बालपण

पोरकी पोरं
डॉ. तुषार सावरकर

शहरांचा विस्तार झपाट्याने होत आहे. उंच इमारती, रुंद होत जाणारे महामार्ग, औद्योगिक प्रकल्प आणि सतत वाढणारी शहरी अर्थव्यवस्था या सर्व विकासाच्या मागे लाखो स्थलांतरित कामगारांचे अथक श्रम दडलेले आहेत. परंतु या विकासाच्या चमकदार चित्राच्या सावलीत एक वेदनादायी वास्तवही उभे आहे. शहरांच्या उभारणीसाठी काम करणाऱ्या या कामगारांच्या मुलांचे बालपण आणि शिक्षण अनेकदा सततच्या स्थलांतरात हरवत आहे. ही मुलं शहरांच्या विकासात दिसत नाहीत, पण त्या विकासाची किंमत मात्र त्यांच्या हरवलेल्या बालपणाने आणि तुटलेल्या शिक्षणाने मोजली जात आहे.



भारतात स्थलांतर हा अत्यंत मोठ्या प्रमाणावर घडणारा सामाजिक आणि आर्थिक प्रवाह आहे. २०११ च्या जनगणनेनुसार देशात सुमारे ४५ कोटींहून अधिक लोक स्थलांतरित आहेत. यामध्ये रोजगाराच्या शोधात शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराचा मोठा वाटा आहे. या स्थलांतरित कुटुंबांसोबत त्यांची लहान मुलंही स्थलांतरित होतात. अंदाजे ६ ते १४ वयोगटातील सुमारे १.०७ कोटी मुले अशा कुटुंबांमध्ये राहतात जिथे किमान एक सदस्य हंगामी स्थलांतरित आहे. परंतु या मुलांसाठी स्थलांतर म्हणजे संधी नव्हे, तर अनेकदा शिक्षणापासून दूर जाण्याची सुरुवात ठरते. अभ्यासानुसार, ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर झाल्यानंतर प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण ५३ टक्क्यांवरून थेट १८ टक्क्यांपर्यंत घसरते. याचा अर्थ असा की, स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणावर मुलं शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर पडतात. याचप्रमाणे १५ ते १९ वयोगटातील स्थलांतरित कुटुंबांतील मुलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण सुमारे २८ टक्के असल्याचेही विविध अभ्यासांतून दिसून येते.

स्थलांतरित कामगारांची मुलं बहुतेक वेळा बांधकाम साईट, वीटभट्ट्या, साखर कारखाने, औद्योगिक प्रकल्प किंवा हंगामी शेतीकामाच्या ठिकाणी वाढतात. पालक दिवसभर श्रम करत असताना मुलं त्या परिसरातच वाढत राहतात. काही मुलं लहान भावंडांची देखभाल करतात, काही घरकामात मदत करतात, तर काही वेळा ते स्वतःही छोट्या कामांत गुंततात. अशा परिस्थितीत शिक्षण ही त्यांच्या आयुष्यातील प्राथमिकता राहत नाही; कारण त्यांच्या दैनंदिन जीवनात जगणं आणि काम करणं हीच मोठी वास्तवता बनते. या परिस्थितीत स्थलांतरित कामगारांच्या मुलींची अवस्था अधिकच दयनीय होते. त्या केवळ गरिबी आणि शिक्षणाच्या अभावामुळे वंचित राहत नाहीत तर लिंगभेदामुळे त्यांच्यावर घरकाम, भावंडांची जबाबदारी आणि लवकर लग्नाचा दबाव येतो. त्यामुळे त्या दुहेरी वंचिततेच्या चक्रात अडकतात. या परिस्थितीचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे शिक्षणातील सातत्याचा पूर्ण अभाव. एखादं मूल गावात शाळेत जात असताना कुटुंब शहरात स्थलांतरित झालं, तर त्याचं शिक्षण अचानक थांबतं. नवीन ठिकाणी प्रवेश मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे नसतात, भाषेची अडचण असते किंवा कुटुंबाला पुन्हा काही महिन्यांत दुसऱ्या ठिकाणी जावं लागणार असतं. परिणामी अनेक मुलं शाळेबाहेर राहतात आणि हळूहळू शिक्षणापासून पूर्णपणे तुटून जातात. भाषेचा प्रश्नही स्थलांतरित मुलांसाठी गंभीर ठरतो.

एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर झाल्यास शाळेतील भाषा पूर्णपणे वेगळी असते. त्यामुळे वर्गात शिकवले जाणारे विषय समजून घेणे, स्वतःला व्यक्त करणे आणि शिक्षणाशी जुळवून घेणे त्यांच्यासाठी कठीण बनते. शिक्षकांनाही अशा मुलांकडे विशेष लक्ष देण्यासाठी वेळ आणि संसाधनांची मर्यादा असते. शिक्षणाच्या अडचणींबरोबरच या मुलांना सामाजिक आणि भावनिक अस्थिरतेलाही सामोरं जावं लागतं. सतत बदलणारी ठिकाणं, कायमस्वरूपी मित्रमंडळींचा अभाव आणि अस्थिर वातावरण या सगळ्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. काही अभ्यासांनुसार स्थलांतरित कामगारांच्या मुलांमध्ये नैराश्याचे प्रमाण सुमारे ३९ टक्के आणि चिंतेचे प्रमाण २७ टक्क्यांपर्यंत आढळते. ही आकडेवारी त्यांच्या अस्थिर आणि असुरक्षित जीवनस्थितीचे संकेत देते. आरोग्याच्या बाबतीतही या मुलांची परिस्थिती चिंताजनक आहे. महाराष्ट्रातील काही आदिवासी आणि स्थलांतरित पट्ट्यांमध्ये मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण ६० ते ७० टक्क्यांपर्यंत जास्त असल्याचे काही अभ्यासांमध्ये नमूद करण्यात आले आहे. स्थलांतरामुळे अनेक मुलं नियमित आरोग्यसेवा आणि लसीकरणापासूनही वंचित राहतात. कारण कुटुंब एका ठिकाणी स्थिर राहत नसल्यामुळे आरोग्य व्यवस्थेचा सातत्यपूर्ण लाभ त्यांना मिळत नाही.

कोविड-१९ महामारीच्या काळात या समस्येचं गंभीर स्वरूप अधिक स्पष्ट झालं. टाळेबंदीत लाखो स्थलांतरित कामगार आपल्या गावाकडे परतले आणि त्यांच्यासोबत त्यांच्या मुलांचं शिक्षण विस्कळीत झालं. ऑनलाईन शिक्षणाची सुविधा बहुतेक स्थलांतरित कुटुंबांना उपलब्ध नव्हती. परिणामी अनेक मुलं पुन्हा शाळेत परतलीच नाहीत. या परिस्थितीकडे केवळ दारिद्र्याच्या समस्येप्रमाणे पाहणं पुरेसं नाही. हा प्रश्न शैक्षणिक धोरण, सामाजिक संरक्षण आणि स्थलांतरित कामगारांच्या हक्कांशी थेट जोडलेला आहे. जेव्हा कुटुंब कामाच्या शोधात स्थलांतर करतं, तेव्हा त्यांची मुलंही त्या प्रक्रियेचा भाग बनतात. परंतु त्यांच्यासाठी शिक्षणाची सातत्यपूर्ण व्यवस्था अनेकदा अस्तित्वात नसते. काही ठिकाणी या समस्येवर उपाय शोधण्याचे प्रयत्न झाले आहेत.


काही राज्यांमध्ये बांधकाम साईटवर तात्पुरत्या शाळा किंवा शिक्षण केंद्रं सुरू केली जातात. काही स्वयंसेवी संस्था स्थलांतरित मुलांसाठी विशेष शिक्षण कार्यक्रम राबवतात. काही शाळा स्थलांतरित मुलांना लवचीक प्रवेश देण्याचा प्रयत्न करतात. हे प्रयत्न अजूनही मर्यादित प्रमाणात आहेत. स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था ही अपवादात्मक उपक्रमांवर नव्हे, तर व्यापक आणि संस्थात्मक धोरणांवर आधारित असावी. यासाठी काही महत्त्वाच्या उपाययोजना आवश्यक आहेत. सर्वप्रथम स्थलांतरित मुलांसाठी लवचीक आणि पोर्टेबल शिक्षण व्यवस्था विकसित करणे गरजेचे आहे, (पान ६ वर)

---

# बी पॉझिटिव्ह

कथा
बबन मोहरील

त्या रात्री पाऊस धो-धो पडत होता अगदी वैऱ्यासारखा. विजा नागासारख्या फुत्कारत होत्या. एखाद्या संतापलेल्या बाईने भांडावे असे ढग गडगडत होते. राम अंथरूणावर पडला होता. बाहेर पावसाच्या धारा कोसळत होत्या तर रामच्या डोळ्यातून अश्रूंच्या अगणित धारा ओघळत होत्या. तो सारखा ओक्साबोक्शी रडत होता आणि स्वतःलाच कोसत होता. किती मेहनत केली मी!



बाबांनीसुद्धा माझ्यासाठी हाडाची काडे केली आणि मला पुण्यात एमपीएससीसाठी पाठवले. काहीही कमी पडू दिले नाही माझ्या शिक्षणात! आणि मी काय तर एमपीएससीच्या परीक्षेत आज तिसऱ्यांदा अपयशी ठरलो. एवढ्यात मोबाईलची रिंग वाजली. रामने मोबाईल हाती घेतला. बाबांचा फोन होता. त्याचे हात फोन उचलण्यास पुढे जात नव्हते. आता बाबांना काय सांगावं... तुमचा मुलगा तिसऱ्यांदाही परीक्षेत अपयशी ठरला. त्याच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं होत. शेवटी रिंग बऱ्याच वेळपर्यंत वाजली आणि कॉल कट झाला. पाऊस वाढतच चालला होता. बाहेरचे पारिजातकाचे झाड हळूच खिडकीतून आत डोकावले. पावसापासून ते आडोसा शोधत असावे कदाचित.

अगदी चिंब झाले होते ते पावसाने! कुडकुडत होते. बाप रे बाप! किती तो पाऊस! या वर्षीच्या उन्हाने तर जीवाची एवढी लाही-लाही केली की, माझे संपूर्ण अंतरंग सुकून गेले होते, जीवच नव्हते शरीरात. पावसाने मात्र माझे अंतरंग पुन्हा बहरले, पण आजचा हा पाऊस नकोसा झालाय. पावसाने डोलणाऱ्या पारिजातकाकडे रामचे लक्ष गेले. पारिजातक पुटपुटत होता...

पारिजातकाचे बोलणे ऐकले असावे त्याने. तो परिजातकाकडे एकटक पाहू लागला आणि विचार करू लागला. हा पारिजात उन्हाळ्यात अगदी सुकून गेला होता आणि मरणासन्न झाला होता. पण याला पुन्हा बहर आला. कारण त्याच्यात प्रगल्भ इच्छाशक्ती असावी. मी मात्र या अपयशाने एवढा का खचलो? एवढ्यात मोबाईलची पुन्हा रिंग वाजली. रामने मोबाईल हाती घेतला. पुन्हा बाबांचा फोन होता.

यावेळी त्याने लगेच उचलला आणि दबक्या आवाजात 'बाबा बोला' असं म्हणाला! समोरून आवाज आला, ''आज तुझा परीक्षेचा निकाल होता हे मला माहिती होते आणि तू त्यात अपयशी झाला हेसुद्धा मला माहिती आहे. कारण जर तू पास झाला असता तर तुझा सर्वात आधी मला फोन आला असता. तू अपयशाने खचला आहेस हे मला कळतयं, म्हणूनच तू पहिल्या वेळी फोन उचलला नाही. कारण बाबांशी कोणत्या तोंडाने बोलावे, असे तुला वाटले असेल. बेटा तुझा बाप शेतकरी!

दरवर्षी नशीब गहाण ठेवून बियाणे शेतात पेरतो. शेती करणे म्हणजे जुगार खेळणेच म्हणावे लागेल. कधी पाऊस येतो, कधी येत नाही, कधी पीक होतं, कधी होत नाही. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ. पण आजपर्यंत तुझ्या बापाने शेती कसणे बंद केले नाही. माहीत आहे कशामुळे? इच्छाशक्ती आणि सकारात्मकतेच्या बळावर! ती सकारात्मकता आणि इच्छाशक्ती माणसाला जगायला शिकवते आणि नवी उमेद देते. आणि त्याच्याच आधारावर उन्हाळ्यात सुकलेल्या झाडाला पावसाळ्यात पुन्हा बहर येतो. कारण परिस्थिती बदलते; ती प्रत्येकदा अनुकूलच असेल किंवा प्रतिकूलच असेल असं नाही. फक्त आपल्यात इच्छाशक्ती आणि पॉझिटिव्हिटी असणे गरजेचे आहे. यावरच तर जीवनाचा खेळ अवलंबून आहे.'' राम आता शांत झाला होता.

बाबांच्या शब्दांनी त्याला जणू नवचेतना मिळाली होती... ''टेंशन घेऊ नको, पुन्हा कामाला लाग..' असं म्हणत बाबांनी फोन ठेवला. राम उठला आणि एकदम पारिजातकाकडे टक लावून पाहू लागला.

पारिजात त्याला पाहून हसला आणि म्हणाला, 'लाग की मग कामाला आता. बी पॉझिटिव्ह हो अगदी माझ्यासारखा' म्हणत पुन्हा त्याने पावसात उडी मारली आणि भिजू लागला.

---

## गर्मीची लाट



ओसरली थंडी,
मावळली दिवाळी पहाट
बसला उन्हाचा तड़ाखा,
जाणवते गर्मीची लाट
झाले सिमेंटचे रस्ते,
लागले रस्त्याकाठी गड्डू
मातीची कमतरता भासते,
वाटते यातून कसे सुटू

कापली झाडं, वाळली जम
ीन, ओसरली हिरवळ
चूक केली भारी,
आता शरीराची होते कळवळ
कूलर, पंखे, एसी,
गर्मीला मात देण्याची उपकरणें
यांचाच आभार मानावा,
घरात वापरून शांतपणे
संपलं निष्ठूर मनाचन प्रेम,
कमतरली झाडांवरची माया
अन् मनी लावली झाड़,

नाही जगली, गेल
निसर्गवाया
पशु, पक्षी, जनावर,
जे जगत होते याच झाडांवर
आता कोसत आहे माणसाला
कारण जगाव लागते आहे
उकाड्यावर
कमी पाऊस, ओसरल्या
नद्या, जल संकट भारी
शहरात टँकर, गावात पाई,
अशी निघते पाण्याची वारी

जर जपलं नाही पाणी
तर वाटेल त्याची उणीव
पुढच्या पिढींना काय देणार,
याची होत नाही जाणीव
माणसाने केली प्रकृतीची
छेडछाड मग नक्कीच
होणार अमंगल ही माणसाची
निष्काळजी, तर गर्मीने केला
दंगल सोडला निसर्गाचा
साथ, आता कशी होणार
चंगल

विजय हरदास

वळणावरच्या नोंदी — स्वाती काळे



(भाग एक)

# उंटावरचा फकीर

चाळीस वर्षांचा तो इसम आपल्या दोन गुलामांसह रात्र-दिवसाची पर्वा न करता सतत पायपीट करीत होता. त्याकाळी आशिया खंडातील बॅबीलोन म्हणजे अतिशय समृद्ध असे प्राचीन सांस्कृतिक केंद्र होते. तेथील समृद्ध संस्कृती बघणे हे टायनाच्या प्रत्येकाचे स्वप्न असायचे. त्याला वाटेत 'निनेवे' गावात डॅमिस नावाचा भला माणूस भेटला. दोघांची गट्टी जमली. कारण डॅमिसला तेथील रस्त्यांचे आणि भाषांचे ज्ञान होते. अपोलोनियसने हेरले की, या माणसाचा म्हणजेच डॅमिसचा आपल्याला पुढे फार उपयोग होणार आहे. होय, त्या पायपीट करणाऱ्या प्रवासवेड्या इसमाचे नाव अपोलोनियस होते. त्याच्याबरोबर असणाऱ्या डॅमिसनेच अपोलोनिअस समवेत केलेल्या प्राचीन भारताच्या प्रवासनोंदी केल्या. म्हणून भारताच्या प्राचीन इतिहासात अपोलोनियससोबत डॅमिसलाही महत्त्वाचे स्थान आहे.

बॅबीलोनला दरमजल करीत प्रवास करीत असताना अचानक डॅमिसला स्वप्नात दृष्टांत मिळाला की, तुम्ही अगोदर सिसीयाला जा. तेथे पेट्रोलियमच्या विहिरींजवळ ग्रीक बोलणारे एरेट्रियाचे लोक ५०० वर्षांपूर्वीच स्थायिक झाले आहेत. त्यामुळे असा वळसा घेऊन दोघे नंतर बॅबीलोनला गेलेत. तेथे १८ महिने राहून भारतात जाण्यास निघाले. इसवी सनाच्या पहिल्या अर्धशतकात तुर्कस्तानातील टायना नगरातील अपोलोनिअसने भारतात प्रवास केला होता, त्याची ही गोष्ट. तो राजदूत नव्हता. व्यापारीही नव्हता. त्याला कोणत्या युद्धातही रस नव्हता. हा एकमेव ग्रीक असावा ज्याला भारताचे समाजमन जाणून घ्यायचे होते. आपल्या चालीरीती काय आहेत, याबद्दल त्याला उत्सुकता होती. आपल्या धर्माबद्दल त्याला जाणून घ्यायचे होते. त्याच्या भारतातील प्रवासाबद्दल फिलोस्ट्रेटस या चरित्रकाराने लिहिले आहे. लहानपणापासूनच अपोलोनिअसचा पायथागोरसच्या तत्त्वज्ञानामध्ये रस होता. पायथागोरसच्या तत्त्वज्ञानात अंकशास्त्राला महत्त्व होते. सबंध विश्व अंकांच्या सुसंवादाने चालते. विश्वाला आकड्यांनी तोललेले आहे, असे पायथागोरसच्या तत्त्वज्ञानात म्हटलेले आहे. हिंदू संस्कृतीप्रमाणेच पायथागोरसच्या तत्त्वज्ञानामध्ये आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास होता. अपोलोनियसने या तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्यानंतर त्याने कधी दारूला स्पर्श केला नाही. मांसाहार वर्ज्य करून तो ब्रह्मचर्याचे पालन करू लागला. त्याचे केसही त्याने कधी कापले नाहीत आणि तब्बल पाच वर्षे तो एकांतवासात होता. खिशात एकही दमडी नसताना अपोलोनियसने इटली, पर्शिया, इजिप्त आणि भारतात पहिल्या शतकाच्या सुमारास खडतर प्रवास केला.

बॅबीलोनला १८ महिने घालवून अपोलोनियस आणि त्याचा मित्र डॅमिस रणरणत्या उन्हात उंटावर बसून भारतात जायला निघाले. तिथल्या पार्थियन राजाने सोबत वाटाड्याही दिला होता. अनेक सुंदर खेड्यांतून त्यांचा प्रवास सुरू होता. त्यांच्या उंटालादेखील सोन्याच्या थाळीतून चारा मिळत असे. ग्रामस्थ त्यांना राजाचे पाहुणे म्हणून चांगली वागणूक द्यायचे. हिंदकुश पर्वताच्या पायथ्याशी सुगंधी वारा अंगावर येऊ लागला आणि त्यांना भारताचे वेध लागले. रात्री चंद्रप्रकाश पसरलेला होता. त्या प्रकाशात त्यांच्यामागे एक भयंकर चेटकीण लागली. अपोलोनियसने तिचे वर्णन ग्रीक मिथक कथेतील 'एम्पुसा' असे केले आहे. त्यांनी खूप प्रयत्नांनी तिला हाकलून लावले. अपोलोनियस तेथील लोकांचे वर्णन करतांना म्हणतो, डोंगराळ भागातले लोक चार हात उंच आहेत. मात्र सिंधू नदीपलीकडे लोक पाच हात उंच आहेत. पर्वताच्या शिखरावर पोचताना वाटाड्याने सांगितले होते की, आपण देवलोकी चाललो आहोत. चढणीचा रस्ता एवढा निमुळता होता की, त्यांना उंट तात्पुरते पायथ्याजवळच सोडून द्यावे लागले. आता ते पायी चालत वरची चढण चढू लागले. तेवढ्यात तेथील एक आदिवासी त्यांच्याजवळ येत त्यांची विचारपूस करू लागला. प्रवाशांना भारतात जायचे आहे ऐकून त्याच्या आनंदाला उधाण आले. मद्य, मध आणि नुकतीच शिकार केलेल्या सिंहाचे तुकडे त्याने त्यांच्यासमोर ठेवले. प्रवाशांनी फक्त मद्य आणि मध ठेवून घेतले आणि पुन्हा ते पूर्व दिशेला चालू लागले. ते थकून एका सरोवराजवळ थांबले असताना तेथे बरेच भारतीय धुंद होऊन गाताना, नृत्य करताना त्यांना दिसले. त्यांच्याजवळ असलेल्या तांबे आणि जस्ताच्या भारतीय चलनी नाण्यांवर इतर कोणत्याही परकीय राजसत्तेची मोहोर उमटलेली नव्हती.

भारताचे सार्वभौमत्व नाण्यांच्या रूपात दिसत होते. नंतर त्यांनी काबुल नदी बोटीतून पार केली. ती खोल नव्हती त्यामुळे उंटही नदीतून जाऊ शकले. आता त्यांना निसा पर्वत दिसू लागला होता. हा पर्वत दंतकथेतील पर्वत आहे असे म्हणतात. पण त्या काळात अपोलोनियसला मात्र तो दिसला. त्याच्या शिखरावर मद्यदेवाचे गोलाकार मंदिर होते. सभोवती द्राक्षाच्या वेली होत्या. द्राक्षाच्या वेली मद्यदेवानेच लावल्या असे म्हणतात. चिरतरुण मद्यदेवाची मूर्ती मंदिराच्या मधोमध बसविण्यात आली होती. ग्रीक इतिहासकारांच्या मते अलेक्झांडरने या पर्वतावर विजय साजरा केला होता. अपोलोनियसच्या म्हणण्यानुसार अलेक्झांडर कधीच या पर्वतावर चढला नाही. कारण त्याला भीती होती की, सैनिकांना मद्यधुंद अवस्थेत त्यांचे घर आठवेल. निसा पर्वतराजीपासून जवळच असलेला 'ओर्नस' डॅमिस आणि अपोलोनियस यांनी दुरूनच पाहिला. १५ हात उंच असलेल्या ओर्नसवर एकही पक्षी त्याचे पंख पसरवायचा नाही कारण तेथे गेल्यावर तो खोल खाईतच जायचा आणि पुन्हा वर येऊ शकायचा नाही. सिंधू नदी पार करीत असताना त्यांना हत्तीवर बसलेला मुलगा भेटला. आपल्या जवळच्या काठीने तो हत्तीला वठणीवर ठेवत होता. तेथेच त्यांनी ३० हत्तींचा कळप जिवाचा आकांत करून पळताना पाहिला. त्यांच्या मागे शिकारी लागले होते. सिंधू नदी पार करतानाची हत्तींची सफाई पाहून अपोलोनियस अचंबितच झाला. त्यांनी त्यांची पिल्ले पहिल्यांदा पाण्यात सोडली होती. त्यानंतर त्यांच्या आया हत्तिणी पाण्यात उतरल्या आणि त्यांच्या सोंडेने आणि सुळ्यांनी त्यांना पकडून घेऊन जाऊ लागल्या. सर्वात शेवटी महाकाय हत्ती पाण्यात उतरले. खरोखरीच, हत्ती आपल्या मालकावर खूप प्रेम करतात, असे अपोलोनियसने लिहून ठेवले आहे. आपल्या मालकाच्या हातून ते जेवण घेतात. त्याला सोंडेने कुरवाळतात. रात्र होत जाते आणि तेव्हा मात्र त्यांना आपल्यावर लादलेल्या गुलामगिरीची आठवण होते. त्यामुळे ते करुण आकांत करतात. पण जेव्हा त्यांचा मालक त्यांच्याजवळ येतो तेव्हा त्याचा मान ठेवत आपला आक्रोश ते हृदयातच लपवितात.

अपोलोनियस म्हणतो, भारतीयांच्या मते, दलदलीच्या प्रदेशात राहणारा हत्ती मूर्ख आणि आळशी असतो. त्याला काळा किडकिडीत एखादाच सुळा असतो. डोंगराळ भागातले हत्ती अतिशय धूर्त आणि क्रूर असतात. त्यांना त्यांच्या मालकाशी इमान नसते. प्रेम तर नसतेच नसते. त्यांचे सुळे छोटे आणि शुभ्र असतात. पठारी प्रदेशावरचे हत्ती मात्र अतिशय इमानदार, मनमिळावू आणि युद्धाला योग्य असतात. त्यांचे सुळे अतिशय लांब आणि पांढरेशुभ्र असतात. युद्धात प्रसंगी त्यांच्या सोंडेतूनही ते बाण सोडतात. अशा हत्तींचे आयुष्य खूप मोठे असते. अपोलोनियसने तक्षशिलेत ३५० वर्षांपूर्वी अलेक्झांडर राजाविरुद्ध युद्धात लढणाऱ्या 'अजाझ' नावाच्या हत्तीला पाहिले होते. त्याच्या सुळ्यांवर सोन्याने कोरलेले होते, 'अजाझ, एक सूर्य; अलेक्झांडर, ज्युपिटरच्या मुलाकडून.' सामान्य जनता फार प्रेमाने त्याच्या जखमा बऱ्या व्हाव्यात म्हणून लेप लावायची. त्याला सुगंधी फुलांचे हार घालायची. आता सिंधू नदी ओलांडायची होती. त्यांच्या वाटाड्याने अगोदर एवढी मोठी नदी कधी ओलांडली नव्हती. त्यामुळे तेथील प्रांतपालाला त्याने पत्र लिहून मदत मागितली. प्रांतपालाने त्यांच्या बोटी पुरविल्या आणि अपोलोनियसला जहाज दिले. अशारीतीने या उंटावरच्या फकिराने सिंधू नदी ओलांडली आणि तो तक्षशिलेत आला.

आनंद स्पंदन — डॉ. अविनाश मोहरील

# कुर्यात सदा मंगलम्



आपल्या देशात विवाह संस्कार हा एक उच्च दर्जाचा संस्कार समजला जातो. अगदी पुरातन काळापासून विवाह संस्कार हा सामाजिक एकोप्याचे प्रतीक मानला गेला आहे. समाजशास्त्रामध्येही विवाहाचे विविध प्रकार, त्यामधून जोडली जाणारी नाती, त्या निमित्ताने जोडली जाणारी कुटुंबे व पती-पत्नी या नात्यात बांधल्या जाऊन एकमेकांना पूरक ठरणारी जोडपी, त्यांच्या संबंधातून वाढत जाणारा परिवार याबद्दल विस्तृतपणे अनेक अभ्यासकांनी आपली मते मांडलेली आहेत.

आपल्या पूर्वजांनी फार विचारपूर्वक हा विवाह संस्कार निर्माण केला. ज्यामधून पती- पत्नीच्या नात्यात बांधल्या जात असलेल्या दोघांना समाजाच्या साक्षीने विवाहोत्तर जबाबदारींचे भान निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो. विवाह संस्कारामधील सारे विधी व पद्धती अत्यंत विचारपूर्वक मांडलेले दिसतात. अर्थात हे सारे मांडत असताना त्यांनी सामाजिक बदलांचादेखील विचार केला असणार. परंतु समाज एवढ्या मोठ्या प्रमाणात बदलू शकतो, याचा कदाचित त्यांना अंदाज आला नसावा.

पूर्वीच्या काळी राबविल्या गेलेल्या या लग्न संस्कारामध्ये काळानुरूप व गरजेनुसार बदल झाल्याचे आपल्याला दिसतात. जसे 'सिमांत पूजन' हा उपचार गावाच्या वेशीवरून मंगल कार्यालयात पोहोचला. चार दिवस चालणारा लग्न सोहळा आता दीड दिवसावर आलेला आहे. असे असले, तरीही त्यातील सत्त्व मागच्या दशकापर्यंत कायम होते. आता मात्र या लग्न संस्कारामधील महत्त्व, जबाबदारीची जाणीव, उपचारांमधील गांभीर्य सारे काही संपुष्टात आलेले आहे व उरलाय तो केवळ फोटोग्राफीक देखावा. या स्थितीपर्यंत लग्न संस्कार पोहोचण्यास काही अन्य सामाजिक कारणेही कारणीभूत आहेतच.

मागच्या दशकापर्यंत लग्न सोहळा म्हणजे वरपक्षाच्या लोकांची वधुपक्षाच्या मंडळींनी जीहुजुरी करणे असा प्रकार बनला होता. हुंड्यासारख्या अत्यंत लांछनास्पद पद्धती या संस्काराशी जोडल्या गेल्यामुळे याकडे बघण्याचा दृष्टिकोन म्हणजे वरपक्षाकडून वधुपक्षाची लूट असाच बनला होता. यामुळेच मुलगी म्हणजे ओझे असा हीन विचार प्रस्थापित होऊन आपल्या या तथाकथित पुढारलेल्या समाजातही अनेक मुलींना भ्रूणस्थितीतच जीव गमवावा लागला. आता मात्र स्थिती बदलली. या सर्व बाबींचा एक वाईट परिणाम झाला; तो म्हणजे या लग्न संस्कारावरील विश्वासच उडाला व त्यातील गांभीर्य संपून तो केवळ देखावा बनलेला आहे. त्यामुळे खरे तर असे वाटायला लागते की, यापुढे हे सारे देखाव्यासाठी केले जाणारे सर्व उपचार बंद करून नोंदणी पद्धतीने विवाह केला जावा व त्या पती-पत्नीने सुखाने नांदावे. देखाव्यासाठी लग्न असा उल्लेख केला जावा अशा एका लग्नात मला हा अनुभव आला. मी कार्यालयात पोहोचलो तेव्हा लग्नाच्या मुहूर्ताला १५ मिनिटे शिल्लक होती. मी बरोबर वेळेवर पोहोचलो होतो. परंतु नवरदेव आणि त्याचे कुटुंबीय मारुती मंदिरात दर्शन घेऊन परतायचीच होती.

मुलीचे वडील वारंवार घड्याळ बघत कासाविस होत होते. मुहूर्त टळू नये अशी त्यांची हार्दिक इच्छा होती. शास्त्रोक्त पद्धतीने विवाह करण्याचे त्यांनी ठरविले असल्याने त्यांचा जीव वर-खाली होत होता. परंतु वरपक्षाची मंडळी डीजे लावून नाचत होती. बँडसोबत स्वतंत्रपणे डीजे हे एक नवे प्रकरण आहे. त्याच्या त्या कर्णकर्कश आवाजासोबत अख्खा वरपक्ष नाचत होता. मुहूर्ताच्या पुढे अर्धा तासानंतर कसाबसा तो नवरा मुलगा मंगल कार्यालयात पोहोचला. त्याचे मित्र तर बाहेर नाचतच राहिले. त्यानंतर वर व वधू अंतरपाटाच्या दोन्ही बाजूने उभे राहिले. तेथे दृश्य फारच आकर्षक होते. सिनेमाच्या शूटिंगमध्ये असतात तशा छत्र्या वगैरे तेथे लावण्यात आल्या होत्या. लग्नाच्या फोटो व व्हिडीओ शूटिंगसाठी खास मुंबईहून फोटोग्राफर आले होता. त्याने त्या छत्र्या, रिफ्लेक्टर्स वगैरे काय काय योजना केली होती. त्याच्या सूचनेनुसारच सर्वजणांच्या जागा ठरल्या होत्या.

गुरुजींनी मंगलाष्टके सुरू केली. कुणाचेही लक्ष त्याकडे नव्हते. सावधान म्हटल्यावर लोक यांत्रिकपणे अक्षता फेकत होते. इतकेच काय, वर-वधूचेही त्याकडे लक्ष नव्हते. कारण मंगलाष्टके सुरू असताना मुंबईच्या फोटोग्राफरचे फोटो सेशन सुरू होते. मंगलाष्टके गायली जात होती व त्यामधील विवाह संस्कारांची सूत्रे पूर्णपणे दुर्लक्षित करून नवरा मुलगा वेगवेगळ्या पोजेस देत होता. सोबतच 'सावधान' म्हटल्यावर सर्वत्र चमकी व कागदांचे तुकडे उडविणारे फटाके तेथेच फोडले जात होते. त्याकडे सर्वांचे लक्ष होते. शेवटच्या मंगलाष्टकात जेथे- आता विवाहाची घटिका आली आहे.

अंतरपाट दूर होईल व त्यानंतरच वर- वधू एकमेकांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने प्रवेश घेतील- अशा पद्धतीचे वर्णन होते. मी कुतुहलाने त्या दोघांकडे बघत होतो. त्यांना एकमेकांकडे बघण्यापेक्षा कॅमेरात बघण्यात रस जास्त होता. अंतरपाट दूर होतानाची हूरहूर, मनात दाटून आलेल्या विविध भावना, अनामिक भीती अशा कोणत्याही भावनांचा लवलेश त्या दोघांच्या वागण्यात जाणवत नव्हता. मला तर वाटले की, लग्न ठरल्यापासून ते होईपर्यंत सदोदित एकमेकांशी फोनवर बोलून बोलून व नको इतके एकमेकांना भेटून त्यांना आताच एकमेकांचा कंटाळा आला होता. किमान नावीन्य तर अजिबात नव्हते.

एकमेकांना हार घातल्यावर मांडवातील लोक सुलग्न लावण्याच्या तयारीत होते, परंतु त्यांना थांबविण्यात आले. वर व वधू वेगळा ड्रेस-अप करायला आपापल्या खोलीत निघून गेले. त्या दोघांचे माय-बाप सुलग्न लावण्यासाठी वाट बघत बसले. साधारण अर्धा तासाने वेगवेगळ्या मेक ओव्हर करणाऱ्या मंडळींकडून सजून ते दोघे तेथे आले. लोकांना वाटले चला एकदाचे आले. सुलग्न लावू आणि जेवायला पळू; पण तसे झाले नाही. या नव्या पोषाखात आता नव्याने फोटो सेशन सुरू झाले. हा अँगल, तो अँगल, असा लाईट, तसा लाईट हा सारा प्रकार पुढील अर्धा तास चालत राहिला. काही लोकांनी जेवणाच्या दिशेने मोर्चा वळविला. आधी जेवण करून घ्यावे; मग सुलग्न लावता येईल, असा व्यावहारिक विचार त्यांनी केला. त्यानंतर सायंकाळपर्यंत त्या लग्नातील सारे विधी हे असेच फोटोमय ठरले. कुणाचेही त्यामध्ये लक्ष नव्हते. गुरुजी मंत्र म्हणत राहिले आणि वरवधू यांत्रिकपणे सारे करीत राहिले. फोटो निघत राहिले आणि त्यातच सारे काही आटोपले. वरात निघाली; स्वाभाविकपणे निरोपाच्या वेळी वधू रडत होती. त्याचेही शूटिंग स्टँडवर चढून चढून घेतले जात होते. एकंदरीत काय, त्या विवाह संस्कारातील संपूर्ण सत्त्व हरविलेले होते व तो केवळ फोटोग्राफीक सोहळा उरला होता. असे होणार असेल तर कशाला हवाय तो सोहळा आणि ते विधी. नव्या जगात तथ्यहीन ठरत असलेल्या या गोष्टी खरोखरीच मोडीत काढायला हव्यात.

शास्त्रोक्त या नावाखाली जर केवळ आणि केवळ देखावाच होत असेल तर हे प्रकार बंद व्हायला हवेत. त्यातील सत्त्व संपल्यामुळे व त्या संस्कारांचे अर्थ आपल्या मनापर्यंत पोहोचणे बंद झाल्यामुळे त्याचे काहीच वाटेनासे झाले आहे. सामाजिक बदलांच्या ओघामध्ये झालेले हे प्रकार आहेत. परंतु या असल्या सत्त्व हरविलेल्या प्रकारांना बुद्धिवाद्यांनीच विरोध करायला हवा. या असल्या देखावा समांभामध्ये होत असलेल्या व्यर्थ खर्चापेक्षा त्याचा विनियोग चांगल्या कार्यासाठी व वरवधूच्या भविष्यासाठी केला जाऊ शकतो. आपली अडचण अशी आहे की, आपण संस्कार पूर्णपणे सोडू शकत नाही व ते आवश्यक त्या पद्धतीने आपल्याकडून पाळल्याही जात नाहीत. या सोबतच संस्कार सांभाळणारी मंडळी त्या संस्कारामागील वैज्ञानिक व सामजिक दृष्टिकोन समजावून देण्यात अपयशी ठरले आहेत. त्यामुळे केवळ -आधीच्या पिढीने केले म्हणून तुम्ही करा- हा नियम आता मान्य होणारच नाही. एकंदरीत स्थिती अवघडलेली आहे. परंतु त्यावरील उपाय व्यावहारिकतेने व तर्कबुद्धीने आपल्यालाच काढता येऊ शकतो. त्याचा प्रयत्न होण्याची नितांत गरज आहे असे वाटते. अन्यथा 'कुर्यात सदा मंगलम्' याला अर्थच उरणार नाही.



विवेचन — श्रीरंग श्री. हिर्लेकर

# अये बाले लीलावति



भास्कराचार्य हे फार मोठे ज्योतिषी आणि गणिती होते. गणिताशिवाय ज्योतिषशास्त्रात गती शक्य नाही. गणित येत नसेल त्याने ज्योतिष शिकूच नये. कॅलक्युलेटर किंवा संगणक उपलब्ध असताना गणितात गती असण्याची गरजच काय, असेही अनेकांना वाटते. वेग आणि सूक्ष्म उत्तरासाठी यांचे महत्त्व वादातित असले, तरी गणक यंत्रे कुशलतेने चालवायची असतील तर त्यासाठी मुळात गणिताची दृष्टी आवश्यक आहे. दुर्दैवाने तिचाच अभाव दिसतो. इतकेच नव्हे, तर त्यावाचून काही अडते हेही मुळात समजत नाही. गणिताचा उल्लेख वेद आणि उपनिषद काळापासून आढळतो. शूल्बसूत्रे, गणितातील अवघड प्रमेये, शून्य आणि अनंताच्या कल्पना, दशांश, षष्ठांश पद्धती, गणिताची कतपयादी भाषा, वैदिक गणिताची सोपी सूत्रे अशी दिव्य आणि विस्तृत परंपरा आपल्याला लाभली असताना आपण ॲबॅकस आणि लॉग टेबलचे अति कौतुक का करतो, हे समजत नाही.

कलनगणित (कॅलक्यूलस) आणि शून्यलब्धी गणित हे तर आपल्याला फार पूर्वीपासून ज्ञात आहेत. छां. उपनिषदात नारद म्हणतात की, त्यांनी नक्षत्रविद्या आणि गणिताचे अध्ययन केलेले आहे. जैनांकडे चार अनुयोगांपैकी एक गणितानुयोग आहे. बुद्धधर्मानेही गुणन ही श्रेष्ठ विद्या असल्याचे म्हटले आहे. वेदांगज्योतिषाने गणिताला आपले प्रमुख अंग मानले आहे. पंचांग गणितातील सूक्ष्मता आणि अचूकता आश्चर्यकारक आहे. मुद्रा गणित म्हणजे बोटांवरील गणित, मनाने करावयाचे ते गणन आणि संख्यान् म्हणजे उच्चस्तरीय गणित. आपल्याकडील काही सहज आठवतील अशा प्राचीन गणित आणि ज्योतिषतज्ज्ञांचा उल्लेख करावयाचा ब्रह्मगुप्त, आर्यभट्ट, लगध, पुलीश, वराहमिहिर, बौद्धायन, भास्कराचार्य यांच्यासह किमान ४६ दिग्गजांची यादी माझ्याजवळ उपलब्ध आहे. सर्वांच्याच गणितातील योगदानाचा परामर्ष एका लेखात घेता येणे अशक्य असले, तरी आपल्या महाराष्ट्रातील थोर गणिती आणि ज्योतिषी भास्कराचार्य आणि त्यांचा सुप्रसिद्ध ग्रंथ 'सिद्धांत शिरोमणी' याविषयी थोडक्यात...

भास्कराचार्यांचा काळ इसवी सनाच्या १२ व्या शतकाचा, आजच्या चाळीसगावजवळच्या विज्जलविड परिसरातील ते निवासी असल्याचे पाटणादेवी मंदिर आणि बहाळ गावच्या सारजा बारजा देवी मंदिरातील दोन शिलालेख आणि नाशिक येथील एका ताम्रपटावरून समजते. भास्कराचार्य उत्तम ज्योतिषी होते. आपली कन्या लीलावती हिच्या जन्मकुंडलीचे अवलोकन करताना तिचा वैधव्य योग त्यांच्या लक्षात आला. हा कुयोग टळावा म्हणून आपल्या ज्योतिषातील प्रावीण्याच्या आधाराने विवाहाकरिता एक उत्तम मुहूर्त त्यांनी शोधून काढला. पण ब्रह्मदेवाचा लेख बदलण्याचे सामर्थ्य कोणात आहे? क्षुल्लक कारणाने मुहूर्त टळला आणि व्हायचे तेच झाले. लीलावती बालविधवा झाली.

**आदर्श पाठ्यपुस्तक:** मुलीची गणितातील रुची आणि गती बघून तिला शिकविण्याच्या निमित्ताने वयाच्या ३६ व्या वर्षी म्हणजे इसवी सन ११५० मध्ये त्यांनी १४०० श्लोकांच्या 'सिद्धांत शिरोमणी' या अद्भुत ग्रंथाची रचना केली. याचे लीलावती, बीजगणित, ग्रहगणिताध्याय आणि गोलाध्याय असे चार विभाग आहेत. अर्थात सिद्धांत शिरोमणि या ग्रंथातील सर्व सिद्धांत भास्कराचार्यांचीच निर्मिती आहे असे नाही. यातील अनेक सिद्धांत वर उल्लेखित पूर्वसूरींच्या विवेचनात आढळतात. मात्र, त्यांचे सुव्यवस्थित संकलन, कधी स्वत:च्या नवीन पद्धतींसह केलेल्या विवरण यामुळे एखाद्या आदर्श पाठ्यपुस्तकाच्या प्रस्तुतीचे श्रेय मात्र भास्कराचार्यांचेच.

**पाठांतरास सुलभता :** त्यातील पाटी गणित म्हणजे लीलावती. सर्वसामान्यांना वाटणारी गणितातील रुक्षता आचार्यांच्या काव्यातील लालित्य आणि भाषाप्रभुत्वाने मागे टाकली आणि संस्कृतात एक सुंदर रचना साकारली. 'अये बाले लीलावति' असे म्हणत त्यात अंकगणित, बीजगणित, भूमिती आणि त्रिकोणमितीची अनेक सोपी आणि क्लिष्ट सूत्रे काव्यमय पद्धतीने गुंफली. ती वाचून आचार्यांच्या गणिती बुद्धीचे कौतुक करावे की काव्यरचनेचे असा संभ्रम होतो. श्लोकबद्ध रचनेमुळे अवघड गणिती सूत्रे पाठ करण्यास सोपी होतात. सिद्धांत शिरोमणिच्या एका हस्तलिखितातील काही श्लोकातील शृंगारिक वर्णने पाहून लीलावती ही त्यांची कन्या नसून अन्य कोणी असावी, असाही प्रवाद आहे. कदाचित ते श्लोक प्रक्षिप्त म्हणजे मूळ ग्रंथात घुसवलेही असावेत.

**अंतरंग:** लीलावतीच्या ३३ प्रकरणांतून २६१ श्लोकात गणितातील अनेक संकल्पना स्पष्ट करण्यात आल्या आहेत. एका आवृत्तीत श्लोकसंख्या २८० अशीही आहे. संस्कृत व्याकरणाचे सर्व आयाम सांभाळून गणितातील अनेक सोप्या आणि क्लिष्ट कल्पना, गृहीतके, व्याख्या, उदाहरणे मांडण्यात आली आहेत. हे करताना तात्कालिक समाजमान्य कल्पना, समजुती, श्रद्धा यांचा यथेच्छ उपयोग करून घेत तसेच धार्मिक, ऐतिहासिक, पौराणिक कथा, रामायण- महाभारतादी महाकाव्ये यातील मनोवेधक प्रसंग उदाहरणे म्हणून तर घेतलीच; पण तसे करताना त्यांचाही विद्यार्थ्यांमध्ये प्रचार व संस्कार करणे हा सहहेतू असल्याचे लक्षात येते. तसेच या ग्रंथाच्या अभ्यासाने तत्कालीन नाणी, चलन, मोजमापांची विविध परिमाणे व त्यांची कोष्टके यांचाही परिचय होतो. अवघड सूत्रे शिकवताना योजलेल्या अनेक उदाहरणांतील रम्य निसर्गवर्णनांमुळे मुलांमधील गणितासंबंधीची भीती घालवणे हा उद्देश स्पष्ट दिसतो. हा ग्रंथ म्हणजे हसतखेळत शिक्षण देण्याचा आदर्श वस्तुपाठच म्हणता येईल. (पान ६ वर)

आकलन डॉ. शुभांगी पारकर

बाजीरावांनी त्यांच्या २० वर्षांच्या कारकीर्दीत ४१ लढाया लढल्या आणि ते एकमेव सेनापती आहेत, ज्यांनी या संपूर्ण लढाया जिंकल्या. त्यामुळेच साम्राज्य विस्तारून मध्य प्रदेश पार करून राजस्थान, उत्तरप्रदेश इथपर्यंत पोहोचले होते. आज युद्धशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या लढायांचा, रणनीतीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

# श्रीमंत बाजीराव पेशवे

## एक रणकुशल नेतृत्व व अपराजित योद्धा

### २८ एप्रिल रोजी बाजीराव पेशवे यांची २८४ वी जयंती आहे. त्यानिमीत्त...



श्रीमंत बाजीराव पेशवे यांची देशाला ओळख अपराजित योद्धा अशी आहे. बाजीरावांनी त्यांच्या २० वर्षांच्या कारकीर्दीत ४१ लढाया लढल्या आणि त्या सर्वच्या सर्व जिंकल्या. २८ एप्रिल रोजी बाजीराव पेशवे यांची २८४ वी जयंती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गनिमी कावा या रणनीतीचा उपयोग झाला. मात्र, बाजीराव पेशवे राज्याचे प्रमुख बनले, त्या वेळेस त्यांनी चपळ घोडदळाचा प्रामुख्याने उपयोग केला. यामागचे कारण म्हणजे, कुठलीही रणनीती निर्माण करण्यासाठी तीन गोष्टींचा विचार करावा लागतो. एक म्हणजे आपला शत्रू आणि त्याची ताकद, दुसरे आपल्याकडे असलेले सैन्य आणि तिसरे म्हणजे ज्या रणभूमीवर आपण लढत आहोत, तिची रचना. छत्रपतींनी स्वराज्य निर्माण केले, त्या वेळेस त्यांना मोगल, आदिलशाह, कुतूबशहा आणि अनेक अंतर्गत शत्रूंचा सामना करावा लागला. बाजीराव पेशवे राजे बनले, तेव्हा इतर राजेशाहीचा अस्त झाला होता आणि मोगल हेच प्रमुख आव्हान होते. मात्र, दोन्ही वेळेस मोगल सैन्याची संख्या ही मराठ्यांपेक्षा खूप जास्त होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्री डोंगराचा वापर करून मोगलांच्या सैन्याला सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात येण्यास भाग पाडले आणि त्यांच्यावर गनिमी काव्याने हल्ला करून त्यांना नामोहरम केले.

युद्धाचे डावपेच परंपरेला सोडून बाजीराव पेशव्यांच्या वेळी परिस्थिती बदलली होती. फक्त मोगल हाच शत्रू राहिला होता. स्वराज्याच्या सीमा वाढल्यामुळे सह्याद्रीच्या डोंगराळ भागातून महाराष्ट्र, मध्य प्रदेशच्या सपाट भागापर्यंत पोहोचले होते. त्यामुळे या भागात गनिमी कावा वापरणे कठीण होते. म्हणून बाजीराव पेशव्यांनी तेथे घोडदळाचा वापर करून शत्रूला पराभूत केले. बाजीराव पेशवे हे अतिशय युद्धकुशल सेनापती होते. ते परंपरेला सोडून युद्धाचे डावपेच वापरत होते. व्यक्तींमधील गुण हेरण्याचे कौशल्य त्यांच्याकडे भरपूर होते. म्हणूनच त्यांनी आपल्या हाताखाली शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले आणि इतर अनेक सरदारांना तयार केले. बाजीरावांनी युद्धाचे पहिले प्रशिक्षण वडील बाळाजी विश्वनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. अगदी लहानपणापासून त्यांनी युद्धामध्ये सहभाग घेतला आणि युद्धभूमीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. युद्धकाळात ते सैनिकांबरोबरच उघड्यावर रहायचे. त्यांच्याप्रमाणेच जेवण आणि इतर दैनंदिनी ठेवायचे. त्यामुळे सैनिकांचे त्यांच्यावर अपार प्रेम होते. प्रत्यक्ष युद्धाच्या वेळी आघाडीवर राहून, इतर सैनिकांप्रमाणे धोके पत्करून, नेतृत्व करायचे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक लढाईत त्यांना प्रचंड यश मिळायचे. कारण जीवन आणि मरणाच्या रेषेवर नेतृत्व करण्याची एकच पद्धत आहे, ती म्हणजे सैनिकांच्या आघाडीवर राहून नेतृत्व करणे. ती बाजीरावांनी प्रत्यक्षात आणली होती.


आज भारतीय सैन्यात अशाच प्रकारचे नेतृत्व कार्यरत आहे. घोड्यावर बसून सैन्याचे नेतृत्व ते स्वत: घोड्यावर बसून सैन्याचे नेतृत्व करायचे. त्यांचे सैन्य घोडदळावर अवलंबून होते. मोगलांचे सैन्य युद्धांच्या वेळी त्यांच्यासोबत कुटुंबातील सदस्य, बायका-मुले घेऊन जायचे. त्यामुळे मोगल सैनिक एका दिवसात १० ते १२ किमीच पुढे जायचे. मोगलांचे सैन्य हे छोट्या शहराप्रमाणे असायचे. प्रत्येक दिवशी हे शहर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असे. त्यामुळे त्याची हालचाल ही अतिशय मंद होती. मात्र, बाजीरावांच्या सैन्याचा पुढे जाण्याचा वेग मोगलांच्या चौपट होता. एक दिवसात ते ४० ते ५० किमी एवढे अंतर पार पाडायचे. याचे कारण म्हणजे त्यांच्याबरोबर युद्धसामग्री व्यतिरिक्त फारसे साहित्य नसायचे. प्रत्येक सैनिकांकडे भाला किंवा तलवार आणि एक-दोन दिवस पुरेल एवढे धान्य असायचे. इतर वेळी आजूबाजूला मिळेल ते धान्य वापरून सैनिक आपले जीवन जगत असत. त्यामुळे त्यांना गतिमान हालचाली करणे शक्य होत असे. २० वर्षांच्या कारकीर्दीत ४१ लढाया लढल्या बाजीरावांनी त्यांच्या २० वर्षांच्या कारकीर्दीत ४१ लढाया लढल्या आणि ते एकमेव सेनापती आहेत, ज्यांनी या संपूर्ण लढाया जिंकल्या. त्यामुळेच साम्राज्य विस्तारून मध्य प्रदेश पार करून राजस्थान, उत्तरप्रदेश इथपर्यंत पोहोचले होते. आज युद्धशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या लढायांचा, रणनीतीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. माळव्यात मोगलांविरुद्ध केलेली लढाई ही महत्त्वाची लढाई. बुंदेलखंडच्या लढाईत त्यांनी छत्रसालाचे रक्षण केले. गुजरातमध्येही ते उत्कृष्ट रीत्या लढले होते. तसेच जंजिराच्या सिद्धीविरुद्धही त्यांनी पराक्रम गाजवला. त्याची अत्यंत महत्त्वाची लढाई म्हणजे त्यांनी दिल्लीकडे केलेले कूच. त्या वेळी दिल्लीची सत्ता मराठ्यांच्या हातात आली होती. समुद्र लढायांमध्ये त्यांनी पोर्तुगालविरुद्धही लढाई केली होती. नादिरशहाने मोगलांवर हल्ला करून भारतात प्रवेश केला. त्या वेळी मोगलांच्या मदतीला जात असताना नर्मदेच्या काठी आजारी पडून त्यांचा मृत्यू झाला. त्यांची समाधी आजही रावरखेडी या नर्मदेच्या काठावरील गावात आहे. पालखेडची लढाई महत्त्वाची त्यांच्या लढायांमध्ये निजामाविरुद्ध झालेली पालखेडची लढाई महत्त्वाची मानली जाते. पालखेडच्या लढाईत निजामांनी मराठ्यांमध्ये फूट पाडून शाहू आणि त्यांच्या बंधूंना वेगवेगळे केले आणि शाहू महाराजांची राजधानी सातारा येथे कूच केले. त्या वेळी शाहू महाराज पुरंदरच्या किल्ल्यात गेले. श्रीमंत बाजीराव पेशवे त्या वेळी खानदेशामध्ये लढाईला होते. शाहू महाराजांनी त्या वेळी रक्षण करण्याकरिता बाजीरावांना साताऱ्याला बोलावले. त्या वेळेस बाजीराव म्हणाले होते, तुम्हाला झाड कापायचे असेल तर त्याच्या फांद्या कापण्यात काही अर्थ नसतो, त्यासाठी झाडांच्या मुळांवर हल्ला करणे गरजेचे असते. मोगल सत्तेचे मूळ हे दिल्लीकडे होते. ते छाटून त्यांच्या साम्राज्याला धक्का देणे हाच उद्देश त्यांनी पालखेडमध्ये अमलात आणला. पहिला हल्ला मोगल असलेल्या गुजरात भागात केला. त्यानंतर माळव्यात निजामांच्या रसदीचे जे तळ होते, त्यावर हल्ला केला. त्यामुळे निजामाचा दिल्लीशी असणारा संबंध तुटला. त्यानंतर बाजीरावांचे घोडदळ औरंगाबादला येऊन पोहोचले. ती निजामाची राजधानी होती. त्यामुळे निजाम याकडे दुर्लक्ष करू शकला नाही. निजामाने पुणे-सातारा आणि पुरंदरच्या भागात असलेली आपली लढाई थांबवून बाजीरावांशी लढाई करण्याचा निर्णय घेतला. बरेच अंतर पार करून निजामाचे सैन्य गोदावरी नदी पार करून औरंगाबादला पोहोचले. निजामाला वाटत होते की ते मराठा घोडदळाचा पाठलाग करत आहेत. तिथे लढाई करण्यापेक्षा बाजीरावांनी त्यांना आणखी आत येऊ दिले आणि औरंगाबादपासून काही किलोमीटर अंतरावरील पालखेड या ठिकाणी त्यांना येण्यास भाग पाडले. या ठिकाणी येईपर्यंत निजामाची रसद तुटलेली होती, सैन्य थकलेले होते, अशा वेळी निजामावर बाजीरावांच्या सैन्याने दोन्ही बाजूंनी हल्ला केला. रसद बंद झाल्याने आणि काही हालचाल करता न येऊ शकल्याने निजामाचे खूप नुकसान झाले. ६ मार्चला निजामांनी बाजीराव पेशव्यांसमोर शरणागती पत्करली. बाजीरावांचे सैन्य छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणाहून युद्धभूमीवर एकत्र यायचे. याला इंग्रजीमध्ये असे म्हटले जाते. शेवटच्या क्षणी एकत्र आल्यामुळे शत्रूला त्याच्याविरुद्ध कारवाई करणे शक्य व्हायचे नाही. तसेच शत्रूला आपला पाठलाग करायला लावून बाजीराव त्यांना थकवायचे आणि शेवटी शत्रूला अशा भागात यायला भाग पाडायचे, जिथे शत्रूवर ३-४ दिशेने हल्ला करणे सोपे व्हायचे. बाजीरावांनी पोर्तुगीजांशीही लढाई केली. त्यांनी पोर्तुगीज आणि सिद्धी यांना हरविले. वसईची लढाई आणि सिद्धीशी झालेल्या लढाया इतिहासात प्रसिद्ध आहेत. जंजिराच्या सिद्धीला कोकणामध्ये आपले राज्य पसरविण्यात त्यामुळे यश मिळाले नाही. बाजीराव पेशव्यांच्या युद्धकौशल्याचा भारतातील इतिहासकारांनी फारच कमी अभ्यास केला आहे. जदुनाथ सरकार ग्रँट डफ यांसारख्या काही इतिहासकारांनी त्यांचा अभ्यास करून बाजीरावांचे युद्धकौशल्य सगळ्यांसमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्रीमंत बाजीराव पेशवे कुशल सेनापती युरोपमधल्या युद्धकुशल सैन्य अधिकाऱ्यांनी बाजीरावांच्या कौशल्याचे कौतुक केलेले आहे. (पान ६ वर)

पान १ वरून

# भाजपने फोडला मुस्लीम 'व्हेटो'चा भ्रम!

या दाव्यात तितकासा अर्थ नाही. कारण, २०१६ मध्ये भाजपला १०.१६ टक्के मतदान होऊन, केवळ तीन जागा मिळाल्या होत्या. पण, २०१९ मध्ये भाजपच्या मतदारांमध्ये मोठी वाढ झाली आणि त्याचे १८ खासदार निवडून आले. हे वाढलेले मतदार अर्थातच हिंदू होते. सांगायचा मुद्दा हा आहे की, मुस्लिमांची लोकसंख्या ३० टक्के वा अधिक असली, तरी बहुसंख्य असलेल्या हिंदूंची मते मिळाली तरच भाजप सत्तेत येऊ शकतो. यंदा ममतांच्या १५ वर्षांच्या महाजंगलराजमुळे हिंदू मतांचे ध्रुवीकरण होत आहे. हिंदू मतदारांच्या टक्केवारीत वाढ झाल्यास राज्यात भाजप सत्तेत येऊ शकतो, हे वरील आकडेवारीवरून दिसून येते. मुस्लिमांचा एक वर्ग आता ममतांऐवजी काँग्रेसकडे वळत आहे, हेही स्पष्ट होत आहे. ममतांची झोप उडाली आहे, ती याचमुळे.

# कामगारांना हवी हक्कांची जाणीव!



निती आयोगाच्या सर्वेक्षणानुसार वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न जितका भारतात आहे, त्याहूनही अधिक वाईट अवस्था जगाच्या बाजारात आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही मुळात चलन आणि रोखीवर आधारित असल्याने या सगळ्यात टीकाव धरून आहे. मात्र, चीनसारखा देश आज या आव्हानांसमोर गुडघे टेकत आहे. अमेरिकेसारख्या देशात भारतीय कामगारांची संख्या पाहता, तिथल्या राष्ट्राध्यक्षांनीही अमेरिका फर्स्ट असा नारा दिला आहे.

भारतातील कामगारांची अवस्था काही समाधानकारक नाही. जेट एअरवेज आणि एअर इंडियासारख्या कंपन्यांनी नांगी टाकण्यास सुरुवात केल्यानंतर अनेक कुटूंबे उघड्यावर पडली. 'जेट'चे कामगार आज इतर विमान कंपन्यांमध्ये अर्ध्या पगारात काम करत आहेत. कामगार संरक्षण कायदा अस्तित्वात जरी असला तरीही कामगारांना त्याबद्दल म्हणावी तशी जागृती नाही, ज्यांना या कायद्यांबद्दल माहिती आहे, त्यांच्यासाठी आवाज उठवणारी संघटना नाही, अशी गत कामगारांची आहे. देशातील ९३ टक्के कामगार असंघटीत क्षेत्रातील आहेत, उर्वरित ७ टक्के कामगारांचा सरकारी क्षेत्र, बँका, निमशासकीय क्षेत्रांमधील आहेत. संघटीत कामगार वगळता सर्वांनाच किमान वेतन, नियमानुसार पगारवाढ, इतर भत्ते, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन आदी मिळत आहे का हा प्रश्न आहेच. याशिवाय काही खासगी कंपन्यांचे परीविक्षण कालावधी सहा महिने ते वर्षभरापर्यंतचे आहेत.

नव्याने या क्षेत्रात पाऊल ठेवणार्यांना कायद्याबद्दल ज्ञान असणे कमीच असते. अनेक विद्यार्थी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मिळेल ती नोकरी स्वीकारण्याच्या नादात कंपनीतील इतर सेवा सुविधांविषयी दुर्लक्ष करून बसतात. कंपनीने स्वाक्षरी करून घेतलेल्या अटी शर्थींवर बारकाईने लक्ष देत नाहीत आणि त्याद्वारे स्वतःचेच नुकसान करून घेतात. मुंबईतील अनेक औद्योगिक वसाहतीत कार्यरत असणार्या काही परदेशी कंपन्यांबद्दल एक आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. याबद्दलचे अनुभव तिथल्याच कर्मचार्यांकडून ऐकायला मिळतात. परदेशात व्यवहार होत असल्याने कर्मचाऱ्यांना रात्रपाळीला काम करावे लागते. सणासुदीला रजा नसते. याचा मोबदला वेतनाच्या स्वरूपात दिला जातो. कंपनी व्यवस्थापनामुळे कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान असते. अनेक महिलाही या ठिकाणी रात्रपाळी करतात, त्यांची सुरक्षा, इतर सुविधा आदींबद्दल विशेष काळजी घेतली जाते. आपले कर्मचारी हिच आपली संपत्ती, असा दृष्टीकोन या कंपन्यांमध्ये आहे. कर्मचाऱ्यांसाठी व्यायामशाळा, मनोरंजनाचे विविध कार्यक्रम, त्यांचे वाढदिवस साजरे करणे आदी गोष्टी परदेशातून आता भारतातील कार्यालयात दिसू लागल्या आहेत. त्यामुळे सारेकाही चित्र नकारात्मक असाही काहीसा भाग नाही. मालक व्यवस्थापनानेही कर्मचार्यांना दिलेल्या सोयी सुविधांवरच बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. केवळ कामगारांना आपले हित आणि अधिकार माहिती असणे गरजेचे ठरते. कामगार कायदे जाणून घ्या... त्यातच आपले हित आहे...कामगार दिनानिमित्त शुभेच्छा...!

## पोकळ..!

पहा पाळी गोंदणथेंब
घाम गाळतो शेतकरी रे,
राबत असतो उन्हात येथे
दिवस रात्र काम करी रे!
जपतो आहे वसा अजून
तो
मातीमध्ये रमतो आहे,
जगतासाठी जगतो
आणिक
इतरांसाठी श्रमतो आहे!
खरी भाकरी खातो म्हण-
तो -
होतो जयजय खोट्याचा
का?

राजा असतो शेतकरी जर
धंदा त्याचा तोट्याचा का!
एक विनवणी करतो ऐका
नासधूस अन् फेकझोक
का
उधार आहे जगणे त्याचे
खते औषधे फक्त रोख
का?
बांधावरती मरतो तेव्हा
असतो मित्रा हरलेला तो,
वरून चेहरा हसरा पोकळ
आत दुःखाने भरलेला तो!

शशी त्रिभुवन

## ओंजळभर मोगरा

ओंजळभर मोगरा
टवटवीत हसला
धवल स्वर्गीय देखणा
हृदयी सुगंधी उमलला
चिमुकली नाजूक फुले
एकमेकांशी कुजबुजली
ओंजळीत मोगरा
एकमेकांना सांभाळत
सुगंधित पसरला
जवळ घेता ओंजळ
भुरळ त्याने घातली
संगति वाऱ्याच्या
मनी तो मोहरला
लयीत दुःख वेचत

मदमस्त होऊन
बोलला काय वेचल्या
मी! तुझ्या मनातल्या
वेदना?
फुला फुलांतून मोगरा
हृदयी सुगंधित
दरवळला
जादूई सुगंध त्याचा,
मनःशांती अन्?
ओंजळ भरून आनंद
देऊन गेला.

अवनी सप्रे

मुक्तचित्र डॉ. संतोष पाठारे

# सत्यजित राय

## भारतीय चित्रपटांच्या मन्वंतराचे शिल्पकार



चित्रपट हे भाषा, देश आणि संस्कृती यांच्या सीमारेषा ओलांडून प्रेक्षकांपर्यंत पोहोचणारं अत्यंत प्रभावी माध्यम आहे. मात्र, चित्रपट केवळ पाहण्यापुरता मर्यादित न ठेवता त्याचा आशय, मांडणी आणि त्यात अधोरेखित केलेल्या तत्त्वज्ञानाच्या स्तरावर जाऊन त्याचा आस्वाद घेणे, हे तितकेच महत्त्वाचे असते. प्रेक्षक म्हणून आपण आपल्या आवडीच्या चित्रपटांपुरतेच मर्यादित न राहता, त्या पलीकडे तयार होणाऱ्या वेगळ्या प्रवाहातील चित्रपटांकडे वळलो, तरच चित्रपट या माध्यमाची खरी व्याप्ती आपल्यासमोर उलगडते. अशा शोधप्रवासात काही दिग्दर्शक आपल्या अनुभवविश्वावर खोलवर परिणाम करतात. त्यापैकी एक म्हणजे जागतिक कीर्तीचे बंगाली दिग्दर्शक सत्यजित राय. त्यांची ओळख भारतीय चित्रपटांच्या मन्वंतराचे शिल्पकार म्हणून करून देणे अधिक सयुक्तिक ठरेल.

बालपणी मी चित्रपट पाहायला सुरुवात केली तेव्हा दोन घटका मनोरंजनाचं साधन, एवढीच मर्यादित ओळख होती. सुपरस्टार अमिताभ बच्चन यांच्या 'जंजीर', 'शोले', 'दिवार', 'अमर अकबर अँथोनी' यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी निर्माण केलेली 'लार्जर दॅन लाईफ' प्रतिमा मनात रुतून बसली होती. त्या काळात चित्रपट म्हणजे केवळ नायक-नायिकेचं प्रेम, नाट्यमय संघर्ष आणि लक्षवेधी गीत-संगीत या ठरावीक घटकांनी तयार झालेलं मनोरंजनाचे माध्यम वाटत असे. चित्रपट हा कलाप्रकार आहे, ही जाणीव निर्माण करणारी साधनं किंवा संदर्भ तेव्हा उपलब्ध नव्हते. अशा पृष्ठभूमीवर सत्यजित राय यांनी दिग्दर्शित केलेला 'पाथेर पांचाली' हा कृष्णधवल बंगाली चित्रपट दूरदर्शनवर पाहण्याचा अनुभव हा आयुष्यातील एक महत्त्वाचा टर्निंग पॉईंट ठरला. 'पाथेर पांचाली' पूर्णपणे समजला होता का, याबद्दल आता सांगता येणार नाही; परंतु 'पाथेर पांचाली'ने मनात एक वेगळी उत्सुकता निर्माण केली. चित्रपट अधिक वास्तववादी आणि संवेदनशील असू शकतो, याची जाणीव 'पाथेर पांचाली' पाहताना झाली होती. त्यानंतर प्रादेशिक चित्रपटांकडे पाहण्याची माझी दृष्टी बदलून गेली. थिएटरमध्ये पाहिल्या जाणाऱ्या व्यावसायिक चित्रपटांपेक्षा हे चित्रपट अधिक अंतर्मुख करणारे आणि रोजच्या आयुष्याशी जवळीक साधणारे वाटू लागले. याच सुमारास सत्यजित राय यांना ऑस्कर समितीने जीवन गौरव पुरस्कार जाहीर केल्याची बातमी समजली.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सत्यजित राय यांच्या कामाची घेतली गेलेली ही दखल प्रत्येक भारतीय चित्रपटप्रेमींसाठी अभिमानास्पद होती. हा पुरस्कार मिळाल्यानंतर काही काळातच त्यांचं निधन झालं. त्यानंतर त्यांचे 'जलसा घर', 'अरण्येर दिन रात्री', 'आगंतुक' यासारखे चित्रपट पाहताना जाणवलं की, हा दिग्दर्शक केवळ कथा सांगत नाही, तर भारतीय समाजाच्या बदलत्या प्रवाहाचं तत्त्वचिंतनात्मक विश्लेषण करीत आहे. १९५५ मधील 'पाथेर पांचाली'पासून १९९१ मधील 'आगंतुक'पर्यंतच्या कालखंडात सत्यजित राय यांनी निर्माण केलेल्या चित्रपटांमधून भारतीय समाजाच्या बदलत्या रूपाचं सूक्ष्म आणि संवेदनशील चित्रण दिसून येतं. त्यांचे चित्रपटांकडे केवळ आशयघन कथा किंवा उत्तम तांत्रिक बाजू असलेले चित्रपट म्हणून न पाहता, ते एका सामाजिक-ऐतिहासिक दस्तावेजाच्या रूपात अभ्यासण्यासारखे आहेत. आजच्या काळात नवीन दिग्दर्शक विविध प्रयोग करीत असताना, काही जणांना सतत सत्यजित राय यांच्या चित्रपटांबद्दल केली जाणारी चर्चा अनाठायी वाटते. कारण राय यांची सिनेमॅटिक भाषा, वास्तववादाची मांडणी आणि मानवी भावनांचं सूक्ष्म विश्लेषण ही आजही अभ्यासण्यासारखी आहे. त्यांच्या चित्रपटांत दिसणारा मानवतावाद आणि सामाजिक परिवर्तनाकडे पाहण्याची त्यांची संवेदनशील दृष्टी ही सार्वकालिक आहे. सत्यजित राय यांच्या चित्रपटांची ताकद त्यांच्या निरीक्षणशक्तीत आणि तपशीलवार मांडणीत आहे. त्यांनी कोणत्याही कथानकात क्षोभनाट्याचा अतिरेक टाळून अत्यंत साध्या घटनांमधून मानवी जीवनातील गुंतागुंत उलगडली. उदाहरणार्थ 'पाथेर पांचाली'मधील ग्रामीण जीवनाचं चित्रण हे केवळ वास्तववादी नसून काव्यात्म आहे. त्याचप्रमाणे 'आगंतुक'मध्ये आधुनिकता, परंपरा आणि ओळख यांसारख्या संकल्पनांवर त्यांनी अत्यंत सूक्ष्म पण भेदक भाष्य केलं आहे. सत्यजित राय यांच्या जडणघडणीकडे पाहिल्यास त्यांच्या सिनेमातील गाभा अधिक स्पष्ट होतो. सत्यजित राय यांचे आजोबा हे बंगालच्या प्रबोधनकाळातील लेखक, चित्रकार आणि प्रकाशक होते. त्यांनी लहान मुलांसाठी 'संदेश' हे मासिक सुरू केले होते. त्यांचे वडील सुकुमार राय हे देखील प्रसिद्ध कवी आणि लेखक होते. लेखन आणि चित्रकलेचा वारसा सत्यजित राय यांना त्यांच्या घरातूनच मिळाला होता.

रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनमध्ये घेतलेलं कलाशिक्षण, फ्रेंच दिग्दर्शक जॉ रेन्वा यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव आणि १९४७ साली त्यांनी कलकत्ता फिल्म सोसायटीची केलेली स्थापना, या सर्व घटकांनी त्यांच्या कलेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला आकार दिला. विशेषतः इटालियन नववास्तववादी चित्रपटांचा प्रभाव त्यांच्या कामात स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या चित्रपटांत वास्तववाद हा केवळ शैलीचा भाग नसून ती एक विचारधारा आहे. त्यांनी भारतीय समाजातील संक्रमण याकडे अत्यंत सूक्ष्मपणे पाहिलं. त्यांच्या व्यक्तिरेखा या नायकत्वाच्या चौकटीत बसणाऱ्या नसून त्या सामान्य माणसाच्या संघर्ष, आशा आणि अपयश यांचं प्रतिनिधित्व करतात. म्हणूनच सत्यजित राय यांचे चित्रपट केवळ सिनेमॅटिक अनुभव देत नाहीत, तर ते प्रेक्षकाला विचार करायला भाग पाडतात. त्यांच्या चित्रपटांचा अभ्यास करणे म्हणजे केवळ एका दिग्दर्शकाची ओळख करून घेणे नव्हे, तर भारतीय समाजाच्या बदलत्या वास्तवाचा मागोवा घेणे होय.

आजच्या नवोदित दिग्दर्शकांसाठीही राय यांची वाटचाल मार्गदर्शक ठरू शकते. दर्जेदार चित्रपट निर्मितीसाठी केवळ तांत्रिक कौशल्य पुरेसं नसून साहित्य, समाज आणि मानवी स्वभाव यांचा सखोल अभ्यास आवश्यक आहे, हे सत्यजित राय यांच्या कारकीर्दीकडे पाहिल्यास स्पष्ट होतं. सत्यजित यांचे सिनेमे हे काळाच्या कसोटीवर टिकलेले आहेत. कारण त्यांनी माणूस आणि त्याच्या अस्तित्वाच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून चित्रपट निर्माण केले. त्यामुळेच ते आजही तितकेच सुसंगत, अभ्यासनीय आणि प्रेरणादायी वाटतात.

# राजा शिबी

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

पृथ्वीच्या पाठीवर जिथे जिथे गोड्या पाण्याचा अखंड स्रोत आहे आणि वातावरण वस्ती करण्याजोगे आहे, तिथे तिथे दोन पायांवर चालणाऱ्या आणि बुद्धिवान म्हणजे 'होमो सेपियन' प्रजातीच्या प्राण्यानं राहायला सुरुवात केली. त्यानं त्याच्या अक्कल हुशारीचा वापर करत आपापसात आणि सभोवतालच्या निसर्गाशी संबंध कसे असतील, याचे ठोकताळे बांधले. नियम तयार केले.

आपल्या रचनात्मक क्षमतेनुसार हातांच्या मदतीनं आयुष्य सुकर करणाऱ्या वस्तू निर्माण केल्या. प्रतिभेचा पिसारा फुलवत कला आणि साहित्याची निर्मिती केली. या सगळ्या क्रियाकलापांना आपण सांस्कृतिक विकास म्हणतो. मग त्या प्रत्येक ठिकाणची संस्कृती वेगळी. त्यांची वैचारिक जडणघडण वेगळी म्हणजेच त्यांचा इतिहासही वेगळाच.

अतिप्राचीन काळी इतरत्र मानवी टोळ्या होत्या. त्या काळी भारतीय उपमहाखंडात भरभराटीला आलेली नागरी, परीघावरची ग्रामीण आणि रानावनातली वन्य अशा तीन पातळ्यांवर विकसित झालेली संस्कृती होती. त्यात आपलं वर्चस्व स्थापन करण्याची चढाओढ होती, स्पर्धाही होती. त्यातून कैक संघर्ष, चकमकी, लढाया आणि युद्धं झालीत. पण या सगळ्याला 'धर्म' या अद्भुत संकल्पनेचं अस्तर होतं. प्राचीन भारतीय विचारवैभवात अनेक विद्वानांनी धर्माची व्याख्या केली आहे. त्यापैकी मनुस्मृतीत धर्माची १० लक्षणं सांगितलेली आहेत- **धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः। धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम्।।'** (१. धृती,२. क्षमा, ३. दम (मनोनिग्रह), ४. अस्तेय, ५. शौच =शुद्धता, ६. इंद्रियनिग्रह, ७. धी (बुद्धी), ८. विद्या, ९. सत्य, १०. अक्रोध ही धर्माची १० लक्षणे आहेत.) यानुसार वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्यातल्या वर्तणुकीला भारतीय संस्कृतीत महत्त्व आहे. अशी काही व्याख्या अन्य संस्कृतींत आहे, याचा मागमूस आजवर तरी लागलेला नाही. त्यामुळे इतरत्र कोणत्याही कालखंडात होऊन गेलेले किंग किंवा सुलतान हे केवळ मानवी टोळ्यांचे म्होरके होते.

त्यांच्यात ही १० लक्षणं असल्याच्या नोंदी त्यांच्या ऐतिहासिक साहित्यात काही आढळत नाहीत. ही सगळी प्रस्तावना इथे करण्याचा एकमेव उद्देश म्हणजे भारतीय भूमीत होऊन गेलेल्या धार्मिक राजपुरुषांची मांदियाळी. त्यांनी आपल्या वर्तनातून त्यांच्या प्रजेसाठी उत्तमोत्तम आदर्श निर्माण केले. यापैकी एक राजा होऊन गेला त्याचं नाव शिबी.

चांद्रवंशीय वृष्णी कुळात जन्मलेल्या उशीनार राजाचा पुत्र शिबी अशी स्वत:ची ओळख सांगणाऱ्या या राजाची कथा महाभारत या आर्षकाव्याच्या अनुशासन पर्वात, विष्णू पुराण, पद्म पुराण आणि महायानी बौद्ध वाङ्मयातल्या जातक कथांत आवर्जून सांगितली जाते. पराक्रमी, न्यायप्रिय, महादानी, प्रजाहित दक्ष, शरणत्राण तत्पर म्हणजे शरण आलेल्याला तारण्यात आणि संरक्षण देण्यात तत्पर म्हणून त्याची ख्याती सर्वदूर पसरली होती. एके दिवशी तो त्याच्या राजसिंहासनावर बसून राजसभेचं कामकाज बघत असताना अचानक एक कपोत (कबूतर) उडत येऊन त्याच्या मांडीवर बसतं.

मानवी भाषेत बोलू लागतं. 'माझ्या मागे एक ससाणा लागला आहे. त्याला माझी शिकार करून स्वत:चं पोट भरायचं आहे. म्हणून मी तुझ्या आश्रयाला आलो आहे.' त्याचं बोलणं संपेपर्यंत त्याच्या पाठलागावर असलेला तो बहिरी ससाणादेखील राजसभेत येऊन पोहोचला. शिबीराजाच्या आश्रयाला आलेल्या कपोताचा थरकाप उडाला. 'महाराज तुमच्या आश्रयाला आलेला हा तुच्छ पक्षी म्हणजे माझं भक्ष्य. त्यावरच माझं पोट आहे. त्यामुळे तो तुम्ही मला परत करा.' त्यावर राजा शिबीनं त्या कपोताला गोंजारत म्हटलं, 'पक्षिराज तुम्ही मांसाहारी आहात म्हणून हे इवलंसं पाखरू तुमचं भक्ष्य आहे हे मान्य आहे. पण मी माझ्या आश्रयाला आलेल्या प्रत्येक जीवाचं रक्षण करण्याचं व्रत घेतलं आहे. म्हणून हे कपोत मी तुम्हाला देऊ शकणार नाही.' 'तर मग राजन मी खायचं काय आणि पोट कसं भरायचं? दिवसातून एकच शिकार करायची असा प्रण आहे माझा! हा कपोत जर मी सोडला तर मला पुन्हा एकदा शिकार करावी लागेल. ते माझ्यासाठी वर्ज्य आहे. ' 'तुम्ही म्हणता तेही योग्यच आहे. या पेच प्रसंगावर काही उपाय करता येईल.' 'हो हो ! का नाही! या कपोताच्या भारा (वजना) इतकं तुझं मांस तू मला दे म्हणजे सगळा प्रश्न सुटेल. पण एक अट आहे. तुझं मांस तू स्वत: कापून शरीरापासून विलग करून मला द्यायचं आणि ते करत असताना तुझ्या मुखावर प्रसन्न भाव हवेत तरच मला शाश्वती वाटेल की, तू हे सारं स्वच्छेनं करतो आहेस.' ससाणा म्हणाला. शिबी राजानं त्याच्या सर्व अटी मान्य केल्या आणि त्यानं एका सुवर्णतुले (सोन्याच्या तराजू) त एका पारड्यात कपोताला ठेवलं.



कपोताच्या भाराइतके स्वत:चे मांस कापून देणारा राजा शिबी

दुसऱ्या पारड्यात ठेवण्यासाठी आपल्या मांडीचं मांस कापू लागला. त्या दु:खानं त्याच्या डाव्या डोळ्यांत पाणी आलं. 'बघ राजन तुझे अश्रू अनावर होत आहेत. म्हणजे तू हे दान काही स्वेच्छेनं देत नाहीयेस!' 'नव्हे पक्षिराज, तुमची सेवा करण्याचं भाग्य लाभलं म्हणून आलेला सुखाश्रू आहे हा.' असं म्हणत राजानं आपल्या मांडीचं मांस कापून काढलं. ते पारड्यात ठेवलं, पण कपोताचं पारडं जडच होतं.

राजानं दुसऱ्या मांडीचं मांस कापलं ते पारड्यात टाकूनही कपोताच्या भाराइतकं भरलं नाही मग त्यानं स्वत:च्या पोटरीचं मांस कापायला घेतलं. ते बघून मात्र कपोत झालेल्या अग्निदेवानं आणि ससाणा झालेल्या इंद्रदेवानं आपापली सोंगं टाकून खरी रूपं धारण केली. 'तुझ्या सत्त्वाची परीक्षा पाहण्यासाठी हे सगळं नाट्य उभं केलं' असं सांगून त्याच्या शरीराला पुन्हा यथावत केलं आणि त्याला अक्षय्यकीर्तीचा आशीर्वाद दिला.

मनुष्यधर्म, राजधर्म पालनासाठी आणि 'जीवो जीवस्य जीवनम्' या नैसर्गिक न्यायाला जागण्यासाठी, सर्वस्व पणाला लावणारा हा भारतीय परंपरेनं मांडलेली राजा या संकल्पनेत तंतोतंत बसणारा, हा आदर्श राजा शिबी. त्याच्या दानकर्तृत्वाची ही आठवकथा!!

# फुक्कटची माया अन् दाताले घामोऱ्या...

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

भाषा ही समूहमनाची शक्ती असते. भाषा प्रेरक आणि सृजनशील शक्ती आहे. समाज भाषा घडवतो आणि भाषेतून समाज घडत राहतो. भाषा आणि समाज यांचे संबंध अन्योन्य आहेत. समाजाला आपले अस्तित्व टिकवून प्रगती साधण्यासाठी भाषेची नितांत गरज असते. भाषा आणि संस्कृती समाजाशिवाय टिकून राहू शकत नाही.



स्वभाषा आणि स्वसंस्कृती सोडून समाज कोणत्याही भाषा व संस्कृतीचा स्वीकार करू शकतो. समाजाने भाषेचा स्वीकार, अंगीकार, प्रचार, प्रसार ही कार्ये सोडून भाषेची अवहेलना सुरू केली की, भाषेच्या ऱ्हासाची प्रक्रिया सुरू होते. आर्थिक आणि शैक्षणिक प्रगती झालेल्या माणसांनी स्वभाषेचा त्याग केला की तळपातळीवरच्या माणसांनाही स्वभाषेचा आदर राहत नाही. हे भाषेचे वास्तव वाट्याला आले असल्याचे स्पष्ट दिसत असूनही मराठी माणसे बेफिकीर-बेपर्वा असावीत, ही या भाषेसमोरील एक समस्या आहे. शब्द ओठांवर टिकावे म्हणून... गेल्या काही वर्षांत अनेक इंग्रजी शब्दांनी मराठी शब्द बोलण्यातून पार हद्दपार केले आहेत. 'उघडणे' असे एक क्रियापद साधारणपणे खुलणे, खुले होणे, उमलणे, उकलणे, उलगडणे, खोलणे, आच्छादन काढणे, अनावृत्त करणे वगैरे अर्थाने वापरले जाते; पण अलिकडे 'उघडणे' या शब्दाऐवजी इंग्रजीमधला 'ओपन' हा इंग्रजी शब्द वापरला जातो. त्यामुळे 'स्टुडंस पुस्तके ओपन करा', 'डिअर स्टुडंस तुमचे बुक्स ओपन करा', 'भाजीच्या पॅनवरचे झाकण ओपन करा', 'फ्राय केलेली 'दाल' एका ओपन पॅनमध्ये काढून मग गार्निश करून सर्व्ह करा', 'बुक ओपन करून पॅसेज रीड करा', 'तू मेसेज ओपन करून रीड कर; मग मी कॉल करते' ही आणि अशी कितीतरी वाक्ये वर्गात, दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांत, विचारपीठांवरून आणि इतरत्रही सर्रास वापरली जातात. ही वाक्ये मराठी भाषेतील 'उघडणे'सारख्या क्रियापदासह कितीतरी अर्थसघन मराठी शब्दांची जाहीर हत्या करीत असतात. बस्तरवार, इतवार आणि बरंच काही...

विदर्भात दात नसलेल्या माणसासाठी 'खेबडा' असा एक शब्द आहे तर आळशी माणसासाठी 'दंदी' असा शब्द आहे. 'खपती' म्हणजे वेडा, 'सांगो' म्हणजे बावळट, 'हिकमती' म्हणजे हुशार. 'हिंगजिऱ्या' म्हणजे कंजूस, मतलबी. पण हे आणि असे कितीतरी शब्द आता मृत्युपंथाला लागले आहेत. विदर्भाच्या मातीत गुरुवारला 'बस्तरवार' आणि रविवारला 'इतवार' म्हणणारी मंडळी फार थोडी उरली असतील. झाकट (सकाळ), फोतर (टरफल), धुंधाळ (वादळ), फुफट (धूळ), बेदाड (चिखल), चऱ्हाट (दोर), कावळ (दरवाजा), लवण (नाला) धानदरझपका म्हणजे घाबरलेला, भयभीत, घाबराघुबरा आणि झांजरझपका म्हणजे कंप पावत असणे, थरथरत असणे हे आणि असे असंख्य शब्द जिभेवरून केव्हाच पसार झाले आहेत. आपल्या 'मायम ाउली'साठी... मराठी भाषेतील 'आई' हा शब्द घेतला तर त्याचे विविध लोकभाषेतले कितीतरी पर्याय विदर्भात उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ यायाल, याया, आम्मल (माडिया) आव्वाल (परधानी व गोंडी), मायटी (राठ्या बरेला), याडी (गोरमाटी) , आम्माय, आम्मान, आम्मा (कोलामी), गम्मा (कैकाडी), मायो (घिसाडी), आई आयाम (कोरकू), मा (कोहळी, झाडी, वऱ्हाडी), माय (निमाडी, निहाली, हलबी, पोवारी, वऱ्हाडी), आम्मा (कुंचिकोरवा) याशिवाय विदर्भाच्या अनेक भागांत हिंदी, उर्दू, सिंधी, तेलुगू या भाषाही बोलल्या जातात, तेव्हा 'आई' या शब्दाला या भाषांमध्ये अनुक्रमे या, वालेदा, माउ, अम्म हे पर्यायी शब्द आहेतच; आता 'आई'ऐवजी मम्मी, मम्मा हे शब्द लोकजिव्हेवर आले तर आणि मराठी आणि वर उल्लेख केलेल्या सर्व भाषांतून 'आई' लुप्त झाला तर मराठीसह वरील सर्व भाषांतील एका अर्थसघन आणि सांस्कृतिक संदर्भ असणाऱ्या एका मौलिक शब्दाची न भरून निघणारी हानी होणार नाही का?

काशाय आणि फळसफुल्या... रस्त्याला 'रोड' म्हणताना रस्त्याच्या प्रकारांचे कितीतरी पर्यायी शब्द हद्दपार झाले. वाट, पाऊलवाट, पांदी, पांदण, पांदणवाट, घाट, वाटुली, पायवाट, आडवाट, पाखाडी, सरी, नाळ, सडक हे आणि असे अनेक शब्द वेगवेगळ्या प्रकारच्या रस्त्यांसाठीचे पर्याय आहेत. लाल अथवा तांबड्या रंगाच्या निरनिराळ्या छटांसाठी विटकरी, तांबूस, लाल्या, डाळिंबी, कथ्थ्या, मनुका, जास्वंदी, शेंदरी, फळसफुल्या, गुलाली, मेंदी, भगवा, काशाय, जांभा, पोवळा, लालगव्हाळी, शरबत्ती, लालसर, लालजर्द, लालबुंद, लालेलाल, रक्ताळ, रक्तचंदनी, काळपट लाल असे कितीतरी शब्द आहेत. 'हुर्दूक' हा शब्द आठवण आणि अव्यक्त, अनाम हुरहुर या अर्थाने विदर्भात वापरला जातो. 'सय', 'याद' हे शब्ददेखील 'आठवण' या शब्दाचे पर्याय आहेतच. लोकभाषेतील मृत्युपंथाला लागलेल्या शब्दांची उदाहरणे दिली तर असे कितीतरी शब्द नोंदविता येतील. चूल आणि वैल 'घरोघरी मातीच्या चुली' ही म्हण आता केवळ कोशातच शिल्लक आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागात अजूनही घरोघरी म ातीच्या चुली आहेतच. शहरातील आणि महानगरातील लोकांना चूल माहीत असते; पण 'वैल' माहिती असण्याची शक्यता नसते. चुलीच्या चिकटून बाजूला चौकोनी किंवा गोलाकार वैल असते. चुलीतल्या लाकडांचा जाळ आणि धग वैलात पोहोचते. चुलीवर आणि वैलावर दोन्हीकडे दोन भांडी ठेवून स्वयंपाक केला जातो. शिजत आलेले किंवा केवळ वाफ येऊ द्यावयाची आहे किंवा केवळ गरम ठेवावयाचे आहे अशा पदार्थांचे भांडे वैलावर ठेवले जाते. वैल म्हणजे सरपणाची आणि वेळेची बचत करणारी मूळ चुलीला चिकटून असलेली आणि मूळ चुलीच्या आगीवरच चालवली जाणारी दुसरी विनासरपणाची चूलच असते. चुलीला जोडून असूनही वैल चुलीचा जोडशब्द नाही; त्याचे चुलीसह स्वतंत्र अस्तित्व आहे. (पान ६ वर)

# पर्यावरण संरक्षणाचे कठीण स्वप्न

**युद्धामुळे होणारा पर्यावरणीय विनाश आणि 'अर्थ अवर'सारख्या उपक्रमांची तुलना केल्यास स्पष्ट होते की, केवळ प्रतीकात्मक कृती पुरेशा नाहीत. पर्यावरण संरक्षणासाठी व्यापक आणि ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. जागतिक शांतता प्रस्थापित करणे, आंतरराष्ट्रीय कायद्यांची कठोर अंमलबजावणी करणे आणि प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे ही काळाची गरज आहे.**

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

युद्धाचा परिणाम केवळ राजकीय सीमा किंवा सामरिक विजय-पराजयापुरता मर्यादित नसतो, तर पर्यावरणाच्या मुळावर घाव घालणारा असतो. उत्तर प्रदेशातील बरेली कॉलेजचे पर्यावरणतज्ज्ञ डॉ. जसपाल सिंग यांच्या मतानुसार, युद्ध म्हणजे पर्यावरणावर पडलेली अशी जखम आहे, जी अनेक दशकांपर्यंत भरून येत नाही. युद्धाच्या काळात बॉम्ब, क्षेपणास्त्रे आणि विविध प्रकारच्या शस्त्रास्त्रांचा अंधाधुंद वापर केला जातो. या स्फोटांमुळे शिसे, पारा, कॅडमियम आणि युरेनियमसारखे जड धातू जमिनीच्या खोल थरांमध्ये झिरपतात. परिणामी, जमिनीची सुपीकता नष्ट होते आणि ती शेतीसाठी अयोग्य ठरते. अशा भागांमध्ये कृषी उत्पादन घटते. अन्नसुरक्षेवर परिणाम होतो आणि स्थानिक अर्थव्यवस्था कोलमडते. याशिवाय, रासायनिक शस्त्रांचा वापर हा आणखी एक गंभीर धोका आहे. या रसायनांचा पावसाच्या पाण्याद्वारे भूगर्भातील जलस्रोतांमध्ये प्रवेश होतो. हे पाणी पिण्यास अयोग्य ठरते आणि त्याच्या सेवनामुळे कर्करोग, जन्मजात दोष आणि इतर गंभीर आजार उद्भवतात. याचे ज्वलंत उदाहरण व्हिएतनाम युद्धाच्या वेळी दिसून आले. 'एजंट ऑरेंज' या रासायनिक पदार्थाच्या वापरामुळे आजही अनेक पिढ्यांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. अन्नसाखळीच्या माध्यमातून हे विषारी घटक मानव आणि प्राण्यांच्या शरीरात प्रवेश करतात आणि संपूर्ण परिसंस्थेचे संतुलन बिघडवतात. युद्धाच्या काळात केवळ मानवी जीवितहानी होत नाही, तर नैसर्गिक अधिवासांचाही मोठ्या प्रमाणावर नाश होतो. लष्करी कारवायांमुळे जंगलतोड होते, वन्यजीव बेघर होतात आणि अनेक दुर्मिळ प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर येतात. याशिवाय तेल विहिरी, कारखाने आणि औद्योगिक प्रकल्पांवर झालेल्या हल्ल्यांमुळे मोठ्या प्रमाणात आगी लागतात. या आगींमुळे कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनो ऑक्साईड आणि सल्फर डाय ऑक्साईडसारखे घातक वायू वातावरणात सोडले जातात.

आखाती युद्धादरम्यान कुवेतमधील तेलविहिरींना लागलेल्या आगींमुळे अनेक महिने आकाश काळवंडले होते. या घटनेमुळे हवामानावरच नाही, तर सागरी परिसंस्थेवरही मोठा परिणाम झाला. आजही रशिया-युक्रेन युद्धामुळे धरणे कोसळणे, औद्योगिक प्रकल्पांवर हल्ले आणि मोठ्या प्रमाणावर प्रदूषण यामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. युद्धादरम्यान पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर काही नियम आणि करार अस्तित्वात आहेत. जिनेव्हा परिषदेतील हे करार युद्धातील मानवी वर्तनाचे नियमन करतात आणि अनावश्यक विनाश टाळण्यावर भर देतात. तसेच 'इन्मोड परिषद' करार पर्यावरणाचा शस्त्र म्हणून वापर करण्यास मनाई करते. यामध्ये हवामान किंवा नैसर्गिक प्रक्रियांमध्ये कृत्रिम हस्तक्षेप करून शत्रूला हानी पोहोचविण्यास बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय अतिरिक्त प्रोटोकॉलमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, पर्यावरणाला 'व्यापक, दीर्घकालीन आणि गंभीर' हानी पोहोचविणाऱ्या पद्धतींचा वापर टाळला पाहिजे; परंतु या सर्व नियमांची अंमलबजावणी करणे अत्यंत कठीण आहे. अनेकदा देश आपल्या सामरिक हितासाठी या नियमांकडे दुर्लक्ष करतात. परिणामी हे कायदे कागदावरच मर्यादित राहतात. या पृष्ठभूमीवर 'अर्थ अवर'चा विचार केला तर तो एक म हत्त्वाचा; पण मर्यादित प्रभाव असलेला उपक्रम आहे. एका तासासाठी दिवे बंद ठेवणे हे पर्यावरण वाचवण्याचे अंतिम उत्तर नाही; परंतु त्याला पूर्णपणे नाकारता येणार नाही. 'अर्थ अवर' ही एक जागतिक जनजागृती मोहीम आहे. ती लोकांना विचार करायला भाग पाडते. पर्यावरणीय समस्यांकडे लक्ष वेधते आणि सामूहिक कृतीची भावना निर्माण करते. ही कृती लहान असली तरी तिचा संदेश मोठा आहे. निसर्गाला सीमा नसते. एका भागातील पर्यावरणाचा ऱ्हास अखेरीस संपूर्ण मानवजातीवर परिणाम करतो. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ एका देशाची किंवा एका उपक्रमाची जबाबदारी नसून संपूर्ण मानवजातीची सामूहिक जबाबदारी आहे. 'अर्थ अवर' आपल्याला हीच जाणीव करून देतो, पण आता या जाणीवेचे रूपांतर ठोस कृतीत करण्याची वेळ आली आहे. एखाद्या देशाच्या लष्करी कारवायांमुळे शेजारील देशाच्या नद्या प्रदूषित होतात, हवा विषारी बनते किंवा शेतीयोग्य जमीन नष्ट होते, तेव्हा तो केवळ स्थानिक प्रश्न राहत नाही; तो आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत येणारा गंभीर मुद्दा बनतो. सैद्धांतिकदृष्ट्या पाहिले, तर कोणत्याही राष्ट्राने आपल्या कृतींमुळे दुसऱ्या राष्ट्राच्या पर्यावरणाला हानी पोहोचवू नये, हे आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय तत्त्व स्पष्टपणे सांगते; मात्र युद्धाच्या रणधुमाळीत हे तत्त्व अनेकदा केवळ कागदोपत्री राहते.

युद्धकाळातील पर्यावरणीय हानी ही नेहमीच तात्काळ आणि दृश्यमान स्वरूपात दिसून येत नाही. ती हळूहळू खोलवर आणि दीर्घकालीन परिणाम घडवणारी असते. एखाद्या बॉम्बस्फोटानंतर उठणारा धूर, नष्ट झालेली इमारत किंवा जळणारी तेलविहीर हे केवळ वरवरचे चित्र असते; परंतु त्यामागे माती, पाणी आणि हवेमध्ये मिसळणारे विषारी घटक अनेक दशकांपर्यंत परिणाम करत राहतात. परिणामी सीमारेषा ओलांडूनही या प्रदूषणाचा प्रभाव पसरतो आणि शेजारील देशांनाही याची किंमत मोजावी लागते. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय कायदे अस्तित्वात असूनही त्यांची परिणामकारकता प्रश्नांकित ठरते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने आपल्या नेक निर्णयांमध्ये पर्यावरण संरक्षणाला आंतरराष्ट्रीय कायद्याचा अविभाज्य भाग मानले आहे. संघर्षाच्या काळातही पर्यावरणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे; परंतु या न्यायालयाच्या अधिकारांवर असलेल्या मर्यादा त्याचा प्रभाव कमी करतात. आंतरराष्ट्रीय न्यायालय केवळ त्या प्रकरणांमध्येच हस्तक्षेप करू शकते, जिथे संबंधित राष्ट्रे त्याचे अधिकार क्षेत्र स्वीकारतात. अनेकदा राजकीय देश या अधिकार क्षेत्राला मान्यता देण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे न्यायालयाचे अस्तित्व असूनही त्याची अंमलबजावणी मर्यादित राहते. युद्धकाळात पर्यावरण संरक्षणाचे नियम कमकुवत ठरण्यामागील आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे 'दीर्घकालीन आणि गंभीर नुकसान' सिद्ध करण्याची गुंतागुंत. पर्यावरणीय हानीचे स्वरूप असे असते की, ती लगेच दिसून येत नाही. तिचे परिणाम अनेक वर्षांनी समोर येतात. त्यामुळे कोणत्या देशाच्या कृतीमुळे किती आणि कसे नुकसान झाले, हे ठामपणे सिद्ध करणे अवघड ठरते. अनेकदा संबंधित देश या अनिश्चिततेचा फायदा घेतात आणि जबाबदारी टाळतात. याशिवाय, आंतरराष्ट्रीय स्तरावर कठोर दंडात्मक यंत्रणेचा अभाव ही एक मोठी उणीव आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यावर ठोस आणि प्रभावी कारवाई होईल, अशी खात्री नसल्याने या नियमांचे पालन करण्याची सक्ती निर्माण होत नाही. परिणामी पर्यावरण संरक्षणाचे करार आणि तत्त्वे ही नैतिक मार्गदर्शक तत्त्वे म्हणूनच राहतात; कायदेशीर बंधनकारक शक्ती म्हणून नव्हे. राजकीय आणि सामरिक हितसंबंध ही आणखी एक अडचण आहे. (पान ६ वर)



# ग्रहसंकेत

**(रविवार,२६ एप्रिल ते शनिवार, २ मे २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २६ एप्रिल-** माता वासवी कन्यका प्रकटदिन, समर्थवाडी (यवतमाळ), श्री महालक्ष्मी वार्षिकोत्सव राणी चन्नमानगर बेळगाव, काळभैरवनाथ यात्रा निमगाव (नांदुरा) ✻ **सोमवार, २७ एप्रिल-** मोहिनी एकादशी, सिध्दश्री देवेंद्रनाथ जयंती मढी (जि.नगर), सासवड यात्रा, महादुअप्पा देवर्षी पुण्यतिथी सावरगाव (बीड) ✻ **मंगळवार, २८ एप्रिल-** भगवंतदेव जन्मोत्सव बार्शी, जानुबाईदेवी यात्रा करंजखोप (ता. कोरेगाव), बाळनाथ महाराज पुण्यतिथी इचलकरंजी, रूक्मिणी परशुराम द्वादशी, भराडीदेवी जन्मोत्सव वेंगुर्ला ✻ **बुधवार, २९ एप्रिल-** प्रदोष, श्री रांगोळी महाराज पुण्यतिथी मालवण, व्यास जयंती ✻ **गुरुवार, ३० एप्रिल-** श्री नृसिंह जयंती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती, श्री नृसिंह नवरात्र समाप्ती, श्री आद्य शंकराचार्य कैलासगमन ✻ **शुक्रवार, १ मे-** महाराष्ट्र दिन, बुध्द पोर्णिमा, वैशाख स्नान समाप्ती, पुष्टि पति विनायक जयंती, अन्वाधान, कुलधर्म, कामगार दिन, कुर्म जयंती, मराठी राजभाषा दिन, संत दामाजी महाराज पुण्यतिथी (मंगळवेढा) ✻ **शनिवार, २ मे-** इष्टि, नारद जयंती, शेखागौरी यात्रा मालवंडी (ता. बार्शी), विरक्त बिळूर महास्वामी पुण्यतिथी बिळूर (ता. जत), दिगंबरदास महाराज पुण्यतिथी पुणे, गुरू व्यंकटस्वामी महाराज पुण्यतिथी आळंदी

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २६, २८, २९, ३० एप्रिल, १ मे (१०नंतर) ✻ **डोहाळ जेवण-** २९ एप्रिल ✻ **बारसे-** २८, २९ एप्रिल ✻ **जावळ-** २९, ३० एप्रिल, १ मे (१० नंतर) ✻ **गृहप्रवेश-** २९ एप्रिल, १ मे (१० नंतर)

### मेष :- आत्मविश्वास वाढेल

ध्यासमग्न चालण्याने प्रगती सर्वांची घडे, मधमाशीचा कर्मयोग देतो, जगण्याचे धडे. बुध- गुरुचा केंद्रयोग कार्य सिद्धी नेणार आहे. धनस्थ शुक्र आर्थिक समस्यातून मार्ग काढणारा आहे. व्ययात मंगळ शनी आहेत. त्यामुळे आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. आत्मविश्वास वाढणार आहे. मनासारख्या घटना घडतील. चिंता नको. शुभ ता. २६, २८, ३०

### वृषभ:- सौख्याच्या घटना

मधमाशीसारखं बना, मध आणि डंख दोन्ही स्वभावात ठेवा. या कलियुगात फारच सात्विक अथवा फार तमोगुणीही राहून चालत नाही. राशी स्वामी शुक्र राशीत आहे. सौख्याच्या घटना घडतील. फार आग्रही राहू नका. सरकारी कामात विलंब होईल. पाठपुरावा करावा. धनप्राप्तीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. शुभ ता. २६, ३०, १

### मिथुन:- विचाराने रहावे

तोल सांभाळता आला नाही तरी चालेल, पण तोंड सांभाळता आलं पाहिजे. कर्मस्थानी शनि- मंगळ आहेत. त्यामुळे कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. वादाचे प्रसंग टाळावेत. महत्त्वाची कामे मनासारखी होतील. गुरुकृपेने सर्वकाही मनासारखे घडेल. चिंता करू नका. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. शुभ ता. २६, २८, ३०

### कर्क:- भाग्योदयकारक घटना

तोंडामुळे कामे घडतात, पण आणि बिघडतात पण. धनस्थ केतूमुळे आपल्या वाचेत दोष राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोजकेच व विचाराने बोलावे. कार्य सिद्धीसाठी वाचासिद्धी असणे महत्त्वाचे आहे. बुध- गुरु केंद्रयोग भाग्योदयकारक घटना घडविणार आहे. सरकारी कामे मनासारखी होतील. प्रगती घडेल. शुभ ता. २६, २९

### सिंह:- आर्थिक प्रगती

सुख म्हणजे नक्की काय? भरलेलं घर आणि एकमेकांची साथ. बुध- गुरुचा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. शारीरिक तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. नव्या योजना विचाराने स्विकारा. उष्णतेपासून सावध रहावे. गृहपयोगी वस्तूंच्या व्यापारास अनुकूलता राहील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २६, २८, ३०

### कन्या:- सामंजस्याने रहावे

कसं बोलावं, ही कला आहे, पण कसं बोलू नये हा संस्कार आहे. बुध- गुरुच्या केंद्रयोग कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती करणार आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. महत्त्वाचे व्यवहार विचारपूर्वक करावेत. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्रात अनुकूलता राहील. फार दगदग करू नका. कलेत प्रगती होईल. शुभ ता. २६, २९, ३०

### तुला:- वादाचे प्रसंग टाळावेत

खूप काही मिळवण्यापेक्षा, जे मिळाले त्याची किंमत समजणं गरजेचं असतं. बुध-गुरु केंद्रयोग भाग्यवृध्दिंगत करणारा आहे. शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी. आहार, विहाराकडे दुर्लक्ष करू नका. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २६, ३०

### वृश्चिक:- आर्थिक प्रगती

जे घडतं ते चांगल्यासाठीच, कधी ते आपल्या तर कधी दुसर्‍याच्या चांगल्यासाठी असतं. बुध- गुरु केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. संततीच्या हितसंबंधाकडे अधिक लक्ष द्यावे. अर्थार्जन योग्य मार्गानेच करावे. समस्या संभवतात. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्थावर प्रश्न लांबणीवर पडतील. शुभ ता. २६, २९

### धनु:- स्थावर प्रश्न संभवतात

कितीही परिस्थिती बदलली तरी, गोड स्वभाव बदलू नका. सुखस्थानी मंगळ- शनी असल्याने स्वास्थ टिकवावे. घरातील वातावरण शांततेचे ठेवावे. स्थावर प्रश्न संभवतात. संततीची प्रगती मनासारखी होईल. नवीन योजना सध्या नकोत. सरकारी कामे मनासारखी होतील. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २६, ३०

### मकर:- कलागुणांचा विकास

शब्द दिल्याने आशा निर्माण होते. शब्द पाळल्याने विश्वास निर्माण होतो. बुध- गुरु केंद्रयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. भावंडाशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. नव्या संधी लाभतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. २६, २९

### कुंभ:- शिक्षणातून प्रगती

माणूस सुखाची नाही, दुःखाची चव सर्वात जास्त सांगत बसतो. धनस्थानी शनि- मंगळ आहेत. त्यामुळे आर्थिक समस्या संभवतात. अनावश्यक खर्च टाळावेत. अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती होईल. नवविचार विचारपूर्वक स्विकारावेत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शिक्षणातून प्रगती घडेल. शुभ ता. २६, २९, ३०

### मीन:- अस्वस्थ राहील

आयुष्य परिपूर्ण नसूनही आनंद मानणे, म्हणजे अपूर्णतेतही समाधान होय. राशीतच शनि- मंगळ असल्याने सध्या अस्वास्थ्य राहील. प्राप्त परिस्थितीत समाधानी रहावे. संकल्प आणि सिद्धी यात ईश्वरी इच्छा उभी असते. मार्गक्रमण समाधानाने करीत रहावे. बुध- गुरु केंद्रयोग समस्यातून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २६, २९, ३०

!! शुभ भवतु !!

तत्वदर्शन डॉ. राजेंद्र डोळक

# वेद दर्शन



भारतीयांच्या कोणत्याही ज्ञानशाखेचा अभ्यास सुरू करताना अथवा इतिहास लिहिताना सर्वप्रथम वेदांपुढे मान लवविणे अवश्य असते. कारण सर्व ज्ञानशाखांच्या नद्या या वेदांच्या गंगोत्रीपासूनच वाहतात. वेदांमध्ये सर्व प्रकारची ज्ञानबीजे आहेत, असा भारतीयांचा समज आहे. वेद हे भारतातील प्राचीनतम वाङ्मय असल्यामुळे याचा विचार केल्याशिवाय पुढे पाऊल सरकणे अशक्य आहे. जुन्या काळी जगात कोणत्याही ज्ञानाचा उद्गार हा प्राय: काव्यरूपाने होत असे. तत्त्वज्ञानासारखा जटिल विषयही काव्यात घोळून सादर होत असे. वेदांची स्थिती याहून भिन्न नाही. यात अनेक ठिकाणी पांडित्य हे काव्यबुद्धीच्या विलासातून अवतरलेले दिसते.

वेद हे ज्ञानाचे अत्युच्च शिखर आहे, अशी भारतीयांची भाविक समजूत असल्यामुळेच वेद म्हणजे ज्ञान आणि ज्ञान म्हणजे वेद हे समीकरण रूढ झाले. वेद या शब्दाची उत्पत्ती 'विद्' या धातूपासून सिद्ध होते. 'विद्'चा अर्थ 'जाणणे' म्हणजेच ज्ञान करून घेणे असा होतो. म्हणून वेद म्हणजे ज्ञान. हे ज्ञान इतके बिनचूक, अपरिवर्तनीय आणि आदर्श आहे की, ते मनुष्यबुद्धीला सुचूच शकत नाही किंवा होऊच शकत नाही. त्यामुळे वेद हे अनादि, अपौरुषेय व नित्य आहेत, ती ईश्वराची पवित्र वाणी आहे, ते आदिपुरुषाचे निश्वसित आहेत, अशी प्राचीन काळापासून आजतागायत भाविकांची समजूत आहे. तथापि, वेद हे ईश्वरकृत नसून मनुष्यकृत म्हणजेच ते अपौरुषेय नाहीत तर पौरुषेय आहेत. हा वाद त्यानंतरच्या थोड्याच काळापासून सुरुवात झाला; आणि ते बरोबरही आहे.

वेद हे अपौरुषेय राहणारच कसे? वेद हे मनुष्यकृत आहेत, ते काही आभाळातून खाली पडले नाहीत, हे वेदांवरूनच स्पष्ट दिसते. कारण वेदांमध्ये मंत्रांचा अथवा ऋचांचा ऋषी कोण? पुरुष अथवा स्त्री आहे, हे तेथे तेथे नमूद केले असते. शिवाय वेद म्हणजे शब्दांनी बनलेली निरनिराळी वाक्यसमूहे आहेत आणि वाक्य तर मनुष्यच उच्चारतो किंवा लिहितो.

मनुष्येतरास वाक्य लिहिताना किंवा कोणीच पाहत किंवा ऐकत नाही. अशारीतीने शब्द, भाषा, वाक्ये इत्यादी पौरुषेयच असल्यामुळे आणि ते अपौरुषेय आहे, असे सिद्ध करण्याचे काहीच साधन उपलब्ध नसल्यामुळे वेद मनुष्यकृत आहे, हे सहजच दिसते. वेद शब्दाचा मूळ अर्थ ज्ञान किंवा विद्या. या व्यापक अर्थाने वेदकालीन सर्व विद्यांचा निर्देश वेद या संज्ञेने वेदांमध्ये केलेला दिसतो. उदा. आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, इतिहासवेद, पुराणवेद इ. वेदोत्तरकालीन सूत्रग्रंथांमध्ये हा व्यापक अर्थ जाऊन वेद म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असाच निर्देश होऊ लागला. पण या चार वेदांचा बोधक शब्द मात्र 'त्रयीविद्या' असा आहे.

त्रयी म्हणजे तीन. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद या तीन वेदांचा उल्लेख सामान्यपणे त्रयी म्हणून केला जातो. पण सामवेद म्हणजे गायली जाणारी ऋग्वेद संहिताच आहे, असे म्हणून त्रयी या शब्दाने ऋग्वेद, यजुर्वेद व अथर्ववेद असा तीन संहितांचा उल्लेख केला तरी चालतो. यावरून वेदविद्या म्हणजे तीन संहितांची विद्या असे म्हणणे हा एक संकेत दिसतो. आणखी एक संकेत असा आहे की, वेद खरोखर दोनच आहेत, ऋग्वेद व अथर्ववेद. असे जरी असले, तरी सर्वसामान्यांच्या नजरेसमोर वेद म्हटले की ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद अशी चारच संख्या उभी राहते. ऋग्वेद हा प्रार्थनोपयोगी मंत्रांचा संग्रह आहे. यजुर्वेदात यज्ञात दिल्या जाणाऱ्या आहुतींचे 'स्वाहा' असे पद ज्या वाक्यांच्या शेवटी येते ते मंत्र आहेत. सामवेद हा गायनाच्या विविध शैलींचा संग्रह आहे. साम म्हणजे गायन. साम हे ऋग्वेदातील पद्यांवर गायचे असते. अथर्ववेद हा घरगुती विधी व मंत्रतंत्रांसंबंधीचे विधी यांना उपयोगी असा आहे. मंगल व अमंगल असा जादूटोणा हा मुख्यतः या वेदाचा विषय आहे. वेदांचे हे प्रमुख चार भाग असले, तरी एवढ्याने संपूर्ण वेदवाङ्मय पूर्ण होत नाही.

या वाङ्मयात आणखी इतरही ग्रंथांचा समावेश करावा लागतो. 'मंत्र ब्राह्मणयोर्वेदनामधेयम' असे सत्याषाढ-हिरण्यकेशी श्रौत्रसूत्रात म्हटले आहे. मंत्र व ब्राह्मण या दोन ग्रंथांना 'वेद' असे नाव आहे, असे या म्हणण्याचे तात्पर्य आहे. ज्याला वेद संहिता म्हणतात; तो भाग मंत्र समजायचा. कर्मकाली ज्याचे पठन करावे लागते तो मंत्र. या मंत्रांच्या संहितेच्या म्हणजेच संग्रहाला संलग्न असा जो गद्य भाग असतो, त्याला 'ब्राह्मण' (ग्रंथ) म्हणायचे. कर्म कोणत्या फलेच्छेने करावे, ते कसे करावे व करताना कोणता मंत्र पठन करावा याचे सोपपत्तिक विवेचन येथे सांगितले असते. मंत्र व ब्राह्मण या दोहोंमधूनच वेगळा केलेला 'आरण्यक' नावाचा एक विभाग असतो. 'आरण्यक' म्हणजे अरण्यात ज्या ब्राह्मणभागाचे किंवा वेदभागाचे पठन करावयाचे तो. या सर्व वाङ्मयाला 'श्रुती' म्हणतात. श्रुत म्हणजे ऐकलेले.

देवांनी सांगितले ते ऋषींनी ऐकले, ते वेदांत आहे, असा वैदिकांचा समज आहे. 'अतींद्रियार्थदृष्टारोही ऋषयः' म्हणजे ऋषींना अतींद्रिय ज्ञान होते. त्यांना मंत्रद्रष्टे म्हणतात. म्हणजे तीव्र तपामुळे मंत्र त्यांना प्रत्यक्ष झाले. वेदांना श्रुती म्हणण्याचे आणखीही एक कारण, प्राचीन काली लेखनकलेच्या अभावी वेदांचे अध्ययन गुरूने सांगावे व शिष्यांनी ऐकून ते वेद पाठ करावे, अशा रीतीने होत असे. त्यामुळे पूर्वी विद्याग्रहण हे डोळ्यांच्या साहाय्याने न होता कानांच्या साहाय्याने होत असे. वेदवाङ्मय हे अशारीतीने श्रवणाद्वारे जतन झालेले असल्यामुळे ते बव्हंशी अविकृत किंवा शुद्ध स्वरूपात कायम आहे, असे समजले जाते. वेद आपल्याकडे फार पवित्र आणि पूज्य मानले जातात. ज्याला वेदांप्रती आदर अथवा प्रामाण्यबुद्धी नाही त्याला पाखंडी समजण्यात येते. 'सर्वज्ञानमयो ही सः' सर्व ज्ञानांचा संग्रह त्यात आहे. वेदांत सांगितलेला धर्म तोच वैदिक धर्म अथवा श्रौतधर्म अथवा सनातन धर्म. आजकाल वैदिक वाङ्मयाचा अभ्यास होण्याचे प्रमाण कमी होत चालले असून वैदिकेतर वाङ्मयाचा अभ्यास जास्त होत आहे. बदललेले आर्थिक समाजजीवन याला कारणीभूत आहे. यात कोणाचाच दोष नाही. पण अशाही परिस्थितीत ब्राह्मणांनी निष्ठेने पाठांतराच्या रूपाने वेदांची जोपासना केली. वेदांचे अध्ययन व अध्यापन हे ब्राह्मणांचे विहित कार्य समजण्यात येते. वेदांच्या निरनिराळ्या पाठशाळा निर्माण करण्यात आल्या. भारतात अनेक सत्ता आल्या आणि गेल्या. परंतु ब्राह्मणांनी चिवटपणे वेदांच्या संगोपनाचे कार्य चालू ठेवून वेदविद्या जिवंत ठेवली हे ब्राह्मणांचे कार्य आहे, हे मान्य केलेच पाहिजे.

पान २ वरून

## इराण संघर्षातून भारतासाठी धडे..

**निष्कर्षः-** इराण संघर्ष हा २१व्या शतकातील युद्धाचा एक नमुना आहे, जिथे लढाया केवळ रणांगणावर होत नाहीत; तर आर्थिक, तांत्रिक, माहिती आणि मानसशास्त्रीय क्षेत्रांमध्येही लढल्या जातात.

**भारतासाठी यातील मुख्य संदेश स्पष्ट आहेः-** भविष्यातील युद्धे केवळ शस्त्रास्त्रांच्या जोरावर जिंकली जाणार नाहीत, तर राष्ट्राच्या सर्व शक्तींच्या एकत्रित वापरावर अवलंबून असतील. भारताने पारंपरिक लष्करीशक्तीपासून पुढे जात, एक सर्वसमावेशक राष्ट्रीय सुरक्षा प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे, जी 'हायब्रीड' युद्ध, आर्थिक दबाव आणि तांत्रिक आव्हानांना समर्थपणे तोंड देऊ शकेल.

**अंतिम रणनीतिक निष्कर्षः-** 'हायब्रीड युद्ध' हेच नवीन रणांगण आहे. आर्थिक आणि ऊर्जासुरक्षा निर्णायक ठरणार आहे. ड्रोन, सायबर आणि 'एआय' तंत्रज्ञान युद्धाचे स्वरूप बदलत आहे. अंतर्गत स्थैर्य आणि रणनीतिक स्वायत्तता अत्यंत महत्त्वाची आहे.

पान २ वरून

## स्थलांतराच्या सावलीत बालपण

ज्यामुळे एखादं मूल एका राज्यातून दुसऱ्या राज्यात गेलं तरी त्याच्या शिक्षणाचा मागोवा घेता येईल. दुसरे म्हणजे, कामगारांच्या कार्यस्थळांवर बालसंगोपन आणि शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. बांधकाम साईट, वीटभट्ट्या किंवा औद्योगिक प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या कुटुंबांसाठी ही व्यवस्था अत्यंत महत्त्वाची आहे. तिसरे म्हणजे स्थानिक प्रशासन, शाळा आणि समुदाय यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करणे. या प्रश्नाकडे केवळ आकडेवारीच्या दृष्टिकोनातून पाहणं योग्य ठरणार नाही. आज प्रश्न फक्त स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा नाही; प्रश्न आहे आपल्या विकासाच्या दृष्टिकोनाचा. जर शहरांच्या प्रगतीसाठी श्रम करणाऱ्या कामगारांच्या मुलांनाच शिक्षणापासून दूर राहावं लागत असेल, तर तो विकास खरोखर सर्वसमावेशक म्हणता येईल का? भारताचा विकास केवळ शहरांच्या इमारतींनी मोजला जाणार नाही. तो त्या समाजाच्या संवेदनशीलतेने मोजला जाईल, जो आपल्या सर्वात असुरक्षित मुलांच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारतो. कारण विकासाच्या वाटेवर चालताना जर एखादी पिढी शिक्षणापासून दूर राहिली, तर त्या विकासाची किंमत खूप मोठी असू शकते आणि हरवलेलं बालपण कोणत्याही विकासाने परत आणता येत नाही.

पान ४ वरून

## श्रीमंत बाजीराव पेशवे...

फिल्ड मार्शल मॉण्टगोमरी हे ब्रिटिश सैन्याचे सरसेनापती होते. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश सैन्य जिंकले त्याचे श्रेय त्यांच्या नेतृत्वाला दिले जाते. त्यांनी म्हटले आहे की, श्रीमंत बाजीराव पेशवे हे भारतातील सर्वांत कुशल घोडदळाचे सेनापती होते. असेच कौतुक व्हिएतनाम सैन्यामध्येही केले गेले आहे. बाजीराव पेशव्यांनी त्या काळाला योग्य ठरेल अशी युद्धनीती वापरून त्या वेळचे निजाम, मोगल व इतर शत्रूंचा पराभव केला. भारताच्या शत्रूंनी बाजीरावांची घोडदौड थांबविण्याकरिता नादिरशहाला इराणमधून भारतात हल्ला करण्यासाठी बोलावले. बाजीरावांशी लढण्यासाठी जात असता आजारी पडले आणि नर्मदेच्या काठावर त्यांचा मृत्यू झाला.

पान ३ वरून

## अये बाले लीलावति

एका कवडीचुंबकाच्या दानाचे गणित उदाहरणासारखे विनोदी श्लोक पण आहेत. गणितातील संख्यालेखन, १० चा घात १७ पर्यंत म्हणजे एकं, दहं, शतम्...परार्ध, संख्याप्रणाली, गुणाकार, भागाकारादी ४ प्राथमिक क्रिया व त्या करण्याच्या विविध पद्धती, व्यवहारी अपूर्णांक व त्यांची गणिते, शून्य आणि अनंत या कल्पना, वर्ग, घन, घात आणि वर्गमूळ, घनमूळ काढण्याच्या सोप्या पद्धती, त्रैराशिकच नव्हे तर पंच किंवा सप्तराशीक सूत्रे, कुट्टकव्यवहार हे सर्व उद्गामी पद्धतीने पण सोप्या शब्दात शिकताना आपण गणिताच्या गहन विद्यारण्यात कधी आणि कसे विहार करू लागतो हे कळतही नाही. विलोम आणि व्यस्तविधीची उदाहरणे, एकेरी, दुहेरी आणि तिहेरी समीकरणे, मेल, संयोग आणि अंकपाश सूत्रे, क्रमचयी, श्रेढी गणिते व त्यांची मनोरंजक सूत्रे, बीजगणिताची सूत्रे आणि अभ्यास हे सर्व या लीलावतीत आहे. याचबरोबर विविध आकृतींचे क्षेत्रमापन, इष्टिकाचिती, घन, गोल, शंकू यांच्या घनफळाची सूत्रे, भूमिती, वर्तुळाच्या पायची सूक्ष्म किंमत, त्रिकाणमिती, छायाव्यवहार हे सर्व मनोरंजक आणि रसाळ काव्यमय भाषेत समजावले आहे.

**भास्कराचार्यांची योग्यताः** किंचित आत्मप्रौढीपर पण तरीही उचित शब्दांत सांगताना ते स्वतःच म्हणतात की, ८ व्याकरणे, आयुर्वेदाच्या ६ संहिता, षट्शास्त्रे, गणित ग्रंथ, चार वेद, पाच भरतशास्त्रे, दोन मिमांसांचा अभ्यास असूनही ब्रह्मदेवाच्या अगाध महिम्याचे भान असलेल्या भास्कराचार्याने या ग्रंथाची निर्मिती केली आहे.

**फलश्रुती :** गणित अभ्यासकांनी लीलावती विभाग आत्मसात का करावा हे सांगताना भास्कराचार्य म्हणतात- '**येषां सुजातिगुणवर्गविभूषितांगी। शुद्धाऽ खिल-व्यवहृतिः खलु कंठसक्ता।।** अर्थात- जाती, अपूर्णांक, गणिताच्या प्राथमिक क्रिया आणि त्यांच्या योगाने करता येणारे सर्व व्यवहार, त्यांची सूत्रे व नियम अत्यंत शुद्ध आणि स्पष्टरूपात रसमयी भाषेत सांगणारा ही लीलावती कंठस्थ करणाऱ्याच्या सुखसंपत्तीत सदैव वाढ होईल.

पान ५ वरून

## फुक्कटची माया अन्...

पण हा शब्दच आता मृत्युपंथाला लागला आहे. जिथे चुलीचेच अस्तित्व लुप्त होण्याची शक्यता आहे, तिथे वैल कसा आणि का म्हणून टिकणार? नाकाने कांदे सोलणे खरे तर मराठी माणसांचा मराठी भाषा आणि महाराष्ट्रातील विविध बोलींविषयीचा कळवळा हा कृतिशून्य आणि बेगडी आहे. महाराष्ट्राच्या काही भागात 'फुकटची माया अन् दाताले घामोया' अशी एक म्हण आहे. कोणताही त्रास सहन न करता, कोणतीही उपाययोजना न करता प्रश्नाबाबत कृतिशून्य आणि निरर्थक अशी कोरडी आस्था व्यक्त करीत राहण्याच्या माणसांच्या सवयींसाठी-कृतींसाठी या म्हणींचे उपयोजन केले जाते. मराठी माणसांना भाषेच्या संरक्षणार्थ काहीच कृती न करता फक्त शाब्दिक बुडबुडे सोडत राहावयाचे आहे असेच दिसते. एकूणच मराठी आणि महाराष्ट्रातील बोलींविषयी, लोकभाषांविषयी मराठी माणसांचा कळवळा म्हणजे 'फुकटची माया अन् दाताले घामोया' अशीच स्थिती आहे. या स्थितीला महाराष्ट्राच्या काही भागात 'नाकाने कांदे सोलणे' म्हणतात.

पान ५ वरून

## पर्यावरण संरक्षणाचे कठीण स्वप्न

युद्धाच्या वेळी राष्ट्रांचे लक्ष विजय, सुरक्षा आणि रणनीती यांवर केंद्रित असते. अशा परिस्थितीत पर्यावरण संरक्षण ही दुय्यम, किंबहुना तृतीयक बाब ठरते. राष्ट्रीय हिताच्या नावाखाली अनेक निर्णय घेतले जातात; परंतु त्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम दुर्लक्षित राहतो. या पृष्ठभूमीवर आंतरराष्ट्रीय नियमांची प्रभावी अंमलबजावणी होणे अधिकच कठीण बनते. या सर्व परिस्थितीचा विचार केल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण संरक्षणासाठी नियम आणि करार अस्तित्वात असले, तरी त्यांची ताकद त्यांच्या अंमलबजावणीवर अवलंबून आहे, हे स्पष्ट होते. केवळ नियम बनवून चालत नाही, तर त्यांची काटेकोर अंमलबजावणी, प्रभावी देखरेख आणि उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई आवश्यक असते. अन्यथा, हे नियम कागदोपत्री राहतील आणि प्रत्यक्षात पर्यावरणाचे नुकसान रोखण्यात अपयशी ठरतील. डॉ. जसपाल सिंग यांच्या मतानुसार, सध्याची आंतरराष्ट्रीय धोरणे ही योग्य दिशेने टाकलेले पाऊल असले, तरी अपुरी आहेत. त्यासोबतच जागतिक स्तरावर उत्तरदायित्व निश्चित करणारी यंत्रणा उभी राहणेही तितकेच आवश्यक आहे. पर्यावरण हा कोणत्याही एका देशाचा मर्यादित विषय नाही. त्याचे परिणाम सीमांच्या पलीकडे जातात आणि संपूर्ण मानवजातीवर प्रभाव टाकतात. त्यामुळे युद्धकाळातही पर्यावरणाचे संरक्षण ही ऐच्छिक बाब नसून एक अनिवार्य जबाबदारी आहे. जागतिक समुदाय या जबाबदारीची गांभीर्याने दखल घेत नाही आणि ठोस पावले उचलत नाही, तोपर्यंत पर्यावरणाचे संरक्षण हे एक अपूर्ण स्वप्नच राहील.

**सध्या जागतिक संघर्ष तीव्र झाला असून, यामुळे सारे जगच या संघर्षाच्या तडाख्याखाली आहे. कित्येक महासत्तांमध्येही नागरिकांना महागाईच्या झळा बसत आहेत, तर कित्येकांच्या अर्थव्यवस्था या दिवाळखोर झाल्या असून, उधारीचे जिणे त्या राष्ट्रांच्या नशिबी आले आहे. एकीकडे जग या स्थितीचा सामना करत असतानाच, भारत मात्र या आव्हानांना समर्थपणे तोंड देत नेटाने अर्थव्यवस्थेची प्रगती करताना दिसतो. त्याचे मूळ कारण आहे, भारताने केलेला धोरणात्मक बदल होय. गेल्या १२ वर्षांत भारताच्या धोरणात झालेल्या क्रांतिकारी बदलांमुळे भारताने काही भूमिका आक्रमकपणे राबवलेल्या दिसतात. तसेच याच काळात भारताने जगभरातील देशांबरोबर केलेल्या करारांची चर्चाही मोठ्या प्रमाणात झाली. असाच एक करार म्हणजे नुकताच भारताने रशियाबरोबर केलेला 'रेसिप्रोकल एक्सचेंज ऑफ लॉजिस्टिक्स' करार होय!**

# प्रभावक्षेत्राचे सीमोल्लंघन...

परराष्ट्रकारण

**कौस्तुभ वीरकर**



भारत आणि रशिया यांच्यात वर्ष २०२५ मध्ये झालेला हा करार अलीकडेच लागू झाला असून, हा करार भारताच्या बदलत्या धोरणाचे प्रतीक ठरतो. सुमारे तीन हजार सैनिक, दहा लष्करी विमाने आणि पाच युद्धनौकांच्या परस्पर तैनातीची तरतूद या करारामध्ये करण्यात आली आहे. तसेच एकमेकांच्या तळांचा वापर, इंधनपुरवठा, दुरुस्ती व पुरवठा साखळीची देवाणघेवाणीचा समावेश या करारात असल्याने, या कराराला पारंपरिक लष्करी सहकार्याच्या चौकटीतही बंदिस्त करता येत नाही.

इतिहासाच्या संदर्भात पाहिले, तर सोव्हिएत युनियनच्या काळात भारत-रशिया संबंधांना वैचारिक आणि राजकीय अधिष्ठान होते. मात्र, नंतर भारताचे परराष्ट्र धोरण अलिप्ततावादाकडे काहीसे झुकले. मात्र, अलीकडे या अलिप्ततावादी धोरणाच्या परंपरेला आधुनिक संदर्भ देत, भारताने बहुपक्षीय संतुलनाचा मार्ग स्वीकारल्याचे दिसते.

रशियाबरोबर झालेला हा करार त्याच मार्गाचा पुढचा टप्पा म्हणता येईल. या माध्यमातून भारताने एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट केली आहे की, भारत अंधानुकरण करणारा देश नसून, स्वतःच्या हितसंबंधांच्या आधारे संबंधांची उभारणी करणारा स्वतंत्र घटक आहे. या कराराचा खरा अर्थ त्याच्या व्यापक भू-राजकीय परिणामांतदेखील दडलेला आहे. अमेरिकेबरोबर भारताचे आधीच महत्त्वाचे लष्करी करार अस्तित्वात आहेत. तरीही, भारताने रशियाबरोबर केलेल्या या करारातून भारताची सामरिक स्वायत्तताच अधोरेखित होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात 'मित्र' आणि 'गट' या संकल्पना झपाट्याने बदलत असताना, भारताने राष्ट्रहिताला प्राधान्य देत सर्वांशी संबंध जपण्याची भूमिका स्वीकारली आहे.

भारताच्या दृष्टीने अधिक विचार केल्यास, चिनी आव्हानाच्या पार्श्वभूमीवर या कराराचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते. चीन-रशिया संबंध दृढ होत असतानाच, भारत-रशिया सहकार्याचे हे नवे रूप चीनसाठी एकप्रकारची सामरिक अस्वस्थता निर्माण करणारे ठरते.

रशियाला या करारामुळे भारताच्या लष्करी तळांचा वापर करण्याचा अधिकार मिळणार असून, भारतालाही रशियाचे तळ वापरता येणार आहेत. तसेच या करारामुळे भारताला आर्क्टिक प्रदेशात प्रवेशाचीही संधी मिळणे आणि रशियाला हिंद महासागरात कार्यक्षेत्र विस्तारता येणे, या दोन गोष्टी शक्तिसंतुलनाला नवे वळण देणार्या ठरणार आहेत. आर्क्टिक प्रदेश ऊर्जा संसाधनांचा साठा आणि नव्या सागरीमार्गांमुळे भविष्यातील अर्थकारणाचे केंद्र ठरण्याची चिन्हे आहेत. दुसरीकडे, हिंद महासागर हा जागतिक व्यापाराचा कणा. या दोन्ही क्षेत्रांत आपली उपस्थिती ठेवणे, सध्या अनेक देशांचे स्वप्न असून, भारत-रशियातील या करारामुळे दोन्ही देशांना ही समान संधी चालून आली आहे.


एकेकाळी अमेरिकाकेंद्री असलेली एकध्रुवीय व्यवस्था, आता बहुध्रुवीय स्वरूप धारण करत आहे. या नव्या व्यवस्थेत भारत संतुलन साधणारी जागतिक शक्ती म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे जगाच्या दृष्टीनेही या कराराला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

आज अनेक संघर्षांमध्ये शांतता निर्माण करण्यास सक्षम राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जात असताना, भारताने आपले प्रभावक्षेत्र वाढवणे, हीदेखील काळाची गरज झाली होती. रशियाबरोबरच्या याच करारातून भारताने आपल्या प्रभावक्षेत्राच्या विस्ताराच्या सीमा ओलांडल्याचे विश्वासाने म्हणता येते.

# यंत्रमानवाची भरारी!

वेध

**मुकुल आव्हाड**



बीजिंग येथे काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या हाफ मॅरेथॉनमध्ये केवळ मानवी धावपटूच नव्हते, तर अत्याधुनिक 'ह्युमनॉईड रोबोट्स' देखील सहभागी झाले होते. आश्चर्याची बाब म्हणजे, या रोबोट्सनी अनेक सरावलेल्या मानवी धावपटूंना मागे टाकत विजयाचा नवा विक्रमही रचला. १०० गटांमधून ३०० हून अधिक रोबोट्स या मॅरेथॉनमध्ये धावले आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील गरुडभरारी सगळ्यांनी अनुभवली.

**आखाती देशांमध्ये धुमसणाऱ्या संघर्षाची जगालादेखील झळ सोसावी लागली. युद्धाचा वणवा दिवसेंदिवस वाढत असताना साऱ्यांचेच लक्ष सुरू असलेल्या वाटाघाटी, महासत्तांच्या भूमिकेकडे लागले आहे. या युद्धाचे दूरगामी परिणाम होणार आहेतच; मात्र त्याचबरोबर बदलणाऱ्या भूराजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उदयाला येणाऱ्या नव्या महासत्तांकडेदेखील जगाचे लक्ष आहे. चीनसारख्या राष्ट्राने या युद्धात 'झाकली मूठ सव्वा लाखाची' हीच भूमिका घेतल्याचे निर्दशनास येते. तंत्रज्ञानाच्या आघाडीवर चीनची सुरू असलेली मुलखावेगळी कामगिरी थक्क करणारी आहेच; मात्र त्याचबरोबर तंत्रज्ञानातील विकासाला प्राधान्य न देणाऱ्या राष्ट्राला एक गंभीर इशाराही आहे.**

या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या रोबोट्सच्या पायांची रचना मानवी स्नायूंप्रमाणेच लवचिक ठेवण्यात आली होती, ज्यामुळे ते खडबडीत रस्त्यावरही समतोल राखू शकले. या रोबोट्समध्ये बसवण्यात आलेले सेन्सर्स आणि 'रिअल-टाईम डेटा प्रोसेसिंग'मुळे त्यांना वळणे घेणे, मानवी धावपटूंच्या तुलनेत आपला वेग नियंत्रित करणे सोपे गेले. जेव्हा हे रोबोट्स मानवी धावपटूंच्या खांद्याला खांदा लावून धावत होते, तेव्हा मानवी क्षमता आणि यंत्रमानवाची अचूकता यांच्यातील संघर्ष लोकांना बघायला मिळाला. या शर्यतीत चिनी स्मार्टफोन ब्रँड 'केपी'ने विकसित केलेला यंत्रमानव विजयी झाला. त्याने ही शर्यत ५० मिनिटे, २६ सेकंदांमध्ये पूर्ण केली. या नव्या विक्रमाने गेल्या महिन्यात लिस्बन येथे युगांडाचा धावपटू जेकब किप्लिमो याने रचलेल्या विक्रमावर मात केली. यावर भाष्य करताना एक चिनी अभियांत्रिकी म्हणाले की, ही प्रगती कदाचित आपल्याला फारशी अर्थपूर्ण वाटणार नाही. मात्र, काळाच्या ओघात औद्योगिक क्षेत्रामध्ये तंत्रज्ञान हस्तांतरण वेगाने शय होईल. बीजिंग हाफ मॅरेथॉनमधील या यशामुळे, रोबोटिसच्या व्यापारीकरणाला चालना मिळणार आहे. आपत्कालीन परिस्थिती, शोध आणि बचावकार्य आणि लष्करी हालचालींमध्ये वेगवान रोबोट्सचा वापर फायदेशीर ठरू शकतो. जिथे म्हणून माणसाच्या वावरण्याला धोका संभावतो, तिथे यंत्रमानवांच्या माध्यमातून काम करवून घेतले जाऊ शकते. अशा प्रयोगांमधून व्यावसायिकतेचं गणित बांधणाऱ्या या देशातील विद्यार्थ्यांच्या मनामध्येदेखील, यामुळे कुतूहल जागृत झाले आहे. या मॅरेथॉनमध्ये धावणाऱ्या यंत्रमानवांना बघून उपस्थित असलेल्या ११ वर्षांच्या मुलाने निश्चय केला की, तो भविष्यात विद्यापीठाचे शिक्षण घेताना 'रोबोटिक्स'च्या अभ्यासक्रमासाठी प्रयत्नशील राहील. तरुण मुला-मुलींच्या मनाच्या अवकाशात जर एखाद्या गोष्टीने घर केले की, आपसूकच त्यांना त्याविषयीची गोडी लागते. चीनसारख्या राष्ट्राने आज हे प्रगतीचे शिखर बघण्यासाठी दोन ते तीन दशकांपूर्वी मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आदी गोष्टींमध्ये गुंतवणूक केली होती. काळाच्या ओघात, भविष्याची दिशा ओळखून चीनने इतर महासत्तांना लाजवेल, अशी कामगिरी करून दाखवली. एका बाजूला सत्तेच्या खेळात अग्रेसर राहताना, दुसऱ्या बाजूला इतर आघाड्यांनादेखील तितयाच शिताफीने हाताळण्याचे काम चीनने केले आहेत.




बीजिंग हाफ मॅरेथॉनमधील 'ह्युमनॉईड रोबोट्स'ची ही कामगिरी मानवी बुद्धिमत्तेचा विजय आहे. एका बाजूला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आगमनामुळे, सातत्याने बदलणाऱ्या भूराजकीय परिस्थितीमुळे आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या रोजगारावर गंडांतर आले आहे. डिजिटल विश्वात वावरताना समोर आलेली माहिती खरी आहे की खोटी, यावरसुद्धा शंका घेण्याचा काळ येऊन ठेपला आहे. अशा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, दुधारी तलवार असलेल्या तंत्रज्ञानाचा विचार अगत्याचे आहे.

# रोमारोमात संघ



**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा केवळ एक संघटनात्मक प्रयोग नसून, भारतीय संस्कृतीच्या अखंड परंपरेतून उगम पावलेली एक जिवंत आणि गतिशील विचारप्रणाली आहे. व्यक्तिनिर्माणातून समाजनिर्माण आणि समाजातून राष्ट्रनिर्माण हाच त्याचा मूलाधार राहिला आहे. समरसता, शिस्त आणि कर्तव्यभाव या मूल्यांच्या आधारे संघाने काळाच्या कसोटीवर स्वतःला सिद्ध करत एक प्रभावी सामाजिक शक्ती म्हणून आज स्थान निर्माण केले आहे. संघाच्या कार्यपद्धतीचा आणि प्रवासाचा घेतलेला मागोवा...**

मागोवा

**अभिषेक त्रिपाठी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ एक संघटना नाही, तर ती एक जिवंत, सतत प्रवाहित होणारी विचारधारा आहे. १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी रोवलेले हे बीज, आज एका विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. या वटवृक्षाच्या छायेत लाखो स्वयंसेवक घडले, समाजाचे विविध घटक एकत्र आले आणि राष्ट्रनिर्माणाची एक सशक्त परंपरा उभी राहिली. जवळपास शतकभराच्या या प्रवासात संघाने अनेक वादळे, टीका, गैरसमज आणि आरोप यांचा सामना केला. पण, संघ मूलभूत ध्येय-धोरणांपासून कधीही विचलित झाला नाही. संघाचे कार्य हे नेहमीच प्रसिद्धीपेक्षा कृतीवर आधारित राहिले आहे आणि हाच त्याच्या शक्तीचा खरा स्रोत आहे.

संघाच्या कार्यपद्धतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे व्यक्तिनिर्माण! संघ व्यक्तीला केवळ शारीरिक किंवा बौद्धिकदृष्ट्या सक्षम करत नाही, तर त्याला मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची प्रेरणा देतो. शाखेत होणार्या दैनंदिन क्रियाकलापांमधून शिस्त, संघटनशक्ती, नेतृत्वगुण आणि राष्ट्रनिष्ठा यांचा विकास होतो. ही प्रक्रिया साधी वाटली, तरी तिचा परिणाम अत्यंत व्यापक आणि दीर्घकालीन असतो. कारण एक व्यक्ती सर्वार्थाने सक्षम झाली की, त्या व्यक्तीद्वारे कुटुंब, समाज आणि राष्ट्रही सक्षम होते. १९३४ मध्ये महात्मा गांधी यांनी संघाच्या शाखेला दिलेल्या भेटीत, एक अत्यंत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले होते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शाखेत त्यांना कोणताही भेदभाव जाणवला नाही. सर्वजण एकत्र बसून, कोणत्याही जात- पात, उच्च-नीच भावनेशिवाय समतेचा अनुभव घेत होते. त्याकाळात अस्पृश्यतेचा प्रश्न अत्यंत तीव्र असाच होता. समाजात खोलवर रुजलेल्या या विकृतीच्या पार्श्वभूमीवर, संघाच्या शाखेत दिसणारी समरसता ही केवळ एक विचार नव्हती, तर ती एक जिवंत वास्तव होती. या समरसतेच्या भावनेमुळेच, संघाने समाजाला एकत्र आणण्याचे कार्य सातत्याने केले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात संघकार्याचा विस्तार अधिक वेगाने झाला. देशासमोरील विविध संकटकाळात स्वयंसेवकांनी पुढे येऊन सेवाकार्य केले. १९६२च्या भारत- चीन युद्धाच्या वेळी स्वयंसेवकांनी सीमावत भागात, तसेच शहरांमध्ये मदतकार्य उभारले. रक्तदान शिबिरे, शिस्तबद्ध वाहतूक नियंत्रण, सैनिकांच्या कुटुंबांना मदत अशा अनेक क्षेत्रांमध्ये, त्यांनी योगदान दिले. या सेवाभावाची दखल घेऊन १९६३च्या प्रजासत्ताक दिन संचलनात, संघाच्या स्वयंसेवकांना सहभागी होण्याची संधी देण्यात आली.

१९५४ मध्ये दादरा- नगर हवेली मुक्ती आंदोलनातही स्वयंसेवकांनी बजावलेली भूमिका, अत्यंत महत्त्वाची ठरली. परकीय सत्तेविरुद्ध लढताना त्यांनी संघटित- शक्तीचे यथार्थ दर्शन घडवले. या आंदोलनातून केवळ दादरा- नगर हवेलीची भौगोलिक मुक्तीच झाली नाही, तर स्वाभिमान आणि राष्ट्रभावनेची जाणीव अधिक दृढ झाली. या घटनांमधून संकटाच्या काळात पुढे येणे, समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणे आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राथमिकता देणे हा संघाचा स्वभाव स्पष्ट होतो. समाजाच्या विविध स्तरांमध्ये निःशब्दपणे कार्यरत राहून, संघाने आपले स्थान दृढ केले आहे. शिक्षण, सेवा आणि संस्कार या त्रिसूत्रीवर आधारित संघकार्य, समाजाला जोडण्याचे काम करत आहे.

संघाचा विस्तार आज केवळ भारतापुरता मर्यादित राहिलेला नाही. जगभरातील भारतीय समाजात संघप्रेरित कार्य दिसून येते. विविध देशांमध्ये शाखा, सेवा प्रकल्प आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून, भारतीय संस्कृतीचा प्रसार होत आहे. परदेशात राहणाऱ्या भारतीयांना आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवण्याचे कार्य संघ करत आहे. ही केवळ संघटनेची वाढ नाही, तर भारतीय विचारांच्या जागतिक स्वीकाराचीही साक्ष आहे. संघाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलण्याची गरज आहे. संघाला केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे, हे त्याच्या कार्याचा घेतलेला अपूर्ण आढावा ठरतो. संघ राष्ट्रभक्तीची, समरसतेची आणि कर्तव्यनिष्ठेची एक शाश्वत चेतना आहे. ही चेतनाच व्यक्तीला प्रेरणा देते, समाजाला एकत्र आणते आणि राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेला गती देते. संघ समजून घ्यायचा असेल, तर तो केवळ टीका किंवा समर्थनाच्या चौकटीत न बसवता, प्रत्यक्ष कार्यातून पाहावा लागेल. कारण, संघ हा शब्दांमध्ये मावणारा विषय नसून; तर ती अनुभवण्याची, जाणून घेण्याची आणि समजून घेण्याची एक प्रक्रिया आहे. संघाच्या कार्याचा प्रभाव समजून घेण्यासाठी त्याच्या स्वयंसेवकांशी संवाद साधावा लागतो, त्यांच्या कार्यात सहभागी व्हावे लागते आणि समाजात घडणार्या बदलांकडे लक्ष द्यावे लागते.

संघाच्या कार्यपद्धतीतील एक अत्यंत महत्त्वाचा आणि अनेकदा दुर्लक्षित राहणारा घटक म्हणजे 'संवाद'. संघाचा संवाद हा केवळ माहिती देण्यापुरता मर्यादित नाही, तर तो मनाला स्पर्श करणारा, विश्वास निर्माण करणारा आणि समाजाला जोडणारा असाच आहे. शाखेपासून ते समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारी ही संवाद व्यवस्थाच संघाच्या यशाचे एक प्रमुख कारण आहे.

संघात संवाद हा वरून खाली असा एकतर्फी नसून, तो द्विमाग आहे. स्वयंसेवक एकमेकांशी सतत संवाद साधतात, अनुभवांची देवाणघेवाण करतात आणि समाजातील गरजा समजून घेतात. यामुळे संघाचे कार्य हे केवळ नियोजनापुरते राहत नाही, तर ते वास्तव परिस्थितीशी जोडलेले राहते. प्रत्येक स्वयंसेवक हा संघाचा 'संवादवाहक' बनतो आणि आपल्या परिसरात, कुटुंबात व समाजात सकारात्मक विचार पोहोचवतो.

संघाचा संवाद हा भाषणांपुरता किंवा प्रचारापुरता मर्यादित नाही, तर तो कृतीतून दिसतो. सेवा प्रकल्प, आपत्तीच्या वेळी केलेले मदतकार्य, शिक्षणाच्या माध्यमातून दिलेले संस्कार या सर्वांमधूनच संघाचा संदेश समाजापर्यंत पोहोचतो. त्यामुळे संघाचा संवाद हा शब्दांपेक्षा अनुभवांमधूनच अधिक प्रभावीपणे पोहोचतो. आजच्या 'डिजिटल' युगातही संघाने संवादाच्या पारंपरिक पद्धतींचे महत्त्व कायम ठेवले आहे. प्रत्यक्ष भेटी, घर-घर संपर्क, शाखा, लहान गटांतील चर्चा या माध्यमांतून संवाद अधिक विश्वासार्ह आणि परिणामकारक बनतो. कारण, प्रत्यक्ष संवादातून निर्माण होणारा विश्वास कोणत्याही माध्यमातून सहज निर्माण होत नाही.

संघ समाजातील सर्वात शेवटच्या घटकापर्यंत संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. ग्रामीण भागातील दुर्गम वस्ती असो किंवा शहरी झोपडपट्टी, स्वयंसेवक त्या-त्या ठिकाणी जाऊन लोकांशी जोडले जातात, त्यांच्या समस्या समजून घेतात आणि त्यानुसार कार्य उभे करतात. त्यामुळे संघाचा संवाद हा केवळ विचार पोहोचवणारा नसून, तो समस्या सोडवणारा आणि आशा निर्माण करणारा ठरतो. संघाच्या या संवाद पद्धतीमुळेच संघ ही केवळ एक संघटना न राहता, समाजाच्या प्रत्येक घटकांत पोहोचलेली एक सशक्त चळवळ बनली आहे. घराघरांत पोहोचणारा, मनामनांत रुजणारा आणि कृतीतून व्यक्त होणारा हा संवादच संघाला अधिक व्यापक आणि प्रभावी बनवतो. संवाद ही संघाची केवळ ताकद नाही, तर तोच त्याच्या विस्ताराचा आणि समाजाशी असलेल्या नात्याचा खरा पाया आहे. संघ हा केवळ एक संघटनात्मक ढाचा नाही; तो राष्ट्राच्या चेतनेतील एक जिवंत विचार आहे; जो काळानुसार बदलत असला तरीही, आपल्या मूलभूत मूल्यांशी कधीही तडजोड करत नाही. (लेखक भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ता आहेत.)

# कमलही कमल खिला है।



## प्रस्थापितांना पाणी पाजणारे नेतृत्व या मातीत, त्यांनी अटकेपार झेंडे फडकवले

**सोलापूर शहर जिल्ह्यात १९८५ पासून भाजपाचा स्वर्णकाळ आहे. या ठिकाणी हाडाचे असंख्य कार्यकर्ते आहेत. त्यांच्या समर्थ योगदानामुळे १९८५ पासून सुवर्णकाळ आहे. बूथ यंत्रणेत इतके तरबेज आहेत की त्यांनी पार राजस्थान, उत्तरप्रदेशातही यशस्वी निवडणूक व्यूहरचना राबवून अटकेपार झेंडे लावले आहेत. हीच मुद्द्याची गोष्ट....**

निमीत्त | विजयकुमार पिसे

१९८० मध्ये अटलजी, लालजी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाची स्थापना झाली. त्यानंतर अवघ्या पाच वर्षातच सोलापूरमध्ये पुलोद आघाडीच्या माध्यमातून ११ नगरसेवक निवडून आले. मुंडे/महाजन यांनी १९९१ मध्ये बाळीवेस विजय चौकात भाजपाचा झेंडा फडकवला. त्या परंपरेतूनच २०२९ मोदींचा चौकार मारण्यासाठी आतापासूनच जय्यत केली असून ५६ जिल्ह्यांचे प्रभारी नियुक्त केले आहेत. सोलापूर शहर योगेश टिळेकर, सोलापूर ग्रामीण पूर्व गोपीचंद पडळकर आणि पश्चिम (माढा) संजय जगताप तसेच माजी खा.रणजीतसिंह नाईक निंबाळकर (मावळ पुणे) व रामभाऊ सातपुते (अहिल्यानगर दक्षिण) आणि सोलापूरचे सुपुत्र केशव उपाध्ये (ठाणे ग्रामीण) यांचीही नियुक्ती आहे.

१९८५ मध्ये प्रशासकीय कारकिर्दीत मनपा निवडणुका झाल्या. तेव्हा पुलोदचा यशस्वी प्रयोग झाला. किशोर देशपांडे भाजपाचे पहिले महापौर तर लिंगराज वल्याळ स्थायी समिती सभापती झाले. १९९१ मध्ये तेलुगू भाषिक संघ स्वयंसेवक वल्याळ यांनी काँग्रेसचे प्रस्थापित बाबुराव चाकोते यांना चीत केले. वल्याळ प. महाराष्ट्रातील पहिले आमदार ठरले. १९९५ मध्ये युतीचे शिल्पकार बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांनी शिवशाहीचे राज्य आणले. तेव्हाही चाकोतेंना पुन्हा झटका दिला. शरद पवारांचे निकटवर्तीय मुकेश अब्दुलपूरकर देखील पराभूत झाले. वास्तविक तेव्हा काँग्रेस आणि पवार यांचेच वर्चस्व होते. अशा काळात १९९५ मध्ये लोकसभा निवडणुकीत पडणारा उमेदवार म्हणून आ. वल्याळ यांना उभे केले. वल्याळ यांनी विद्यमान काँग्रेस खा.धर्मण्णा सादूल व इंडीचे ज.द. आ. रवीकांत पाटील या दोघांना धूळ चारली. गंगाधरपंत कुचन, तम्मा गंभीरे, वि.सि. भोगडे हे दिग्गज नेते तेव्हा भाजपा सोबत होते. वल्याळ खासदार झाल्यामुळे पोटनिवडणूक झाली. अल्पसंख्यक सावजी समाजाचे नरसिंग मेंगजींसमोर बाहुबली विश्वनाथ चाकोते सहज चीतपट झाले. ९९७ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक झाली. या मतदारसंघात भाजपाकडे संख्याबळ नव्हते, पण वल्याळ यांनी अशी रणनीती आखली की सुभाषबापू देशमुखांनी चमत्कार घडवला. यावेळी पवारांचे समर्थक विद्यमान आ. युनुसभाई शेख पराभूत झाले. २००३ च्या पोटनिवडणुकीत गोपीनाथजी मुंडे यांनी जुगारच खेळला. अकलूजहून प्रतापसिंह मोहिते पाटलांना सोलापुरात आणले. सुशीलकुमार मुख्यमंत्री झाल्यामुळे पोटनिवडणूक लागली होती. तेव्हा दुधविकासमंत्री आनंदराव देवकतेंना राजकीय जीवनात प्रथमच हार मानावी लागली. त्यानंतर देवकतेंचा काळ संपला. पण त्यांनी, आपण बळीचा बकरा ठरलो, म्हणत भंडारा उधळला. परिणाम दिसला. २००४ मध्ये वल्याळ यांनी मुंडे/महाजन यांना साद घातली. यावेळी लढ बापू.. म्हणून लोकसभेसाठी मैदानात उतरवले. मुख्यमंत्र्यांच्या सौभाग्यवती उज्वलाताई सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव करून बापू जायंट किलर ठरले. १९९७ पासून जायंट किलर ही त्यांची प्रतिमा आजही कायम आहे.

सोलापूर जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. अशा स्थितीत अक्कलकोटमध्ये रेवणसिध्द खेडगी यांनी प.महाराष्ट्रात पहिला नगराध्यक्ष, तर सुरेश पाटील पहिला पंचायत समिती सभापती आणि बाबासाहेब तानवडे यांनी दोन वेळा नामुष्की होऊन देखील रणांगण न सोडता १९९५ मध्ये पहिल्यांदा विधानसभेत भाजपाचा झेंडा फडकवला. तीन टर्म आमदार, गृहराज्यमंत्री भूषविलेले सिध्दाराम म्हेत्रे यांना (२००९) सिद्रामप्पा पाटील व पुढे सचिन कल्याणशेट्टी (२०१९/२०२४) यांनीही सलग दुसर्यांदा धूळ चारली.

२००४ मध्ये विजयकुमार देशमुख यांनी सुरू केलेली विजयपताका सलग पाचवेळा नॉनस्टॉप सुरू आहे. देशमुखांनी काँग्रेसचे युवराज विश्वनाथ चाकोते यांना दोनदा विजयी सलामी दिली. मतदारांनी चाकोतेंचे डिपॉझिट देखील ठेवले नाही. दक्षिण सोलापुरात सुभाषबापूंनी पुन्हा एकदा चमत्कार घडवत विद्यमान आ. दिलीप ब्रह्मदेव माने यांना पराभूत केले. २००९ मध्ये पराभवानंतरही निराश न होता, ॲड. शरद बनसोडे यांनी २०१४ मध्ये त्याची परतफेड केली. मोदी लाटेत देशाचे गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे प्रथमच पराभूत झाले. २०१९ मध्ये डॉ.जयसिध्देश्वर महास्वामी यांनीही तोच कित्ता गिरवला. या दरम्यान आ. दीपकआबा साळुंके यांना प्रशांत परिचारक यांनी स्थानिक स्वराज्य मतदारसंघात तर मंगळवेढ्याचे समाधान आवताडे यांनी भगीरथ भालके यांना चीतपट केले. २०१७ मध्ये स्वबळावर भाजपाने मनपा ताब्यात आणली. याच माध्यमातून २०२६ च्या मनपा निवडणुकीत भाजपा महाबाहुबली ठरला आहे. विक्रमी ८७ नगर-सेवक निवडून आले. पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या नेतृत्वाखाली, आ. सुभाषबापू, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, युवा आ. देवेंद्र कोठे, आ. आवताडे, राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक तसेच अध्यक्ष रोहिणी तडवळकर, शशिकांत चव्हाण यांनी विरोधकांना औषधालाही ठेवले नाही. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिकांमध्ये कमलही कमल खिला है। पक्ष स्थापनेपासून गत ४६ वर्षात भाजपाचा स्वर्णकाळ केवळ नेत्यांवर नाही, तर सामान्य निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या बळावर आला आहे. त्यामुळे यशाची ही यादी एवढी नाहीच, पार अटकेपार झेंडे फडकवले आहेत.

२००२ मध्ये मुख्यमंत्री मोदींची पहिली निवडणूक जिंकण्यासाठी सोलापूरच्या भाजपाने तीन आठवडे सुरत, गांधीनगर, अहमदाबाद येथे तळ ठोकला. या टीममध्ये लिंगराज वल्याळ, सुभाष देशमुख, रामचंद्र जन्नू, राजाराम गुर्रम, विजयकुमार पिसे, श्रीनिवास दायमा आणि अन्य कार्यकर्ते होते. तसेच राजस्थानात वसुंधरा राजे (झालरापाटण) यांच्यासाठी आणि राहुल गांधी यांच्या अमेठीत विक्रम देशमुख, दत्तात्रय गणपा, हेमंत पिंगळे यांसह अशोक निम्बर्गी, शशिकांत चव्हाण, रामचंद्र जन्नू, बनशेट्टी, सुकुमार सिध्दम, जय साळुंके व अन्य असंख्य कार्यकर्ते यांनी बूथ निहाय यंत्रणा कशी आखावी याचे गमक तेथील भाजपायींना दाखवले. वसुंधरा राजे सीएम झाल्या. अमेठीत राहुलजी प्रथमच पराभूत झाले. मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र,तेलंगाणा, छत्तीसगढ या राज्यांमध्येही स्थानिक कार्यकर्त्यांनी या परप्रांतात बूथ यंत्रणेचे प्रशिक्षण देऊन भाजपाची सत्ता आणण्यात मोठे योगदान दिले आहे.



# परिसीमन आणि महिला आरक्षणाचा पेच

**विरोधी पक्षांमुळे 'नारीशक्ती वंदन अधिनियम' विधेयक संसदेत पारित होऊ शकले नाही. त्यानंतर विरोधकांकडून सातत्याने समाजमाध्यमांवर विविध प्रश्न उपस्थित करून, मोदी सरकारलाच आरोपीच्या पिंजर्यात उभे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यानिमित्ताने परिसीमन आणि महिला आरक्षण यासंबंधीच्या संविधानिक तरतुदी समजून घेणे क्रमप्राप्त ठरावे.**

वेध | अमिता आपटे

डावे, काँग्रेसी आणि सगळेच विरोधी पक्ष मोदी सरकार २०१४ पासून सत्तेत असूनही अद्याप 'डिलिमिटेशन' म्हणजेच परिसीमन का गेले नाही, असा सवाल गेल्या दोन दिवसांपासून सातत्याने उपस्थित करीत आहेत. सध्याच्या लोकसभेच्या ५४३ जागांवरच ३३ टक्के महिला आरक्षण का लागू होऊ शकत नाही? असे प्रश्न विचारून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न विरोधक करताना दिसतात. पण, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपल्या संविधानातील काही महत्त्वाच्या दुरुस्त्यांमध्येच दडलेली आहेत. पण, मुळात विरोधकांनी हे समजून घेणे अपेक्षित नाही. कारण, त्यांच्या डोक्यात प्रकाश पडला, तर ते जनतेची फसवणूक कशी करणार म्हणा? परंतु, भारतीय राजकारण आणि घटनात्मक प्रक्रियेबद्दलची अत्यंत रंजक आणि महत्त्वाची अशी ही माहिती एका जागरूक भारतीय नागरिकासाठी सोप्या भाषेत समजून घेणेही तितकेच गरजेचे आहे.

सर्वप्रथम परिसीमनाची प्रक्रिया आतापर्यंत का रखडली, ते समजावून घेऊ. भारतीय राज्यघटनेच्या 'कलम ८२' नुसार, प्रत्येक जनगणनेनंतर लोकसभा आणि विधानसभेच्या जागांची पुनर्रचना करणे बंधनकारक आहे. मात्र, यात दोन मोठ्या अडचणी होत्या.

**१. ४२ वी घटनादुरुस्ती (१९७६):** तत्कालीन इंदिरा गांधी सरकारने १९७१ च्या जनगणनेनुसार जागांची संख्या 'फ्रीज' (स्थिर) केली. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे, उत्तर भारतीय राज्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढत होती, तर दक्षिण भारतातील राज्यांनी कुटुंबनियोजनाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबवून लोकसंख्या नियंत्रित केली होती. लोकसंख्येच्या आधारावर जागा वाढवल्या असत्या, तर दक्षिण भारताचे राजकीय प्रतिनिधित्व कमी झाले असते. ही मर्यादा २००१ पर्यंत होती.

**२. ८४ वी घटनादुरुस्ती (२००१) :** अटल बिहारी वाजपेयी सरकारने ही मर्यादा आणखी २५ वर्षांसाठी वाढवली. त्यामुळे २०२६ नंतर होणार्या पहिल्या जनगणनेपर्यंत जागांची संख्या बदलता येणार नाही, असे घटनात्मक बंधन आले. या घटनात्मक तरतुदींमुळे मोदी सरकार गेली ११ वर्षे सत्तेत असूनही, २०२६ पूव लोकसभेच्या ५४३ जागांमध्ये वाढ किंवा बदल करणे सरकारला शक्य नव्हते. २००८ मध्ये झालेली पुनर्रचना ही केवळ मतदारसंघांच्या सीमांची होती, जागांच्या संख्येची नाही.

आता दुसरा मुद्दा जो विरोधक मोठ्या आवेशात वाजतगाजत वाजवत आहेत, तो म्हणजे महिला आरक्षणाचा. सध्याच्या ५४३ जागांवर ३३ टक्के महिला आरक्षण का नाही? असा प्रश्न विचारला जातो आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये 'नारीशक्ती वंदन अधिनियम' (१०६वी घटनादुरुस्ती) मंजूर करण्यात आला. दि. १७ एप्रिल रोजी संसदेत 'नारीशक्ती वंदन अधिनियमा'तील सुधारणा विधेयकावर (१३१ व्या संविधानिक दुरुस्ती विधेयक) चर्चा आणि मतदान झाले. सरकारने परिसीमन आणि जनगणनेनंतर आरक्षण लागू करण्यासाठी सुधारणा मांडली होती, जेणेकरून २०२९च्या लोकसभा निवडणुकीपासून या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल. विरोधकांनी (काँग्रेस, 'तृणमूल' इ. 'इंडी' गट) याला कडाडून विरोध केला. वर गोंधळ उडवून अधिनियम सुधारणा पारित होऊ न शकल्यावरून आनंदोत्सवदेखील साजरा केला. आता या आरक्षणाची अंमलबजावणी लगेच का होऊ शकत नाही, याची काही तांत्रिक कारणे खाली देत आहे.

**१. कायद्यातील अट:** १०६ व्या घटनादुरुस्तीमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, हे आरक्षण २०२६ नंतर होणार्या पहिल्या जनगणनेनंतर आणि त्यानंतर होणाऱ्या परिसीमनानंतरच लागू होईल. ('कलम ३३४' पाहा). दि. १६ एप्रिलला ज्या २३० खासदारांनी या कायद्याच्या अंमलबजावणीला नकार दिला, त्यांनी हे कलम वाचले नव्हते की, जाणूनबुजून ते माहीत असूनही त्यांचा कांगावा चालू आहे? की, त्यांची देशाचे संविधान आणि घटना समजून घेण्याइतकी बौद्धिक कुवत नाही? असे प्रश्न यामुळे उपस्थित होतात.

**२. डेटा आणि न्याय्यता :** सध्याच्या लोकसभेतील जागा १९७१ आणि २००१च्या माहितीवर आधारित आहेत. नवीन जनगणनेची आकडेवारी आल्याशिवाय कोणत्या जागा महिलांसाठी आरक्षित करायच्या याचा निर्णय घेणे अन्यायकारक ठरू शकते. इतकी साधी गोष्ट कायद्याचे ज्ञान नसणार्या सर्वसामान्य माणसालाही सहज समजू शकते.

**३. जागांची वाढती संख्या :** तज्ज्ञांच्या मते, २०२६च्या परिसीमनानंतर लोकसभेच्या जागा ७५० ते ८५० पर्यंत वाढू शकतात. जेव्हा जागा वाढतील, तेव्हा महिलांना ३३ टक्के आरक्षण देणे अधिक सोयीचे ठरेल, जेणेकरून विद्यमान राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ होणार नाही.

**४. घटनात्मक पेच:** जर सध्याच्या लोकसभेतील ५४३ जागांवर आरक्षण द्यायचे असेल, तर संसदेला पुन्हा एकदा घटनादुरुस्ती करावी लागेल. कारण, सध्याच्या कायद्यात तशी तरतूदच नाही.

देशात महिला आरक्षण कायदा मंजूर झाला असला, तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही 'जनगणना + परिसीमन' या दोन प्रक्रियांवर अवलंबून आहे. २०२६ पूव हे दोन्ही सोपस्कार पूर्ण होणे घटनात्मकदृष्ट्या शक्य नसल्याने, २०२९ च्या निवडणुकीपूव या सर्व प्रक्रिया पार पडणे महत्त्वाचे ठरले असते. हा केवळ राजकीय मुद्दा नसून, उत्तर आणि दक्षिण भारताचा समतोल राखणारा एक घटनात्मक प्रवास आहे. असे विरोधक सर्वप्रकारचा गोंधळ माजवण्यात धन्यता मानत आहेत. अराजकता आणि भारताची दुर्गती; आर्थिक, सामाजिक, राजकीय असे सर्वप्रकारे भारताचे पतन हेच यांचे उद्दिष्ट आहे, हे त्यांच्या महिलाविरोधी भूमिकेमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# पहलगामचा 'राष्ट्रवादी प्रहार'!

**मुंबईवर कसाबने केलेला हल्ला आणि पहलगाम हत्याकांड या दोन भीषण हल्ल्यांवर भारत सरकारची कशी प्रतिक्रिया उमटली, त्यावरून बदललेल्या भारताचा दरारा दिसून येतो. छोटेखानी युद्ध असलेल्या मुंबई हल्ल्यानंतर तत्कालीन 'सेक्युलर' सरकारने पाकिस्तानला केवळ कागदपत्रे सोपविली; तर पहलगाम हत्याकांडानंतर भारताने पाकिस्तानी हवाई दलाची ताकद नष्ट केली आणि त्याचे अण्वस्त्रांचे 'ब्लॅकमेलिंग'ही कायमचे बंद केले. २२ एप्रिल रोजी पहलगामच्या निर्घृण हल्ल्याला वर्ष पूर्ण झाले असताना, मागील एका वर्षात बदललेल्या या नव्या भारताचा घेतलेला आढावा....**

आकलन | प्रतिनिधी



काश्मीरमधील पहलगाम या प्रसिद्ध पर्यटनस्थळी निसर्गसौंदर्याचा आनंद घेणार्या पर्यटकांना काही इस्लामी धर्मांध दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार केल्याच्या घटनेला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. या हल्ल्याने इस्लामी दहशतवादाचे क्रूर स्वरूप जगजाहीर झाले आणि 'दहशतवादाला धर्म नसतो' या बेगडी आणि मतलबी तत्त्वज्ञानाचेही बिंग फोडले. पृथ्वीवरील स्वर्गाचा आनंद घेणार्या निरपराध पर्यटकांपैकी पुरुष पर्यटकांना काही धर्मांध दहशतवाद्यांनी त्यांचा धर्म विचारून गोळ्या झाडल्या. यावेळी त्यांच्या शेजारी त्यांची पत्नी आणि लहान मुलेही उभी होती. त्यांच्या डोळ्यांदेखत या पुरुषांना अगदी जवळून गोळ्या घातल्या आणि त्यांच्या रक्ताने त्यांच्या पत्नी-मुलांची अंगे माखली. जा, मोदींना जाऊन सांगा, आम्ही काय केले ते, असा मग्रूर संदेशही त्या दहशतवाद्यांनी महिलांना सांगितला.

दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर अजमल कसाब व त्याच्या दहा साथीदारांनी केलेला हल्ला आणि गतवर्षी पहलगाममध्ये अशाच धर्मांध इस्लामी दहशतवाद्यांनी केलेला हल्ला, या दोन हल्ल्यांवर भारताने कशी प्रतिक्रिया दिली, त्यावरून 'नवा भारत' कसा आणि किती बदलला आहे, ते दिसून येते. मुंबईवरील हल्ल्यात सुमारे १८५ निरपराध नागरिक मारले गेले होते. त्यात फक्त भारतीय नागरिक नव्हते, तर अन्य देशांचेही काही नागरिक होते. पाकिस्तानने भारताविरोधात पुकारलेले ते मिनी युद्धच होते. तब्बल तीन दिवस भारत या हल्ल्याशी झुंजत होता. इतका भीषण हल्ला होऊनही आणि त्यातील पाकिस्तानच्या संपूर्ण सहभागाचे सज्जड पुरावे मिळूनही भारत सरकारकडून पाकिस्तानच्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आली नव्हती. भारताचे तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम हे पाकिस्तानला पुराव्यांची कागदपत्रे पाठविण्याचे काम करीत होते. हा होता एका 'सेक्युलर' सरकारचा प्रतिकार!

उलट, गतवर्षी पहलगाममधील हल्ल्याचे स्वरूप कळताच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लष्कराला प्रतिशोधासाठी संपूर्ण सूट दिली. पहलगाम हत्याकांडात २५ भारतीय महिलांचे सिंदूर पुसले गेले होते. त्याचा बदला म्हणून भारताच्या प्रतिकाराला 'ऑपरेशन सिंदूर' हे समर्पक नाव देण्यात आले. आजघडीला 'ऑपरेशन सिंदूर' हा जगात परवलीचा शब्द बनला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे भारत या लष्करी महासत्तेचा उदय झालेला जगाने पाहिला. पाकिस्तानच्या भूमीवर; पण सरहद्दीच्या अनेक किलोमीटर खोलवर स्थित दहशतवादी अड्ड्यांवर जबरदस्त क्षेपणास्त्रे डागली गेली आणि दि. ६ मेच्या उत्तररात्री पाकिस्तानात जणू सूर्य प्रकटला. यापूर्वी, भारताने केलेल्या दोन्ही 'सर्जिकल स्ट्राईक'चे पुरावे मागितले जात होते. पण, गतवर्षी पाकिस्तानी नागरिकच या हल्ल्यांचे व्हिडिओ काढून ते जगापुढे सादर करीत होते. पाकिस्तानची 'रडार' यंत्रणाच भारताने नष्ट केल्याने पाकिस्तानी हवाई दल आंधळे झाले. पाकिस्तान कदाचित प्रतिहल्ला करील, ही शक्यता लक्षात घेऊन त्यावर कोणता प्रतिसाद द्यायचा, त्याचीही आखणी आधीच करून ठेवण्यात आली होती. पाकिस्तानने भारतावर एकाच वेळी शेकडो ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला चढविला. पण, भारताकडील अचूक आणि अत्याधुनिक क्षेपणास्त्रांमुळे एकही ड्रोन किंवा क्षेपणास्त्र भारतीय भूमीवर पडले नाही. त्यावरून भारताची लष्करी ताकद आणि सज्जता किती उच्चकोटीची आहे, त्याचे दर्शन घडले.

पाकिस्तानच्या मूर्ख साहसाला दिलेला हा होता एका अस्सल 'राष्ट्रवादी' सरकारचा प्रहार! 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानचा आणखी एक भ्रमाचा भोपळा फोडला. 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानचे हे आण्विक 'ब्लॅकमेलिंग' कायमचे संपुष्टात आणले. पंजाब प्रांतातील सरगोदा हवाई तळाजवळ किराणा हिल्स या टेकड्या आहेत. त्या टेकड्यांमध्ये भुयारे खणून तेथे पाकिस्तानने आपली अण्वस्त्रे दडवून ठेवली आहेत. ही गोष्ट गोपनीय आहे, अशी पाकिस्तानी लष्करी नेतृत्वाची समजूत होती. मात्र, 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारताने या टेकडीवर एका विशिष्ट ठिकाणी डागलेल्या क्षेपणास्त्राने पाकिस्तानची झोप उडविली. याठिकाणी केलेल्या हल्ल्याने भारताने पाकिस्तानला अचूक संदेश दिला. परिणामी, पाकिस्तानने आपले मायबाप असलेल्या अमेरिकेकडे धाव घेत युद्ध थांबविण्यासाठी भारतावर दबाव टाकण्याची याचिका केली. पण, भारताने अन्य कोणत्याही राष्ट्राचा हस्तक्षेप अमान्य केला. या हल्ल्यानंतर देशातील विरोधी पक्षांच्या प्रतिक्रिया पाहिल्यावर या नेत्यांना सामान्य भारतीयांच्या जीवाचे काहीही मोल वाटत नसून, त्यांना आपले संकुचित राजकारण आणि आपल्या विशिष्ट मतपेढीच्या भावनांचे मोल अधिक वाटते, ही लज्जास्पद वस्तुस्थितीही उघड झाली. अशा अनेक नेत्यांनी दहशतवाद्यांनी धर्म विचारून हत्या केल्याच्या वस्तुस्थितीलाच नाकारले. जिच्या पतीची हत्या झाली आहे, अशी महिला जर सांगत होती की, तिच्या पतीला त्याचा धर्म विचारला आणि त्याने 'हिंदू' असे सांगितल्यावर त्याला गोळी घालण्यात आली, तरी हे संकुचित नेते त्यांनाच खोटे पाडत होते. ते पाहून अनेकांना त्यांचा संताप आला.

आज यांपैकी सगळेच नेते सुरक्षित आहेत आणि ते आपले मतलबी राजकारणही पूर्वीप्रमाणेच खेळत आहेत, ही हिंदूंच्या सहिष्णुतेची परिसीमा आहे! भारताने पाकिस्तानला जन्माची अद्दल घडविली असली, तरी जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, हेही सत्य. त्यामुळे भविष्यात पाकिस्तान भारताची कुरापत काढणारच नाही, याची हमी देता येत नाही. पण, त्याची पुढली आगळीक त्याच्या अस्तित्वावरच घाला घालू शकते, हे पाकिस्तानने लक्षात ठेवावे!